महाराष्ट्र महसुल

तालुका स्तरीय समित्या

# रचना व कार्ये

(महसुल विभागाशी संबधित)

तक्ता स्वरूपात व सर्व प्रकारचे समिती शासन निर्णयासह संकलित केलेले पहिले

# ई-बुक

* संकलन *

श्री.शशिकांत सुबराव जाधव
नायब तहसिलदार (सावंतवाडी)

श्री.मोहसिन युसूफ शेख
तलाठी कर्जत जि.अहमदनगर

www.mohsin7-12.blogspot.in ला भेट द्या...

महसुल मित्र मोहसिन शेख

# तालुकास्तरीय समित्या रचना व कार्ये

तालुकास्तरावरील महसूल संबंधित सर्व समिती व सबंधित  शासन निर्णय संकलित असलेले "**महसूल मित्र मोहसिन शेख**" ब्लॉग वरील

**पहिले ई-बुक**


लेखक :- **श्री.शशिकांत सुबराव जाधव**

**नायब तहसिलदार ,सावंतवाडी**

संकलन :- **श्री.मोहसिन युसूफ शेख**

**तलाठी-कर्जत ,जि .अहमदनगर**

प्रस्तावना:- **डॉ.संजय कुंडेटकर सर**

**उपजिल्हाधिकारी ,सातारा**



प्रकाशक:- **महसूल मित्र मोहसिन शेख ब्लॉगस्पॉट**

**Visit :-mohsin7-12.blogspoti.in**

**संपर्क:- ९७६६३६६३६३**

**प्रथम आवृत्ती :- २७ एप्रिल २०१६**



© **या पुस्तकातील कोणताही मजकूर पुनप्रकाशित अथवा संग्रहित करणेसाठी प्रकाशाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे.**

प्रस्तावना

तालुका स्तरावरील विविध अधिकाऱ्यांच्या कामात समन्वय ठेऊन शासनाच्या विविध योजना अधिक परिणामकारक पध्दतीने राबवणे आणि त्यातून सामान्य जनतेला आधार आणि संरक्षण प्रदान करणे या प्रमुख उद्देशाने तालुका स्तरावर विविध समित्यांचे गठन करण्यात येते.

ब्रिटिश काळापासूनच प्रशासकीय अधिकाऱ्यांना नियंत्रक आणि समन्वयकाचे काम सोपविण्यात आले आहे. त्यामूळेच आय. ए. एस. अधिकाऱ्याचा दर्जा आजही आय. पी. एस. अधिकाऱ्यापेक्षा मोठा आहे. त्यामुळेच श्रेणी पदक्रमानूसार तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकारी, अनुक्रमे तालुका आणि उपविभाग स्तरावर नियंत्रक आणि समन्वयकाची जबाबदारी सक्षमतेने हाताळतांना दिसतात.

तालुका स्तरावरील विविध समित्यांचे गठन करण्यात आलेले असते आणि प्रत्येक समितीवर महसूल अधिकाऱ्याची  एकतर समिती अध्यक्ष किंवा सदस्य सचिव म्हणून पदसिध्द नेमणूक केलेली असते. अनेक वेळा या समित्यांच्या बैठकांवरील विविध प्रकारचे वाद होतात आणि त्याची झळ, समिती अध्यक्ष किंवा सदस्य सचिव या नात्याने महसूल अधिकाऱ्यांना बसते. त्यामुळे तालुका आणि उपविभाग स्तरावर कार्यरत असणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांना, तालुका स्तरावर किती आणि कोणत्या समित्या आहेत तसेच त्यातील आपले पद काय आहे याची माहिती असणे अत्यावश्यक आहे.

या समित्यांबाबतची एकत्रीत माहिती, तक्ता स्वरुपात संकलित करण्याचे महत्वाचे काम नायब तहसिलदार श्री. शशिकांत जाधव यांनी केलेले आहे त्यासाठी ते निश्चितच कौतुकास पात्र आहेत.

श्री. शशिकांत जाधव यांनी संकलित केली ही महत्वाची माहिती तालुका आणि उपविभाग स्तरावर कार्यरत असणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांना मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरेल याची मला खात्री वाटते.

ई-बुक ही संकल्पना ब्लॉगस्पॉट / संकेतस्थळावर चालू करणे काळाची गरज आहे. ही संकल्पना आज काळाची गरज आहे. सध्याच्या तांत्रिक युगात सर्व गोष्टी एका क्लिकवर उपलब्ध होत असल्याने अशाप्रकारे ई-बुक प्रकाशित करणे खूप चांगला व प्रशंसनीय उपक्रम सुरु करुन अनेक महत्वाच्या माहितींचा खजिना ई-बुक स्वरुपात ब्लॉगस्पॉट/ संकेतस्थळावर दर्शविणेचा स्तुत्य उपक्रम सुरू केल्याबद्दल महसूल मित्र मोहसिन शेख यांचे कौतुक आणि अभिनंदन करणेही प्रसंगोचित आहे.

महसूल मित्र मोहसिन शेख या संकेतस्थळावरील "ई-बुक" या उपक्रमास माझ्या हार्दिक शुभेच्छा.



डॉ. संजय कुंडेटकर,
उपजिल्हाधिकारी, सातारा

# मनोगत

तालुका स्तरावर आणि त्यातही महसुल खात्यात काम करत असताना आपल्याच विभागाशी संबंधीत कामे करावी लागतात असे नाही, तर महसुल व्यतिरीक्त अन्य अनेक शासकीय विभागाशी संबंधीत कामे महसुल अधिकाऱ्यास तालुका, उपविभाग आणि जिल्हा स्तरावर पार पाडावी लागतात. ब्रिटीश काळापासुन महसुल खाते हे सर्व विभागामध्ये एक प्रमुख विभाग आणि इतर सर्व विभागात समन्वय साधणारा असा विभाग आहे. त्यामुळे शासनाचा आज ही सर्वात जास्त विश्वास महसुल विभागावर आहे.

तालुका स्तरावर असणा अनेक समित्यांचे अध्यक्ष, सचिव हे महसुल अधिकारी आहेत. तथापि बर्याच वेळा या समित्याबाबत महसुल अधिकारी, कर्मचारी यांना एकत्रीतरित्या माहिती उपलब्ध होत नाही. कारण ह्या समित्या या वेगवेगळ्या शासकीय विभागाशी संबंधीत असतात आणि त्याबाबतचे शासन निर्णय संबंधीत विभाग निर्गमीत करीत असतात. त्यामुळे महसुल अधिकारी यांना या समित्यांचे कामकाज चालवताना अनेकदा समस्या निर्माण होतात, तसेच काही स्वंयघोषीत समाजसुधारक हे याबाबींचा फायदा घेऊन महसुल अधिकाऱ्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करतात. यातुनच एक सर्वसमावेश अशी सर्व समित्यांची एकत्रीतरित्या माहिती उपलब्ध व्हावी, या उद्देशाने या समितीची मुलभुत माहिती सांगणारा एक चार्ट तयार केला आणि अवलोकनार्थ आमचे मित्र श्री मोहसीन शेख, तलाठी कर्जत, जि. अहमदनगर यांना पाठवले असता, त्यांनी या चार्टचा व सर्व संबंधीत शासन निर्णयांचे संकलन करुन एक E- Book स्वरुपात त्यांचा ब्लॉग mohsin7-12.blogspot.in वर प्रकाशीत करण्याची संकल्पना मांडली आणि याच कल्पनेतुन आणि श्री मोहसीन शेख यांच्या प्रयत्नातुन व कष्टातुन आज तालुकास्तरीय समित्याबाबतचे E Book प्रकाशीत करीत आहेत. महाराष्ट्रातील सर्व महसुल अधिकारी, कर्मचारी यांना सदर E Book हे त्यांचे कामकाजात उपयोगी पडेल अशी आशा बाळगतो. तसेच आमचे मित्र श्री. मोहसीन शेख यांनी घेतलेल्या प्रयत्नासाठी आणि मा. संजय कुंडेटकर सर, उपजिल्हाधिकारी, सातारा यांनी सदर पुस्तकास प्रस्तावना दिली त्यासाठी मी त्यांचा शतशः आभारी आहे.

S. Jadhav

शशिकांत सु. जाधव

नायब तहसीलदार, सावंतवाडी.

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| 1 | समितीची रचना व शासन निर्णय तक्ता | 1 |
| 2 | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण | 5 |
| 3 | दुष्काळ निवारण समिती | 9 |
| 4 | राजीव गांधी गतिमान प्रशासन | 13 |
| 5 | भ्रष्टाचार निर्मुलन समिती | 22 |
| 6 | सार्वजनिक वितरण -दक्षता समिती | 29 |
| 7 | दारूबंदी समिती | 43 |
| 8 | रोजगार हमी समिती | 45 |
| 9 | विद्‌युत वितरण नियंत्रण समिती | 49 |
| 10 | जलयुक्त शिवार अभियान समिती | 57 |
| 11 | तालुका क्रीडा समिती | 60 |
| 12 | तालुका शांतता समिती | 64 |
| 13 | तालुका समन्वय समिती | 70 |
| 14 | तालुका तक्रार निवारण समिती | 75 |
| 15 | सामाजिक अर्थसहाय्य योजना समित्या | 78 |
| 16 | तंटामुक्ती समिती | 118 |
| 17 | व्यसनमुक्ती समिती | 150 |
| 18 | विशाखा समिती | 158 |

| तालुकास्तरीय समित्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क्र | समितीचे नांव | शासन निर्णय | समिती अध्यक्ष | समितीतील सदस्य | सदस्य सचिव | सभेचा कालावधी |
| 1) | **तालुका भ्रष्ट्राचार निर्मुलन समिती** | साप्र शापरि क्र अहत/610/प्रक्र64/10/ 11अ,दि 4/2/2011 | उपविभागीय अधिकारी/ तहसीलदार | DYSP, उपअभियंता, जलसंपदा, PWD, मृदसंधारण, सहा. निंबंधक, BDO, अशासकीय सदस्य (3 ते 5) | तहसीलदार | तीन महिन्यातुन एकदा ( जुन, सप्टेंबर,डिंसेंबर, मार्च) |
| 2) | **तालुका समन्वय समिती** | नियोजन विभाग. तासयु 1090/ CR40 /योजना 5. दि. 16/5/1990 | तालुक्यातील विधानसभा सदस्य | विधानपरिषद सदस्य, सभापती, तालुका-खरेदी अध्यक्ष, 5 अशासकीय सदस्य, 2 अशासकीय महिला, सर्व कार्यालय प्रमुख | तहसीलदार | तिमाही सभा |
| 3) | **तालुका शांतता समिती** | गृहविभाग DIS 2001/CR315/विशा शा /1ब. दि 3/6/2003 | उपविभागीय अधिकारी/ तहसीलदार | MP/MLA/MLC, नगराध्यक्ष,सर्व धर्माचे प्रतिनिधी,सामा संघटनेचे सदस्य,वकील/डॉक्टर/NGO सदस्य,व्यापारी,दुकानदार प्रतिनिधी, शैक्षणीक क्षेत्रातील व्यक्ती,पोलीस निरीक्षक, | तहसीलदार | 6 महिन्यातुन एकदा |
| 4) | **तालुका दारुबंदी समिती** | गृह विभाग क्र CRM 2004 /608/पोल11. दि. 23/2/2005 | तहसीलदार | वैद्यकीय अधिकारी, स्वंयसेवी संघटनेचे प्रतिनिधी, प्रतिष्ठीत नागरीक, अबकारी निरीक्षक (Excise) | ठाणे अंमलदार | महिन्यातुन एकदा |
| 5) | **तालुका दक्षता समिती** | पुरवठा विभाग शासन परि. क्र दक्षस 1007/प्रक्र 548/ नापु 21. दि. 23/1/2008 | तालुक्यातील विधानसभा सदस्य | इतर MLA, नगराध्यक्ष, सभापती, गटविकास अधिकारी, तीन महिला प्रतिनिधी, विरोधी पक्षाचे दोन त्यापैकी एक महिला, रास्त दुकानदार प्रतिनिधी, अजा, अज प्रतिनिधी, सामा कर्यकर्ता, अण्णा हजारे प्रतिनिधी, | तहसीलदार | महिन्यातुन एकदा |
| 6) | **नगरपालिका दक्षता समिती** | पुरवठा विभाग शासन परि. क्र दक्षस 1007/प्रक्र 548/ नापु 21. दि. 23/1/2008 | विधानसभा सदस्य | MLC, नगराध्यक्ष, 2 महिला, विरोधी पक्षाचे 2 सदस्य, रास्त दुकानदार प्रतिनिधी, अजा, अज प्रतिनिधी, सामा कर्यकर्ता, अल्पसंख्याक प्रतिनिधी, ग्राहक चळवळीशी संबंधीत प्रतिनिधी | तहसीलदार | महिन्यातुन एकदा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7) | **तालुका व्यसनमुक्ती समिती** | सामा. न्याय विभाग. शानि युटीए 2011/समिती/ प्रक्र 326 सुधार 1 दि. 1/10/2011 | तहसीलदार. गटविकास अधिकारी हे कार्यकारी अध्यक्ष | स्वातंत्र्यसैनिक, गटशिक्षण अधिकारी, प्राचार्य, शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती, वारकरी प्रतिनिधी, महिला सरपंच, पंचायत समिती महिला सदस्य, स्वंयसेवी संस्था प्रतिनिधी, किर्तनकार प्रतिनिधी, पत्रकार, लोक कलावंत, महिला मंडळ प्रतिनिधी, बचतगट प्रतिनिधी, SC, ST प्रतिनिधी, ठाणे अंमलदार, सामा कार्यकर्ता | निवासी नायब तहसीलदार | 2 महिन्यातुन एकदा |
| 8) | **तालुका तंटामुक्ती समिती** | गृहविभाग शानि एमआयएस 1007/ सीआर 238/ पोल 8 दि. 19/7/2007 | तहसीलदार | पंचायत समिती सभापती, जि. प सदस्य, गटविकास अधिकारी, सरकारी वकील, पोलीस निरीक्षक, तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, नगर भुमापन अधिकारी, स्वंयसेवी संस्था प्रतिनिधी, पत्रकार, कायदा सल्लागार समितीतील एक वकील | ठाणे अंमलदार | दरमहा |
| 9) | **तालुका क्रीडा संकुल समिती** | शालेय शिक्षण विभाग. शानि क्र / ताक्रीसं - 1415 प्रक्र 139/ क्रीयुसे 1 दि. 29/2/2016 | स्थानीक आमदार. तहसीलदार कार्याध्यक्ष | जिल्हा क्रीडा अधिकारी, पंचायत समिती, नगरपालिका प्रतिनिधी, गटविकास अधिकारी, उपअभियंता, साबां विभाग, गटशिक्षण अधिकारी, पोलीस निरीक्षक | तालुका क्रीडा अधिकारी | आवश्यक त्या वेळी. |
| 10) | **तालुका संजय गांधी योजना समिती** | सामा न्याय विभाग. शानि क्र विसयो 2010/ प्रक्र 175/ विसयो 2 दि. 26/10/2010 | मा. पालकमंत्री यांनी शिफारस केलेले सामाजीक क्षेत्रातील प्रतिष्ठीत व्यक्ती | SC/ST प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी, भज,विजा प्रतिनिधी, सर्वसाधारण प्रतिनिधी, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, अपंग प्रतिनिधी, स्वंयसेवी संस्था प्रतिनिधी, सामाजीक क्षेत्रात काम करणारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरीक प्रतिनिधी | तहसीलदार / नायब तहसीलदार ( संजय गांधी) | 3 जाने, 10 मार्च, 10 ते 14 एप्रील, 27 मे, 26 जुन, 15 ऑगस्ट, 2 ऑक्टोंबर, 6 डिसेंबर |
| 11) | **तालुका नैसर्गिक आपत्ती समिती** | महसुल व वन विभाग.शानि क्र डिएमयु2006/ प्रक्र 10/ डिएम 1. दि 1/6/2006 | तहसीलदार | पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, उपअभियंता, साबां विभाग, उपअभियंता, राष्ट्रीय महामार्ग, उपअभियंता, जि.प. बांधकाम, स्वंयसेवी संस्था प्रतिनिधी, गटशिक्षण अधिकारी, इतर महत्वाचे प्रतिनिधी | निवासी नायब तहसीलदार | आवश्यक त्या वेळी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 12) | **तालुका जलयुक्त शिवार अभियान आढावा व समन्वय समिती** | जलसंधारण विभाग. शानि जलअ/2014/प्रक्र 203/ जल 7. दि दे .1/3/2016 | तालुक्यातील विधानसभा सदस्य. उपविभागीय अधिकारी हे सह अध्यक्ष | विधानपरिषद सदस्य आमंत्रीत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती सभापती, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका पातळीवरील महत्वाचे अधिकारी | तहसीलदार | 2 महिन्यातुन एकदा |
| 13) | **वेठबिगार निर्मुलन दक्षता समिती** | वेठबिगार (निर्मुलन) अधिनियम 1976 | उपविभागीय अधिकारी. | 3 अजा/अज प्रतिनिधी, 2 सामाजीक क्षेत्रातील व्यक्ती, 3 ग्रामीण विकास क्षेत्रातील व्यक्ती, तहसीलदार, 1 वित्तीय क्षेत्रीतील व्यक्ती | सरकारी कामगार अधिकारी | तीन महिन्यातुन एकदा.... |
| 14) | **तालुका दुष्काळ निवारण समिती** | महसुल व वन विभाग. शानि एससीवाय 2015/ प्रक्र 386/म 7. दि 4/1/2016 | शासनाने निवडलेला अशासकीय सदस्य | गटविकास अधिकारी, नायब तहसीलदार, सर्कल, तालुका कृषी अधिकारी, प्रगतीशील शेतकरी, अल्पभुधारक दोन | तहसीलदार | आवश्यक त्या वेळी. |
| 15) | **तालुका कांदळवन संरक्षण व संबर्धन समिती** | विभागीय आयुक्त, कोकण यांचे परिपत्रक. दि. 14/12/2011 | महसुल नायब तहसीलदार | वनक्षेत्रपाल, पोलीस उपनिरीक्षक, तालुका अव्वल कारकुन, संबंधीत मंडल अधिकारी व तलाठी | तालुका अव्वल कारकुन | महिन्यातुन एकदा |
| 16) | **तालुका विशाखा समिती** | महिला व बालविकास विभाग. शानिक्र मकचौ2006/प्रक्र15/ मकक.दि 19/9/2006 | कार्यालयातील वरीष्ठ महिला अधिकारी/ कर्मचारी | 50% सदस्य या महिला असतील, NGO प्रतिनिधी | महिला कर्मचारी | महिन्यातुन एकदा |
| 17) | **तालुका रुग्ण कल्याण समिती** | माहिती उपलब्ध झाली नाहे. तथापि सदर समितीची बैठक दरमहा होते. | वैद्यकीय अधीक्षक | तहसीलदार, उपअभियंता सार्वजानीक बांधकाम, बालविकास प्रकल्प अधिकारी, वरीष्ठ वैद्यकीय अधिकारी, गटविकास अधिकारी, सभापती किंवा त्यांनी नामनिर्देशीत प्रतिनिधी | तालुका वैद्यकीय अधिकारी | महिन्यातुन एकदा |
| 18) | **राजीव गांधी गतीमान प्रशासन अभियान समिती** | सामान्य प्रशासन विभाग. शानि क्र प्रसुधा 1000/प्रक्र 26/2001/18अ. दि 3/8/2001 | उपविभागीय अधिकारी. | अशासकीय सदस्य/ शासनाचे प्रशिक्षण संस्था, गटविकास अधिकारी | तहसीलदार | आवश्यक त्या वेळी. |
| 19) | **तालुका रोजगार हमी योजना समिती** | नियोजन विभाग. शानि क्र समिती 1001/प्र 360/ रोहयो 8. दि. 9/4/2002 | विधानसभा सदस्य | विधानपरिषद सदस्य,सभापती, मागासवर्गीय दोन सदस्य, गटविकास अधिकारी, अशासकीय दोन सदस्य, दोन मजुर प्रतिनिधी, एक महिला प्रतिनिधी, प्रकल्प अधिकारी (अदिवासी विकास गट) | तहसीलदार | तिमाही सभा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **20)** | **तालुका तक्रार निवारण समिती** | 1) साप्रवि शानि क्र सीडीआर 2076/6523/201B/XT. दि 4/4/1977. (2) साप्रवि शानि क्र सीडीआर2082/3188/66/11. मुंबई. दि 14/2/1986 | उपविभागीय अधिकारी. | 3 अशासकीय सदस्य | तहसीलदार | आवश्यक त्या वेळी. |
| **21)** | **तालुका विद्युत वितरण नियंत्रण समिती** | उद्योग व उर्जा विभाग. शानि जिस्तस. 2015/प्रक्र 52/ उर्जा 5. दि. 26/3/2015 | विधानसभा सदस्य. इतर विधानसभा सदस्य & कार्यकारी अभियंता हे सहअध्यक्ष | जिप सर्व सदस्य, सभापती, नगराध्यक्ष, सभापती कृषी उत्पन्न, उपविभागीय पोलीस अधिकारी,तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी (पंस & राज्य), ग्राहक प्रतिनिधी | उपविभागीय अभियंता, महावितरण | तिमाही सभा |

**शशिकांत जाधव, नायब तहसीलदार, सावंतवाडी. 9923593063**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण स्थापित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
(मदत कार्ये, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन)
शासन निर्णय क्रमांक डिएमयु.२००६/प्र.क्र.१०/डीएम-१
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०१ जून, २००६.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक स्थिती व हवामान यामुळे या राज्यास विविध आपत्तीचा नेहमीच धोका संभवतो. राज्यात उद्‌भवणाऱ्या विविध नैसर्गिक आपत्तीमुळे (उदा.अतिवृष्टी, पूर, चक्रीवादळ, भूकंप) बाधित आपद्ग्रस्तांना तातडीने मदत देणे व त्यांच्या पुनर्वसनासाठी सहकार्य करण्याची जबाबदारी राज्य शासनाकडून पार पाडण्यात येते. तथापि, विविध आपत्ती संदर्भात प्रतिबंध, निवारण, पूर्वतयारी, प्रतिसाद, मदत व पुनर्वसन इत्यादी बाबी सुव्यवस्थितपणे हाताळण्यासाठी केंद्र शासनाने आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंमलात आणलेला आहे. सदर कायद्यातील तरतूदीनुसार राज्य स्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, शासन निर्णय दि. २४.५.२००६ अन्वये स्थापित करण्यात आले आहे. सदर कायद्यातील कलम २५ अन्वये जिल्हा पातळीवर देखील **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण** स्थापन करण्याची तरतूद आहे.

राज्याची आपत्ती प्रवणता, वर नमूद कायद्यातील तरतूद या सर्व बाबींचा विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम २५ मधील तरतूदीस अनुसरुन राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळता इतर सर्व जिल्ह्यात **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची** स्थापना करण्यात येत आहे. सदर प्राधिकरणाची रचना, कार्यपध्दती, कार्यकक्षा खाली विशद केल्याप्रमाणे असतील.

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची रचना :**

| | |
|---|---|
| पदसिध्द अध्यक्ष | :जिल्हाधिकारी |
| पदसिध्द सह अध्यक्ष | :अध्यक्ष, जिल्हा परिषद |
| सदस्य | :मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |
| | :जिल्हा पोलीस अधिक्षक |
| | :जिल्हा शल्य चिकित्सक |
| | :कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम |
| | :कार्यकारी अभियंता, पाटबंधारे |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | :अपर जिल्हा दंडाधिकारी/ निवासी उपजिल्हाधिकारी |

वर नमूद व्यवस्था ही केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या तरतूदीशी सुसंगत आहे. तथापि राज्याची प्रशासकीय व्यवस्था पाहता, खालील नमूद अधिकाऱ्यांना सदर प्राधिकरणावर विशेष निमंत्रीत म्हणून स्थान देण्यात यावे.

**विशेष निमंत्रीत**

:महानगरपालिका आयुक्त
:पोलीस आयुक्त
:समादेशक, राज्य राखीव पोलीस दल/एन.सी.सी., गृहरक्षक दल व नागरी संरक्षक दल.
:स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी.

**प्राधिकरणावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नेमणूका :**

प्राधिकरणास, राज्य शासनाशी सल्ला- मसलत करुन, त्याचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेले अन्य अधिकारी, सल्लागार व कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेता येतील.

**प्राधिकरणाद्वारे सल्लागार समितीची नेमणूक :**

आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध बाबींसंदर्भात शिफारशी करण्यासाठी, प्राधिकरणाला आवश्यक वाटेल तेव्हा आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञ आणि प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींचा समावेश असलेली सल्लागार समिती नेमण्यात येईल. या सल्लागार समितीच्या सदस्यांना राज्य शासनाद्वारे निर्धारित केल्यानुसार भत्ते देण्यात येतील.

**प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपध्दती :**

१. जिल्ह्यासाठी प्रतिसाद आराखड्यासह आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे.
२. राष्ट्रीय धोरण, राज्याचे धोरण, राष्ट्रीय आराखडा, राज्याचा आराखडा आणि जिल्ह्याचा आराखडा यामध्ये समन्वय ठेवणे आणि संनियंत्रण व अंमलबजावणी करणे.
३. जिल्ह्यातील आपत्ती प्रवण क्षेत्र विनिर्दीष्ट करुन आपत्तीस प्रतिबंध अथवा आपत्तीच्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठीच्या उपाययोजना जिल्हा स्तरावरील शासकीय विभाग तसेच स्थानिक प्राधिकरणांद्वारे घेण्यात येत असल्याबाबत खातरजमा करणे.
४. आपत्तीस प्रतिबंध, आपत्तीच्या परिणामांची तीव्रता कमी करणे, सज्जता आणि प्रतिसाद या संदर्भातील उपाय योजनांबाबत राष्ट्रीय प्राधिकरण व राज्य प्राधिकरण यांनी आखून दिलेल्या मार्गदर्शकाप्रमाणे आवश्यक कार्यवाही जिल्ह्यातील संबंधित विभागामार्फत करण्यात येत असल्याबाबत खातरजमा करणे.
५. आपत्तीस प्रतिबंध व आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी आवश्यक त्या अन्य उपाययोजना करण्याबाबत जिल्हा पातळीवरील विविध प्राधिकरणे व स्थानिक संस्थांना सूचना देणे.
६. आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी जिल्हा पातळीवरील शासकीय विभाग व जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांना मार्गदर्शक तत्वे आखून देणे.
७. जिल्हा पातळीवरील शासकीय विभागांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्याच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.

८. जिल्हा स्तरावरील विविध शासकीय विभागामार्फत तयार करण्यात आलेले विकास आराखडे व राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये आपत्ती प्रतिबंध व आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठीच्या उपाययोजनांमध्ये एकसूत्रता रहावी यासाठी अंमलात आणावयाची मार्गदर्शक तत्वे आखून देणे आणि त्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य पुरविणे.

९. वरील क्र. ८ मध्ये उल्लेखिलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.

१०. जिल्ह्यावरील कोणतीही आपत्ती किंवा जिल्ह्यास भेडसावणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्रीच्या क्षमतेचा आढावा घेणे व आवश्यकतेनुसार त्यांचे अद्यावतीकरण करण्यासंदर्भात जिल्हास्तरावरील संबंधित विभाग अथवा स्थानिक प्राधिकरणांना सूचना देणे.

११. सज्जतेसाठी नियोजित उपाययोजनांचा आढावा घेणे आणि या उपाययोजना, कोणत्याही आपत्ती परिस्थितीत परिणामकारक ठरण्यासाठी आवश्यक दर्जाच्या असतील याबाबत लक्ष पुरविण्यास जिल्हा पातळीवरील संबंधित विभाग व अन्य संबंधित प्राधिकरणांना सूचना देणे.

१२. जिल्ह्यातील वेगवेगळ्या स्तरावरील अधिकारी, कर्मचारी व बचाव कार्य करणारे स्वयंसेवक यांचेसाठी खास प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन व संनियंत्रण करणे.

१३. आपत्तीस प्रतिबंध अथवा आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी स्थानिक प्राधिकरण, शासकीय व अशासकीय संस्थां यांच्या पाठींब्याने समुह प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे.

१४. आपत्तीची पूर्व सूचना मिळण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारणे, तिची देखभाल करणे, तपासणी करणे, ती अद्यावत करणे व योग्य माहिती लोकांपर्यंत पोहचेल असे पाहणे.

१५. जिल्हा पातळीवरील प्रतिसाद आराखडा तयार करणे, आढावा घेणे व अद्यावत करणे.

१६. कोणत्याही भेडसावणाऱ्या आपत्ती परिस्थितीत वा प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी प्रतिक्रीयास्वरुप निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे संनियंत्रण करणे.

१७. जिल्हा स्तरावरील शासकीय विभाग आणि स्थानिक प्राधिकरणे त्यांचे प्रतिसाद आराखडे, जिल्हा प्रतिसाद आराखड्याशी सुसंगत असतील याची खातरजमा करणे.

१८. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती अथवा प्रत्यक्ष आपत्तीस परिणामकारकपण तोंड देण्यासाठी उपाययोजना घेण्याबाबत जिल्हा पातळीवरील शासनाचे संबंधित विभाग किंवा स्थानिक प्राधिकरणासाठी मार्गदर्शक तत्वे आखून देणे व त्यांना मार्गदर्शन करणे.

१९. जिल्हा पातळीवरील शासकीय विभाग, वैधानिक संस्था, आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य करणाऱ्या इतर शासकीय व अशासकीय संस्था यांच्या मध्ये समन्वय ठेवणे, संनियंत्रण करणे, सहाय्य व सल्ला देणे.

२०. आपत्तीपूर्व व आपत्तीनंतरच्या व्यवस्थापनाच्या उपाययोजना खात्रीपूर्वक, तत्परतेने व प्रभावीपणे घेण्यात याव्यात म्हणून जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांशी समन्वय साधणे व मार्गदर्शक तत्वे आखून देणे.

यासोबतच केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३१ व ३२ च्या तरतूदीन्वये संबंधित जिल्ह्याचा जिल्हा आराखडा तयार करणे, तसेच विविध विभागामार्फत त्यांचे आराखडे तयार करणे कलम ३३ अन्वये आवश्यक अधिकारी-कर्मचारी यांच्या सेवा अधिग्रहीत करणे, आपत्ती प्रसंगी स्थानिक प्राधिकरणास असलेले अधिकार कलम ३४ च्या तरतूदीअन्वये प्राधिकरणास असतील.

**वित्तीय बाबी :-**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वित्तीय बाबी संदर्भात स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**( सुरेश काकाणी )**
उपसचिव

प्रति,



१. सर्व विभागीय आयुक्त

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- एससीवाय- २०१५/ प्र.क्र.३८६/म-७**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०४ जानेवारी, २०१६

**प्रस्तावना :-**

राज्यात सातत्याने उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाकडून पैसेवारीच्या आधारे ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांमध्ये विविध सोयी सवलती व उपाययोजना जाहीर करण्यात येतात. त्यामध्ये टँकरव्दारे पाणीपुरवठा करणे, जनावरांसाठी चारा छावण्या सुरु करणे, जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे रुपांतरण , वीज बिलात सुट, परिक्षा शुल्कात माफी, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती वगैरे सारख्या सोयी सवलतींचा अंतर्भाव आहे.

पाण्याचे नियोजन, पाण्याची भुगर्भातील पातळीची तपासणी करणे, पीक पध्दतीचे नियमन, खरीप व रब्बी हंगामातील पीकांच्या नोंदी अद्यावत करणे, पीक नुकसानीबाबत नोंदी घेणे, नुकसान भरपाई तात्काळ शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांचे बँकखाते उघडणेबाबत मोहिम राबविणे, शेतकऱ्यांकडील जनावरांचे सर्वेक्षण करणे, रोजगार हमी योजनांसंबंधित कामकाज, दुष्काळाशी संबंधित कामांमध्ये गतीमानता आणण्यासाठी व दुष्काळाशी सक्षमपणे मुकाबला करण्यासाठी ग्राम पातळीवर तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर समित्या स्थापन करणे, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यात सातत्याने उद्दभवणाऱ्या दुष्काळावर / दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी शासनाने ग्राम पातळी /तालुका पातळी व जिल्हा पातळीवर समित्या स्थापन करण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**१) ग्राम पातळीवरील दुष्काळ निवारण समिती :-**

शासनाने राज्यातील ज्या गावांमध्ये दुष्काळ जाहीर केला असेल अशा सर्व गावांमध्ये ग्राम पंचायतीने दुष्काळ निवारण समिती गठीत करावी. ग्राम स्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

१. सरपंच- अध्यक्ष (प्रत्येक ग्रामपंचायतीकरीता) (तालुका पातळीवरील समिती निवडेल ते)
२. ग्रामसेवक - सदस्य
३. प्रगतशील शेतकरी - सदस्य
४. सहकारी पतपुरवठा संस्थेचे अध्यक्ष - सदस्य
५. अल्पभूधारक शेतकरी (दोन-सदस्य) (यापैकी एक सदस्य शक्यतो महिला असावी )
६. कृषि सहायक - सदस्य
७. तलाठी - सदस्य सचिव

**२) तालुका पातळीवरील दुष्काळ निवारण समिती :-**

राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये प्रत्येक तालुक्यासाठी दुष्काळ निवारण समिती गठीत करावी. तालुका दुष्काळ निवारण समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

१ अशासकीय सदस्य - अध्यक्ष (शासन निवडेल ते)
२ गट विकास अधिकारी- सदस्य
३. तहसिलदार - सदस्य सचिव
४ नायब तहसिलदार - सदस्य
५ मंडल अधिकारी - सदस्य
६ तालुका कृषि अधिकारी- सदस्य
७ प्रगतशील शेतकरी - सदस्य
८ अल्पभूधारक शेतकरी (दोन-सदस्य) (यापैकी एक सदस्य शक्यतो महिला असावी)

**३) जिल्हा पातळीवरील दुष्काळ निवारण समिती :-**

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्ह्यासाठी दुष्काळ निवारण समिती गठीत करावी. जिल्हा दुष्काळ निवारण समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

१ अध्यक्ष - पालक मंत्री / विधान सभा सदस्य / विधान परिषद सदस्य / लोकसभा किंवा राज्यसभा सदस्य (शासन निवडेल ते)
२ जिल्हाधिकारी - सदस्य सचिव
३ मुख्य कार्यकारी अधिकारी - सदस्य
४ पोलीस अधिक्षक,ग्रामीण - सदस्य
५ उपजिल्हाधिकारी-(नरेगा)- सदस्य
६. मुख्य अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपणी- सदस्य
७ कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण- सदस्य
८ अधिक्षक अधियंता, जलसंपदा- सदस्य
९ जिल्हा कृषि अधिक्षक - सदस्य
१० पशुसंवर्धन अधिकारी - सदस्य
११ प्रगतीशिल शेतकरी-१, अल्पभुधारक शेतकरी-१, अशासकीय संस्था (NGO)-३, - प्रतिनिधी

ग्राम स्तरीय समितीची कार्यकक्षा :-

**टंचाई असलेल्या गावांमध्ये / वाडयांमध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा होत आहे किंवा नाही, टँकरच्या फेऱ्या, टँकर पुर्ण भरलेले आहे किंवा नाही याची पाहणी करणे, म.ग्रा.रो.हे.यो. ची कामे उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे, जनावरांच्या चारा छावण्यांची पाहणी , जनावरांची संख्या, छावण्यांमध्ये देण्यात येणाऱ्या इतर सोयी, वैद्यकिय सुविधा वगैरेबाबत तपासणी करणे, दवाखाने आहेत किंवा नाहीत, नैसर्गिक आपत्तीमध्ये आपद्ग्रस्तांना वेळेवर मदत मिळते किंवा नाही याची खात्री करणे, शासकिय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी योग्य ती कारवाई करणे याची माहिती घेणे व त्यांना लक्षात आलेल्या त्रुटया / सुचना समितीस सुचविणे.**

<u>तालुका स्तरीय समितीची कार्यकक्षा :-</u>

शासनाने दुष्काळासंबंधी जाहीर केलेल्या उपाययोजनांची तालुक्यातील गावांत अंमलबजावणी झाली किंवा नाही याची खात्री करणे, किती शेतकऱ्यांचा शेतसारा माफ झाला, किती परिक्षा फी माफ केली, वीज बिलात किती सुट दिली, प्रत्यक्ष लाभार्थ्यांना लाभ झाला किंवा नाही, तालुक्यातील शाळा / महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फि माफ / सुट दिली काय याबाबत तालुक्यात आढावा , नियोजन, नियंत्रण व अंमलबजावणी करणे.

<u>जिल्हा स्तरीय समितीची कार्यकक्षा :-</u>

शासनाने दुष्काळासंबंधी जाहीर केलेल्या उपाययोजनांची जिल्यातील गावांत अंमलबजावणी झाली किंवा नाही याची खात्री करणे, किती शेतकऱ्यांचा शेतसारा माफ झाला, किती परिक्षा फी माफ केली, वीज बिलात किती सुट दिली, प्रत्यक्ष लाभार्थ्यांना लाभ झाला किंवा नाही, जिल्यातील शाळा / महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फी माफ / सुट दिली काय, पीक विमा, पीक कर्ज, पीककर्ज माफी, सावकारांचे कर्ज, टँकर्स , जनावरांच्या छावण्या इत्यादीबाबत संपूर्ण जिल्याचा आढावा , नियोजन, नियंत्रण व अंमलबजावणी करणे.

**समितींचे अधिकार :-**

**१) ग्राम स्तरीय समितीने त्यांना त्यांच्या कार्यकक्षेत दिलेल्या कामाचा आढावा ग्रामस्तरीय समितीत घेऊन त्याबाबत अहवाल वजा शिफारस तालुका स्तरीय समितीस सादर करावा.**

**२) तालुका स्तरीय समितीने त्यांना त्यांच्या कार्यकक्षेत दिलेल्या कामाचा आढावा, नियोजन, नियंत्रण व अंमलबजावणी करणे तसेच ग्रामस्तरीय समितीने दिलेला अहवाल वजा शिफारस तालुका स्तरीय समितीत विचारात घेऊन त्याबाबत अहवाल वजा शिफारस जिल्हा स्तरीय समितीस सादर करावा.**

**३) जिल्हा स्तरीय समितीने त्यांना त्यांच्या कार्यकक्षेत दिलेल्या कामाचा आढावा घेणे, तसेच तालुका स्तरीय समितीने सादर केलेला अहवाल वजा शिफारस जिल्हास्तरीय समितीत विचारात घेऊन त्याबाबत अहवाल वजा शिफारस विभागीय आयुक्तास सादर करावा.**

**४) विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखाली सर्व जिल्हास्तरीय समित्यांचा अहवाल विचारात घेऊन त्याअनुषंगाने सर्वंकष अहवाल तथा प्रस्ताव शासनास सादर करावा.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१०४१५२६३५४३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Ashok M Atram

Digitally signed by Ashok M Atram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e212845163abd708717bb4bef92b6886b147679a5af5a494e268689ab8d696dd, cn=Ashok M Atram
Date: 2016.01.04 15:29:36 +05'30'

**(अशोक आत्राम)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) सर्व विभागीय आयुक्त

२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व मुख्य अधिकारी,
४) सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद / पाटबंधारे विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग.
५) पोलिस महासंचालक, मुंबई
६) संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, मुंबई
८) सर्व मुख्य अभियंता, ग्रामीण / नागरी, पाणी पुरवठा
९) प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणे
१०) आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) मुख्य अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, मुंबई
१२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर
१३) महालेखापाल १/२, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर
१४) मुख्य व्यवस्थापक( पत पुरवठा), बँक ऑफ महाराष्ट्र, १५०१, लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-५
१५) महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय ,५४ वेलस्ली रोड, शिवाजीनगर, पुणे.
१६) सर्व मंत्रालयीन विभाग
१७) वित्त विभाग (व्यय-९)
१८) निवडनस्ती, कायार्सन म-७

**<u>राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा</u>**
**दिनांक १३ ऑगस्ट,२००१ ते दिनांक १० नोव्हेंबर, २००१**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. प्रसुधा-१०००/प्रक्र २६/२००१/१८-अ,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक. ३ ऑगस्ट, २००१.**

**वाचा:-** १) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०९९/प्र.क्र.६६/१८-अ, दि. ३०/१२/१९९९
२) शासन पत्र, सा.प्र.वि. क्र. प्रशासु १०००/प्र.क्र. ६१/२०००/१८-अ, दि. १५/११/२०००
३) शासन निर्णय क्र. प्रशासु १०००/प्र.क्र.७१/२०००/(एक)/१८-अ, दि. २०/१२/२०००
४) प्रशासकीय सुधारणा संदर्भात मा. मुख्य सचिवांच्या बैठकीचे इतिवृत्त, दि.६/६/२००१.

**प्रस्तावना :**

नव्या सहस्त्रकात दमदार पाऊले टाकून महाराष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठी प्रभावी व गतीमान प्रशासन देण्याचा शासनाने संकल्प केला असून वरील ध्येयपूर्तीसाठी शासनाने १०० दिवसांचा कार्यक्रम हाती घेताना खालीलप्रमाणे निर्धार व्यक्त केला.

"जनतेला जास्तीत जास्त अधिकार देऊन त्यांना नियमांच्या जंजाळात बांधून न ठेवता पुरेसे स्वातंत्र्य देण्यावर आमचा भर राहणार आहे. सतत नाविन्याचा शोध घेण्याच्या वृत्तीला आणि उद्योगी प्रवृत्तीला, म्हणजेच उपक्रमशीलतेला आणि उद्यमशीलतेला हवे तेवढे प्रोत्साहन देण्याचा आमचा उद्देश आहे."

१.१ ही संकल्पना पूर्णत्वास नेण्यासाठी शासनाने अनेक पाऊले उचलली आहेत. सर्वसाधारणपणे प्रशासकीय सुधारणा या उच्च स्तरावरुन सुचविल्या जातात, परंतु शासनाच्या विविध स्तरांमध्ये जनतेशी संबंध असलेल्या अनेक बाबी आहेत ज्यांची कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही अधिक चांगल्या प्रकारची जाण असते. परंतु कदाचित विस्तीर्ण शासकीय यंत्रणेत त्यांच्या सूचनांची दखल घेतली जाणार नाही असे समजून अशा लोकोपयोगी सुचना मांडल्या जात नाहीत. तसेच अशा नाविन्यपूर्ण कल्पनांची अंमलबजावणी स्वयंप्रेरणेने विविध स्तरावरुन सहसा होत नाही.

१.२ शासकीय कर्मचारी, जनता व सेवाभावी संस्थांना नाविन्यपूर्ण, विधायक व लोकोपयोगी सूचना करण्यासाठी आणि अशा सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी एक व्यासपीठ मिळावे यासाठी राजीव गांधी प्रगती अभियान व स्पर्धा राबविण्याचा निर्धार शासनाने केला आहे. वरील प्रस्तावाची अंमलबजावणी शीघ्रतेने लोकाभिमुख शासन व्यवस्था निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरेल.

**<u>शासन निर्णय :-</u>**

२. बदलत्या परिस्थितीमुळे, नवीन तंत्रज्ञानामुळे व जागतिकीकरणामुळे समाजामध्ये जे परिवर्तन झाले आहे त्यामुळे प्रशासनामध्येसुध्दा मोठ्या प्रमाणावर बदल करणे गरजेचे आहे. प्रशासन हे तत्पर, लोकाभिमुख व कार्यक्षम असणे अत्यावश्यक आहे. प्रशासनात लोकाभिमुखता व निर्णयशीलता आणण्याकरिता व त्यामध्ये सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्यासाठी शासनाने **<u>राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा</u>** आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

14 AUG 2001

३. या योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.:--

i) अभियानाचे नांव : प्रशासकीय "गतीमानता-"प्रगती" अभियान
ii) पारितोषिकाचे नाव : राजीव गांधी "प्रगती" पारितोषिक
iii) अभियानाचा कालावधी : १३ ऑगस्ट २००१ ते २ ऑक्टोबर २००१

४. अभियानाची सुरुवात :

(i) दिनांक २० ऑगस्ट २००१ रोजी स्वर्गीय राजीव गांधी यांची जन्मतिथी असल्याने,ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते अभियानाचे औपचारिक उद्घाटन होईल. उद्घाटनाच्या वेळी "प्रगती" ची संकल्पना मांडून त्यात सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सक्रीय सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येईल.

(ii) तालुका स्तरावर उप विभागाच्या मुख्यालयात उपविभागीय अधिकारी व तालुका स्तरावर तहसिलदार, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व गटविकास अधिकारी यांना निमंत्रित करतील व तालुका स्तरावरील अधिका-यांच्या सभेमध्ये "प्रगती" ची संकल्पना मांडतील. याच सभेमध्ये सहभागासाठी मा.आमदार, जिल्हा परिषद सदस्य व सभापती,पंचायत समिती यांना विशेष विनंती करतील.

(iii) जिल्हा स्तरावर मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावून जिल्ह्यातील सर्व खासदार/आमदार व अध्यक्ष, जिल्हापरिषद यांना निमंत्रित करतील. याच बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद तसेच इतर जिल्हा स्तरावरील सर्व विभागप्रमुख यांना सुध्दा वरील बैठकीत निमंत्रित करतील व सदर योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत विनंती करतील. मात्र, महापालिकेच्या बाबतीत क्र.४ (iv) प्रमाणे कार्यवाही करावी.

(iv) महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त, नागरी संस्थांचे सर्व विभाग प्रमुख यांची बैठक घेऊन योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत विनंती करतील. मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात यावी आणि मा.संसद सदस्य, विधानसभा/विधानपरिषद सदस्य, नगरपालिकेचे व महानगरपालिकेचे पदाधिकारी यांनाही बैठकीत आमंत्रित करण्यात यावे.

(v) विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त, सर्व विभाग प्रमुख यांची बैठक घेऊन योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबद्दल विनंती करतील.

सर्व स्तरावरील बैठकीच्या वेळी या क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय प्रशिक्षण संस्था व अशासकीय संस्थांना सुध्दा सहभागी करण्यात यावे.

५. अभियानात कुणाला सहभागी होता येईल व प्रस्ताव कुठे पाठवावेत ?

प्रत्येक विभागाच्या सर्व स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांना "प्रगती" अभियान व स्पर्धेत प्रस्ताव पाठवून सहभागी होता येईल. मात्र त्यांच्या सूचनेची/प्रस्तावाची शक्य त्या हद्दीपर्यन्त अंमलबजावणी त्यांच्या कार्यालयातून व्हावी म्हणजे सदर सूचनेची/प्रस्तावाची व्यवहार्यता दिसून येईल. तसेच स्वयंसेवी संस्था आणि प्रशिक्षण संस्था यांना देखिल अभियानात व स्पर्धेत भाग घेता येईल. तालुका व त्याखालील स्तरावरचे प्रस्ताव तहसिलदारांकडे पाठविता येतील. त्यावरील स्तरावरचे प्रस्ताव त्या त्या स्तरावरील परिशिष्ट "अ"मधील मूल्यमापन समितीच्या अध्यक्षांकडे पाठवावेत.

६. अभियानाचा कृती कार्यक्रम :

दिनांक १३ ऑगस्ट २००१ ते २ ऑक्टोबर २००१ या काळात खालील आठ प्रशासकीय सुधारणेसंबंधातील बाबीवर लक्ष केंद्रित करावयाचे आहे.

अ) कार्यालयीन वातावरणात सुधारणा व स्वच्छता,
ब) कार्यपध्दतीचे सुलभीकरण ,
क) ई-गव्हर्नंस (E-Governance),
ड) अनुत्पादक खर्चात काटकसर,
इ) महसूल उत्पन्न वाढविणे,

फ) नियमांचे/अधिनियमांचे एकत्रीकरण करणे व अनावश्यक कायद्यांचे निसरन करणे.

ग) प्रशासन लोकाभिमुख करणे,

ह) कर्मचारी/अधिकारी यांच्या आस्थापना विषयक बाबी अद्ययावत करणे.

या आठ उद्दिष्टांच्या अनुषंगाने प्रत्येक स्तरावर विचारविनिमय, चर्चासत्रे, बैठका, इत्यादि आयोजित करुन अशा मंथनातून गतीमान प्रशासनासाठी प्रशासकीय सुधारणेचे प्रस्ताव तयार करण्यात यावेत. यापैकी ज्या प्रस्तावांची अंमलबजावणी त्या त्या पातळीवर होणे शक्य आहे त्याची अंमलबजावणी देखील करावी. मार्गदर्शनासाठी या आठ सुत्राप्रमाणे कोणकोणत्या विषयांवर लक्ष केंद्रित करावयाचे आहे याचा तपशील परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आला आहे.

६.१ २ ऑक्टोबर,२००१ या अभियान कालावधीनंतर प्रत्येक स्तरावर तहसिलदार /जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त/महानगरपालिका आयुक्त हे त्या स्तरावरील सर्व प्रस्ताव संकलित करतील (ज्यांची अंमलबजावणी होत आहे, अभियानकाळात झाली आहे व यापुढे होणार आहे).

६.२ परिशिष्ट-अ मधील प्रत्येक स्तरावरील समित्या अभियानाच्या सुरुवातीला आणि अभियान संपल्यानंतर प्रत्येक सहभागी होणाऱ्या कार्यालयांस भेट देणार आहेत. भेटीमध्ये सुरुवातीला काय स्थिती होती व अभियानाची कार्यवाही केल्यानंतर काय स्थिती आहे याचा विचार करील. वरील ८ बाबींवर ज्या प्रस्तावामध्ये जास्तीत जास्त प्रगती दिसून येईल अशा प्रस्तावांचे गुणानुक्रम परिशिष्ट "ब"प्रमाणे ठरवून समिती दोन प्रस्तावांची वरच्या स्तराच्या समितीकडे पारितोषिकासाठी शिफारस करील.

६.३ (i) २ ऑक्टोबर २००१ रोजी अभियानाचा कालावधी संपल्याबरोबर सात दिवसांत प्रत्येक तालुका समितीकडून करण्यात आलेल्या प्रस्तावांचा व झालेल्या कामाचा आढावा घेऊन, गुणानुक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. ही यादी तयार करतांना जोडपत्र-ब मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल. गुणानुक्रमानुसार तयार करण्यात आलेल्या यादीमधील तालुका स्तरावरील प्रथम दोन प्रस्तावांची पारितोषिकांसाठी शिफारस करुन संबंधित जिल्हा समितीकडे पाठविण्यात येईल.

(ii) याबरोबर, २ ऑक्टोबर २००१ नंतर पुढील सात दिवसांत जिल्हा समितीवरील विभाग प्रमुखांकडून थेट प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मुल्यमापन करुन गुणानुक्रम देईल.

(iii) तालुक्यांकडून शिफारशी आल्याबरोबर १८ ऑक्टोबर २००१ पासून पुढील सात दिवसांत प्रत्येक जिल्हा समिती वरील (ii) प्रमाणे थेट प्राप्त झालेल्या व तालुका स्तरावरील शिफारस केलेल्या प्रस्तावांचा विचार करुन गुणानुक्रमानुसार यादी तयार करील. ही यादी तयार करतांना जोडपत्र-ब मध्ये दिलल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल. गुणानुक्रमानुसार तयार करण्यात आलेल्या यादीमधील प्रथम दोन प्रस्तावांना जिल्हा स्तरावर पारितोषिकासाठी शिफारस करुन संबंधित विभागीय समितीकडे पाठविण्यात येईल.

(iv) महानगरपालिका स्तरावरील समित्या ११ ऑक्टोबर २००१ पासून सात दिवसांत त्यांच्या स्तरावरील प्रस्तावांचे मुल्यांकन करुन प्रथम दोन प्रस्तावांची शिफारस ( बृहन्मुंबई मनपा वगळून ) विभागीय स्तरावरील समितीकडे करील. मात्र, बृहन्मुंबई महानगरपालिका समिती त्यांच्या प्रथम दोन प्रस्तावांची शिफारस थेट राज्य स्तरावरील प्रगती समितीकडे करील.

(v ) १८ ऑक्टोबर, २००१ रोजी जिल्ह्यांकडून शिफारशी आल्याबरोबर पुढील सात दिवसांत प्रत्येक विभागीय समिती, जिल्हा समितीकडून तसेच महानगरपालिका समितीकडून ( बृहन्मुंबई मनपा वगळून ) आणि विभागीय विभागप्रमुख यांचेकडून थेट आलेल्या प्रस्तावांचे मुल्यमापन करुन गुणानुक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. ही यादी तयार करतांना जोडपत्र-ब मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल. गुणानुक्रमानुसार तयार करण्यात आलेल्या यादीमधील प्रथम दोन प्रस्तावांना विभाग स्तरावर पारितोषिकासाठी शिफारस करुन राज्य स्तरावर प्रगती समितीकडे पाठविण्यात येईल.

(vi) राज्य स्तरावरील प्रगती समितीच्या बैठकांची सुरुवात ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवडयात होईल. या बैठकीत खालील स्तरावरुन प्राप्त प्रस्तावांचा व कामांचा आढावा परिशिष्ट- ब मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात येईल. १) विभागीय, २) बृहन्मुंबई मनपा, ३) राज्यस्तरीय खातेप्रमुख, यांचेकडून थेट आलेल्या व ४)मंत्रालयीन विभागाकडून थेट प्राप्त प्रस्तावामधून गुणानुक्रमानुसार प्रथम, व्दितीय व तृतीय

पारितोषिक निवडण्यात येईल. वरील प्रक्रिया दिनांक १० नोव्हेंबर, २००१ पर्यन्त पूर्ण होईल असे अपेक्षित आहे.

**(vii) तथापि, एका प्रस्तावाची एका स्तरावरील एकाच पारितोषिकासाठी निवड करता येईल. म्हणजे जर एका स्तरावरील प्रस्तावाची वरील स्तराच्या पारितोषिकासाठी निवड झाली तर त्या स्तरावरील गुणानुक्रमे त्यानंतरच्या प्रस्तावास त्याचे पारितोषिक अनुज्ञेय राहील.**

टिप :- प्रस्ताव तांत्रिक वाटल्यास प्रत्येक स्तराच्या समितीस संबंधित विभागातील विषयाशी संबंधित तज्ञांना निमंत्रित करुन व त्यांचा सल्ला घेऊन निर्णय घेता येईल.

७. १३ ऑगस्ट ते २ ऑक्टोबर २००१ या पूर्ण अभियान कालावधीत वरीलप्रमाणे सर्व उद्दिष्टांवर विचारविनिमय, मंथन व प्रस्ताव तयार करुन अंमलबजावणी चालू करता येईल. दिनांक १३ ऑगस्ट,२००१ ते दिनांक २ ऑक्टोबर,२००१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या राजीव गांधी प्रशासकीय सुधारणा "प्रगती" कार्यक्रमाची सध्या आहे त्याच कर्मचारीवृंदाकडून अंमलबजावणी करावयाची आहे. त्याकरीता जादा/अतिरिक्त कर्मचारी/अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना दैनंदिन कामात व्यत्यय येऊ देऊ नये. दिलेल्या कालमर्यादेतच काम पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. त्याच प्रमाणे वरील उद्दिष्टाच्या अनुषंगाने अशा सुधारणा या अगोदरच (१८/१०/१९९९ पासूनच्या, म्हणजेच नवीन शासन सत्तेवर आल्यापासून) त्या त्या स्तरावर व कार्यालयात कार्यान्वित असतील तर त्यांचाही विचार स्पर्धेत सहभागासाठी करता येईल.

८. एकदा प्रस्ताव तयार झाल्यावर त्या प्रस्तावांची अंमलबजावणी लगेचच त्या त्या स्तरावर व विभागात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

**९. समित्या - गुण क्रमांकाचे निकष- वेळापत्रक- पारितोषिक**

**९.१** प्रशासकीय गतिमानात (प्रगती) अभियान कार्यक्रमाच्या छाननीकरीता कार्यान्वित केलेल्या वेगवेगळया स्तरावरील समित्यांचा तपशिल परिशिष्ट"अ" मध्ये देण्यात आला आहे. अभियानातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी व गुणानुक्रम ठरविण्यासाठी समित्यांसाठी मूल्यमापनाचे निकष व मापदंड परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आले आहेत. छाननी व मूल्यमापन करण्याचे वेळापत्रक परिशिष्ट "क" मध्ये देण्यात आले आहे.

**९.२** लोकोपयोगी प्रस्तावांच्या संकल्पनेसाठी व अशा प्रस्तावांच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी प्रत्येक स्तरावर दोन पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. मात्र, राज्य स्तरावर ३ पारितोषिके ठेवण्यात आलेली आहेत. पारितोषिकांचा तपशील परिशिष्ट "ड" मध्ये देण्यात आलेला आहे. जे प्रस्ताव तालुका, जिल्हा, महानगरपालिका, विभागीय व राज्य स्तरावर चर्चासत्रे, विचारविनिमय व बैठकांतून अभियानात निवडले जातील, त्यांचे मुल्यमापन २ ऑक्टोबर, २००१ नंतर करण्यात यावे. परिशिष्ट "अ" मधील समित्यांनी प्रस्तावांचे मुल्यमापन करतांना परिशिष्ट "ब" मधील दिलेल्या निकषांचा वापर करुन परिशिष्ट "क" मध्ये दिलेल्या वेळापत्रकात निर्णय द्यावा.

**९.३ निमशासकीय सदस्य**

समितीच्या बैठकीसाठी हजर राहणाऱ्या स्वयंसेवी व खाजगी सदस्यांना तालुका व जिल्हा स्तरावर वर्ग-ब च्या अधिकाऱ्याप्रमाणे व विभागीय व राज्य स्तरावरील बैठकीसाठी येणाऱ्या सदस्यांना वर्ग-अ च्या अधिकाऱ्यांप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

**१०.१** यासाठी अपेक्षित रु.१४२.७० लाख इतक्या खर्चास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

**१०.२** समितीच्या बैठकीसाठी हजर रहाणाऱ्या स्वयंसेवी, इतर संस्था व खाजगी सदस्यांना देय प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याचा खर्च त्या त्या कार्यालयांच्या उपलब्ध अनुदानातून भागवावा. तालुका, जिल्हा , महानगरपालिका, व विभागीय स्तर या स्तरांवरील पारितोषिकांसाठीचा अपेक्षित खर्च त्या त्या कार्यालयांच्या आकस्मिक खर्चातून भागविण्यात यावा व यासाठी अतिरिक्त निधीची गरज भासल्यास त्यासाठी त्यांच्या विभागामार्फत शासनाच्या नियोजन/वित्त विभागाकडे मागणी करावी. राज्य स्तरिय समितीच्या प्रवास/दैनिक भत्त्याचा खर्च रु.४.५० लाख भागविण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रकात या बाबीची तरतूद करण्यात यावी. हा खर्च मागणी क्र.ए-५, "२०५२-सेक्रेटरीयट-सर्वसाधारण सेवा, ०९० - सेक्रेटरीयट (१), सामान्य प्रशासन विभाग, १२-व्यावसायिक व विशेष सेवा (संकेतांक क्र.२०५२००२५)" या लेखाशिर्षाखाली वित्तिय वर्ष २००१-२००२ मधील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल. राज्यस्तारीय पारितोषिकांसाठीचा अपेक्षित खर्च रु.६.०० लाख सामान्य प्रशासन

एच ५२७(४०८०-०८-०१)२३अ

विभागाच्या आकस्मिक खर्चातून भागविण्यात यावा. अतिरिक्त निधीची गरज असेल तर वित्त विभागाकडे तसा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

११. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.पीएस(एफ) ३२२० दि.२.८.२००१ अन्वये प्राप्त सहमतीने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१२. उपरोक्त अभियान व स्पर्धेसाठी सामान्य प्रशासन विभाग हा केंद्रीय ( Nodal ) अेजन्सी राहणार आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श्री.रंगनाथन)
शासनाचे मुख्य सचिव



१. मा.राज्यपालांचे सचिव (५ प्रती).

203

८९

## परिशिष्ट - ' अ '

**"प्रगती" अभियानासाठी नेमण्यात आलेल्या विविध स्तरावरील समित्या**

**(१)तालुका स्तर समिती :-**

उपविभागीय अधिकारी-अध्यक्ष
अध्यक्ष/निमंत्रकांनी निवडलेली अशासकीय संस्था/ शासनाच्या प्रशिक्षण संस्था -- सदस्य
गटविकास अधिकारी -- सदस्य
तहसिलदार--सदस्य सचिव.

**(२)जिल्हा स्तर समिती (महानगरपालिका क्षेत्र सोडून) :-**

जिल्हाधिकारी - अध्यक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद-- सदस्य
अध्यक्षांनी निवडलेली अशासकीय संस्था/ शासनाच्या प्रशिक्षण संस्था -- सदस्य
निवासी उप जिल्हाधिकारी--सदस्य सचिव.

**(३)महानगरपालिका क्षेत्रासाठी समिती**

महानगरपालिका आयुक्त- अध्यक्ष
अध्यक्षांनी निवडलेली अशासकीय संस्था/ शासनांच्या प्रशिक्षण संस्था -- सदस्य
जिल्हाधिकारी - सदस्य
मनपा आयुक्तांनी निवडलेले उपायुक्त/अपर आयुक्त- सदस्य सचिव
टीप:- बृहन्मुंबईच्या समितीमध्ये आयुक्त, मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण सदस्य राहतील. तसेच मंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील अन्य महानगरपालिकेच्या समितीमध्ये प्राधिकरणाचे सदस्य राहतील. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका समितीमध्ये आयुक्त,पीसीएनटीडीए सदस्य राहतोल व नागपूर मनपा समितीमध्ये सभापती,नागपूर सुधार प्रन्यास सदस्य राहतील.

**४)विभागीय स्तरावरील समिती**

विभागीय आयुक्त- अध्यक्ष
अध्यक्षांनी निवडलेली अशासकीय संस्था/ शासनाच्या प्रशिक्षण संस्था -- सदस्य
एक महानगरपालिका आयुक्त- सदस्य ( विभागीय आयुक्तांनी निवडलेले मनपा आयुक्त )
विभागीय आयुक्त निवडतील ते उप/सहाय्यक आयुक्त - सदस्य

**५) राज्यस्तरीय गतिमान प्रशासन सल्लागार समिती (प्र-गती समिती)**

याबाबत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

## परिशिष्ट "ब"

**कार्यालयीन वातावरणात सुधारणा व स्वच्छता**

१. जुने मोडके फर्निचर आणि इतर अनावश्यक वस्तू, कायम निकामी झालेल्या गाडया व यंत्रसामुग्रीची विल्हेवाट लावणे.
२. जुन्या परंतु आवश्यकता नसलेल्या नस्त्या अभिलेख कक्षाकडे पाठविणे व नष्ट करणे
३. कार्यालयाची रचना योग्य प्रकारे करणे
३. कागदपत्रे व सामग्री व्यवस्थित ठेवणे
४. कार्यालयाची किरकोळ दुरुस्ती व सुधारणा करणे.

**कार्यपध्दतीचे सुलभीकरण करणे.**

१.अधिकाराचे विकेंद्रीकरण करणे तालुका, जिल्हा, विभागप्रमुख व शासन स्तरावर कार्यपध्दतीचे सुलभीकरण करणे
२.नियमांचे सुलभीकरण करणे व नियम अद्ययावत करणे
३.प्रकरण/ नस्ती सादर करण्याचे स्तर कमी करणे
४.कार्यपध्दतीचे विश्लेषण करुन कार्यपध्दतीमध्ये बदल करणे

**ई गव्हर्नन्स (E Governance)**

संगणकाचा वापर, संगणक वापरणाऱ्यांची संख्या, वर्ड प्रोसेसर, ई-मेल, एक खिडकी योजना, संगणकांची संख्या, संगणकाव्दारे नागरिकांशी थेट संपर्क, संगणकाच्या विविध पॅकेजचा वापर (वेतनपत्र,आस्थापना,इत्यादि )

**अनुत्पादक खर्चात काटकसर**

कर्मचाऱ्यांचे सुसूत्रिकरण,आस्थापना खर्चातील कपातीची टक्केवारी,योजनेतर खर्चात कपातीची टक्केवारी,केलेल्या खर्चाची उपयोगिता व उत्पादकता वाढविणे.

**महसूल उत्पन्न वाढविणे**

उत्पन्नातील प्रत्यक्ष व टक्केवारीतील वाढ, झालेले काम आणि अपेक्षित उद्दिष्टे, हाताळलेली क्षेत्रे (सर्व क्षेत्रे हाताळली आहेत काय)

**नियमांचे/अधिनियमांचे एकत्रीकरण करणे**

अधिनियम, निश्चित केलेली कार्यपध्दती, पाठविलेले प्रस्ताव, प्रत्यक्ष केलेले सुलभीकरणे, वेळेतील कपात व निर्णयाच्या स्तरातील कपात.

**प्रशासन लोकाभिमुख करणे**

एक खिडकी योजनेची अंमलबजावणी, नागरिकांच्या सनदाची अंमलबजावणी, तक्रार निवारण दिन, लोकशाही दिन व मुख्यालय दिन कार्यक्रमाची अंमलबजावणी, प्रकरणे निकाली काढणे, कर्मचारी/अधिकारी यांनी मुख्यालयात वास्तव्य, आगंतुकासाठी सोयी, व्यवस्था व मार्गदर्शन, इत्यादि.

**कर्मचाऱ्यांच्या आस्थापना विषयी बाबी अद्ययावत करणे**

वेतन, निवृत्ती वेतन, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी, ज्येष्ठता सूची, सेवापुस्तकांचे अद्ययावतीकरण, अग्रिमांचे हिशेब, इत्यादि

**"प्रगती" अभियानातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी व गुणानुक्रम ठरविण्यासाठी निकष :-**

| | |
|---|---|
| अ) अनुकरणीय (Replicable)- | १५ |
| ब) सहज अंमलबजावणी करण्याजोगे (Easily Implementable) | १५ |
| क) ज्यांचे स्पष्ट मूल्यमापन करता येईल.(Benefits which are measured quantitatively) | १५ |
| ड) सर्व स्तरावर/इतर विभागातसुध्दा लागू पडण्यासारखे - | १५ |
| इ) नागरीकांना ज्याचा थेट फायदा होईल. | १५ |
| फ) ज्याची अंमलबजावणी सफलतापूर्वक झाली आहे( Already Implemented successfully) | १५ |
| ग) समितीने ठरविलेले इतर निकष- ( मात्र निकष मोजण्याजोगे असावेत ) | १० |
| एकूण:- | १०० |

## परिशिष्ट "क"

प्रस्ताव संकलित करणे, छाननी, मुल्यमापन व अंमलबजावणी करण्याचे वेळापत्रक (अभियानानंतरचे)

**प्रस्तावांचे मूल्यमापन व छाननी करण्याचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| तालुका स्तर :-- | दिनांक ३ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर २००१ |
| जिल्हा स्तर :-- | दिनांक ११ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २००१ |
| महानगरपालिका स्तर :-- | दिनांक ११ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २००१ |
| विभागीय स्तर :- | दिनांक १८ ऑक्टोबर, ते २५ ऑक्टोबर, २००१ |
| राज्य स्तर :-- | दिनांक २९ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २००१ |

पारितोषिक वितरण कार्यक्रम नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात घेण्यात येईल.

वरील तारखा या फक्त मार्गदर्शनाकरिता देण्यात आलेल्या आहेत, जेणेकरुन समिती स्पर्धेतील प्रस्तावांची छाननी, मूल्यमापन वेळेत करील. मात्र एका स्तरावर काम झाल्याबरोबर दुसऱ्या स्तरावर प्रस्तावावरील तारखांच्या अगोदर पाठविता येईल. प्रस्ताव आल्यानंतर वरचे स्तराचे समितीने प्रस्तावांचा विचार करावा. छाननी करताना सर्व प्रस्तावांचा विचार करुन समितीने वरील तारखेच्या अगोदरच अहवाल द्यावा.

एकदा एका समितीच्या स्तरावर प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला त्या स्तरावर त्या प्रस्तावांची ताबडतोब अंमलबजावणी करण्यात यावी.

जर काही प्रस्तावास वरिष्ठस्तरावरुन आदेशांची गरज असेल तर अभियान कालावधीतच आदेश घेऊन अंमलबजावणीची कार्यवाही करण्यात यावी.

## परिशिष्ट 'ड'

| अ.क्र. | पारितोषिकांचा तपशिल | रक्कम रुपये | एकूण खर्च (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | तालुका स्तर -- सर्व प्रथम<br>-- व्दितीय क्रमांक | १०,०००<br>५,००० | ५३.४० |
| २ | जिल्हा स्तर -- सर्व प्रथम<br>-- व्दितीय क्रमांक | २५,०००<br>१५,००० | १४.०० |
| ३ | महानगरपालिका स्तर -- सर्व प्रथम<br>-- व्दितीय क्रमांक | २५,०००<br>१५,००० | ६०.०० |
| ४ | विभागीय स्तर -- सर्व प्रथम<br>-- व्दितीय क्रमांक | ५०,०००<br>३५,००० | ४.८० |
| ५ | राज्य स्तर -- सर्व प्रथम<br>-- व्दितीय क्रमांक<br>-- तृतीय क्रमांक | ३ लक्ष<br>२ लक्ष<br>१ लक्ष | ६.०० |
| | | एकूण | १३८.२० |

टीप:- वरील पारितोषिक व्यक्तीगत द्यावयाचे नसून कार्यालय सुधारणेसाठी वापरावयाचे आहे. कारण प्रस्तावांची उत्कृष्ट अंमलबजावणी पण अपेक्षित आहे. तथापि, पारितोषिकांसाठी निवडलेल्या (वेगवेगळया स्तरावर) प्रस्तावांसाठी संबंधित व्यक्तींना पारितोषिक वितरण समारंभात (त्या त्या स्तरावरील) मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : अहत १६१०/प्र.क्र.६४/१०/११-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ फेब्रुवारी,२०११

संदर्भ :-१) शासन परिपत्रक क्र.सीडीआर १०९६/प्र.क्र.२०/९६/११, दिनांक १३ डिसेंबर, १९९६.
२) शासन परिपत्रक क्र.भ्रनिस १०९७/५०/प्र.क्र.२४/९७/१८-अ, दिनांक ११ मार्च, १९९७.
३) शासन परिपत्रक क्र.भ्रष्टानि २००१/प्र.क्र.७/११-अ, दिनांक १६ जून, २००१.
४) शासन परिपत्रक क्र.भ्रष्टानि २००२/प्र.क्र.७/११-अ, दिनांक १० ऑक्टोबर, २००२.
५) शासन परिपत्रक क्र.भ्रष्टानि २००२/प्र.क्र.७/११-अ, दिनांक ५ मार्च, २००३.
६) शासन परिपत्रक क्र.भ्रनिस २००७/प्र.क्र.८/०७/११-अ, दिनांक २६ डिसेंबर, २००७
७) शासन परिपत्रक क्र.अहत १६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक १ नोव्हेंबर, २००८.
८) शासन परिपत्रक क्र.अहत १६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, २००८.
९) शासन परिपत्रक क्र.अहत १६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक ३ ऑगस्ट, २००९
१०) शासन परिपत्रक क्र.अहत १६०९/प्र.क्र.८२/०९/११-अ, दिनांक ३ ऑगस्ट, २००९

## परिपत्रक

शासन यंत्रणेतील भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन करण्याचे धोरण राबविण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी विभागीय, जिल्हा, तालुका पातळीवर भ्रष्टाचार निर्मूलन समित्या स्थापन करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला होता. त्याबाबत वेळोवेळी संदर्भांकित परिपत्रके निर्गमित करण्यात आली होती. सदर सर्व परिपत्रकांचा आढावा घेऊन **संदर्भात नमूद केलेली सर्व परिपत्रके अधिक्रमित करून,** विभागनिहाय जिल्हास्तरीय दक्षता समित्या, विभागीय, जिल्हा व तहसिल स्तरावर भ्रष्टाचार निर्मुलन समित्या यांची रचना, त्यावरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या, कार्यकक्षा, बैठकांची वारंवारिता व कार्यपद्धती याबाबत खालील प्रमाणे सर्व समावेशक आदेश देण्यात येत आहेत.

## २. भ्रष्टाचार निर्मुलन समित्यांची रचना:-

**(अ) विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती :-** या समितीत खालीलप्रमाणे सदस्य असतील :-

| | | |
|---|---|---|
| १) विभागीय आयुक्त | .. | अध्यक्ष |
| २) पोलीस उप महानिरीक्षक/पोलीस आयुक्त | .. | सदस्य |
| ३) पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | .. | सदस्य |
| ४) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग | .. | सदस्य |
| ५) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | .. | सदस्य |
| ६) अधीक्षक, कृषि अधिकारी | .. | सदस्य |
| ७) मुख्य वनरक्षक | .. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८) सह निबंधक, सहकारी संस्था | .. | सदस्य |
| ९) अशासकीय सदस्य (किमान ५ व कमाल १०) | .. | सदस्य |
| १०) उप आयुक्त (महसूल) | .. | सदस्य - सचिव |

**(ब) <u>जिल्हा स्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती</u> :-** या समितीत खालीलप्रमाणे सदस्य असतील :-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | .. | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | .. | सदस्य |
| ३) पोलीस अधीक्षक | .. | सदस्य |
| ४) पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | .. | सदस्य |
| ५) अधीक्षक/कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | .. | सदस्य |
| ६) अधीक्षक/कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | .. | सदस्य |
| ७) विभागीय मृद संधारण अधिकारी | .. | सदस्य |
| ८) जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था | .. | सदस्य |
| ९) अशासकीय सदस्य (किमान ५ व कमाल १०) | .. | सदस्य |
| १०) निवासी उप जिल्हाधिकारी | .. | सदस्य - सचिव |

**(क) <u>तालुका स्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती</u> :-** या समितीत खालीलप्रमाणे सदस्य असतील :-

| | | |
|---|---|---|
| १) तहसिलचे प्रभारी सहायक किंवा उप जिल्हाधिकारी | .. | अध्यक्ष |
| २) पोलीस उप अधीक्षक | .. | सदस्य |
| ३) उप अभियंता, जलसंपदा विभाग | .. | सदस्य |
| ४) उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | .. | सदस्य |
| ५) उप विभागीय मृद संधारण अधिकारी | .. | सदस्य |
| ६) सहायक/उप निबंधक, सहकारी संस्था | .. | सदस्य |
| ७) गट विकास अधिकारी | .. | सदस्य |
| ८) अशासकीय सदस्य (किमान ३ व कमाल ५) | .. | सदस्य |
| ९) तहसिलदार | .. | सदस्य - सचिव |

**३. <u>विभागीय, जिल्हा स्तरीय, तालुका स्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्या नेमणूकीचे गट</u> :-** विभागीय/जिल्हा/तालुका स्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांमधील अशासकीय सदस्यांची नेमणूक समाजाच्या खालील गटांमधील व्यक्तींमधून केली जाईल.

१) शासकीय व संरक्षण दलातील <u>सेवानिवृत्त</u> व्यक्ती
२) स्वातंत्र्य सैनिक
३) स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी
४) लोकांचा विश्वास संपादन केलेल्या व्यक्ती
५) लोक प्रतिनिधी
६) श्री अण्णा हजारे सुचवितील अशी व्यक्ती
७) प्राचार्य
८) समाजसेवक

विभागीय/जिल्हा/तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीवर अशासकीय सदस्यांची नेमणूक करताना प्रत्येकी एक सदस्य, (१) महिला, (२) अनुसूचित जाती/जमाती, (३) विमुक्त व भटक्या जाती/जमाती, (४) इतर मागासवर्गीय या प्रवर्गामधून निवडणे आवश्यक राहील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत अशासकीय सदस्यांची एकूण संख्या १० पेक्षा अधिक राहणार नाही.

४. **विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या नेमणूकीबाबत कार्यपद्धती :-** विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांवर अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्याची कार्यवाही जलदगतीने व्हावी यादृष्टीने विभागीय जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

१) **विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती** :- विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हाधिकाऱ्यांकडून विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी शिफारशी मागवाव्यात आणि सदर शिफारशी तसेच, विभागीय आयुक्तांच्या नजरेत या समितीवर काम करण्यास योग्य अन्य काही नावे असल्यास, त्यामधून या व्यक्तींचे पोलीस अहवाल विचारात घेऊन नियुक्त करावी. असे करताना, उपरोक्त परिच्छेदात नमूद सर्व घटकांना सदर समितीवर प्रतिनिधीत्व प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी.

२) **जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती** :- जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील योग्य व्यक्तींची त्यांचे पोलीस अहवाल लक्षात घेऊन आवश्यक त्या प्रमाणात जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीवरील सदस्यांची नियुक्ती करावी. असे करताना, उपरोक्त परिच्छेदात नमूद सर्व घटकांना सदर समितीवर प्रतिनिधीत्व प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी.

३) **तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समिती** :- जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील तालुक्यांमध्ये त्या त्या तालुक्यामधील रहिवाशी असलेल्या योग्य व्यक्तींची त्यांचे पोलीस अहवाल लक्षात घेऊन आवश्यक त्या प्रमाणात तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीवरील सदस्यांची नियुक्ती करावी. असे करताना, उपरोक्त परिच्छेदात नमूद सर्व घटकांना सदर समितीवर प्रतिनिधीत्व प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी.

उपरोक्त समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या करताना सबंधित व्यक्तिंचा पोलीस अहवाल प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे. मात्र, पोलीस अहवाल प्राप्त करण्यास लागणारा कालावधी विचारात घेता सर्वसाधारण माहिती व संबंधितांकडून प्रमाणपत्र घेऊन प्रथम नियुक्ती करून नंतर पोलीस अहवाल प्राप्त करून घेण्याबाबतही विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी विचार करावा. एखाद्या सदस्याच्या नियुक्तीनंतर प्राप्त झालेला पोलीस अहवाल प्रतिकूल असेल तर अशा सदस्याची नियुक्ती रद्द करण्यात यावी.

५. **भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांवरील अशासकीय सदस्यांचा कार्यकाल:** या समित्यांवरील अशासकीय सदस्यांचा कार्यकाल **दोन वर्षे** इतका राहील. अशासकीय सदस्य म्हणून सध्या करण्यात आलेल्या नियुक्त्या त्या सदस्यांचा दोन वर्षाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत कायम राहतील.

६. **भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांची कार्यकक्षा :-** या समित्यांची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

(अ) विलंब, गैरव्यवहार, अकार्यक्षमता व इतर कारणाने होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबतच्या तक्रारींची/ गाऱ्हाण्यांची दखल घेणे म्हणजेच आलेल्या विशिष्ट अभिकथनाबाबत स्वतंत्रपणे प्राथमिक चौकशी करण्याच्या दृष्टीने तजवीज करणे.

(ब) तीन महिन्यातून एकदा (जून महिन्यात, सप्टेंबर महिन्यात, डिसेंबर महिन्यात व मार्च महिन्यात) म्हणजेच ३ महिन्यात आलेल्या तक्रारींचे व त्यावर केलेल्या उपाययोजनांबाबतचा आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणांवर सत्वर कार्यवाही होईल याबद्दल मार्गदर्शन करणे.

(क) भ्रष्टाचार कोणत्या क्षेत्रात/ठिकाणी घडत आहे याबद्दल माहिती घेणे व त्या क्षेत्रातील किंवा ठिकाणी भ्रष्टाचार निर्मूलनासाठी उपाययोजना सुचविणे.

(ड) प्रशासकीय कार्यपद्धती, नियम व इतर शासकीय व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचारास वाव राहू नये व त्यांचे निर्मूलन व्हावे यादृष्टीने सुलभता व पारदर्शकता आणण्याबाबत शिफारस करणे, जेणेकरुन सामान्य जनतेला प्रशासकीय कार्यपद्धतीबद्दल साशंकता वाटणार नाही व त्यांची कामे सहजगत्या कशी होऊ शकतील याबाबत सूचना करणे.

(इ) या समित्यांनी आपले काम करताना त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जनतेच्या तक्रारी किंवा अभिकथने ऐकून घेण्यासाठी वरीलप्रमाणे त्या महिन्यातून कमीत कमी एक दिवस राखून ठेवावा. यास पूर्वप्रसिद्धी देऊन समितीने आपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी म्हणजे विभागीय समितीने विभागीय मुख्यालय, जिल्हा समितीने जिल्हा मुख्यालय व तालुका समितीने तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी जनतेच्या तक्रारी/गाऱ्हाणे ऐकून त्या स्वीकाराव्यात. याबद्दल करावयाच्या कार्यवाहीच्या सूचना संबंधितांना द्याव्यात.

(फ) तालुका स्तरावरील समितीने दर तिमाहीचा कामाचा अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील महिन्याच्या १० तारखेच्या आत सादर करावा. जिल्हाधिकारी जिल्हास्तरीय समितीचा व जिल्हा अंतर्गत सर्व तालुका स्तरावरील समित्यांचा तिमाही अहवाल एकत्र करुन त्याच महिन्याच्या २० तारखेपर्यंत विभागीय आयुक्तांना सादर करतील. विभागीय आयुक्त आपले तिमाही अहवाल व आपल्या विभागीय जिल्ह्यांचे तिमाही अहवाल एकत्रितपणे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सेवा) यांचेकडे त्याच महिन्याच्या ३० तारखेपर्यंत पाठवतील.

**७. <u>माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार/गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत :-</u>**

मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ ऑगस्ट,२००८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने यासंदर्भात माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार/गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय सेवेतील त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात त्वरीत दंडात्मक कार्यवाही करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्देश दण्यात येत आहेत.

**(अ)** शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध कायद्यातील कलम १०(२)(३) प्रमाणे "शासकीय अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने नेमून दिलेले काम व त्यांचेशी संबंधित असलेली कर्तव्ये पार पाडताना जाणूनबुजून किंवा हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले तर त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करता येते." अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात कर्तव्य पालनात केलेली कसूर नमूद करण्याच्या तरतूदीप्रमाणे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. तसेच, माहितीच्या अधिकाराखाली अथवा अन्यथा प्राप्त माहितीद्वारे शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार अथवा गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय सेवेतील त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांच्याविरुद्ध <u>**विनाविलंब विभागीय चौकशीची कारवाई**</u> करावी.

**(ब)** तसेच, उपरोक्त परिच्छेद २ ते ७ मधील तरतूदीनुसार, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक आयोजित करण्याबाबतची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे, अशा अधिकाऱ्यांकडून बैठक बोलविण्यास विलंब झाल्यास, शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध कायद्यातील कलम १० (२) (३) मधील तरतूदीनुसार त्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी.

**(क)** "वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्धच्या भ्रष्टाचार अथवा गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्याविरुद्ध कार्यवाही करीत नाहीत अथवा ती टाळण्याचा प्रयत्न करतात अशी वस्तुस्थिती सिद्ध झाल्यास, अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय विभागांनी विभागीय चौकशीची कार्यवाही करावी.

८. **विभागनिहाय जिल्हा दक्षता समित्या:-** प्रत्येक प्रशासकीय विभागाने जिल्हा हा घटक समजून त्या जिल्ह्यातील गट अ/वरिष्ठतम गट-ब अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली जिल्हा स्तरीय दक्षता समिती गठीत करावी.

(अ) वरिष्ठतम अधिकारी :- अध्यक्ष

(ब) दुसऱ्या फळीतील दोन अधिकारी
(त्यापैकी एक महिला अधिकारी उपलब्ध असल्यास) :- सदस्य

वरीलप्रमाणे गठित होणाऱ्या विभागीय जिल्हा दक्षता समितीचे कामकाज या परिपत्रकानुसार होत आहे याबाबत देखरेख ठेवण्याचे काम जिल्हा स्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती करेल व जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांकडून उचित कार्यवाही होत नाही असे आढळल्यास ती बाब, संबंधित प्रशासकीय विभागाच्या निदर्शनास आणावी. हे काम जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे सोपविण्यात आले असल्याने संदर्भातील अ.क्र. ८ येथील परिपत्रकान्वये विहित केलेल्या संनियंत्रण समित्या रद्द करण्यात याव्यात.

**९. तक्रारदाराने विभागनिहाय जिल्हा दक्षता समिती अथवा विभागीय/जिल्हा/ तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे तक्रार दाखल करणे व त्यावरील कार्यवाहीसाठी कार्यपद्धती व कालमर्यादा :-**

**(अ)** माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार/गैरव्यवहार/अफरातफर केल्याचे पुरावे हे, संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहे, त्या तालुक्यातील भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभगाच्या परिच्छेद ८ नुसार गठित जिल्हा दक्षता समितीकडे तक्रारदारास सादर करता येतील.

**(ब)** सदर भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारीसोबतच्या पुराव्यांमध्ये तथ्य आढळल्यास ३० दिवसाच्या आत सदर तक्रारी, पुराव्यासह तपासून व आवश्यक असल्यास साक्षी घेण्याकरीता, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याविरुद्ध पुरावे सादर झाले आहेत तो ज्या कार्यालयामध्ये कार्यरत आहे, त्या कार्यालयाच्या परिच्छेद ८ नुसार गठीत केलेल्या जिल्हा दक्षता समितीकडे पाठविण्यात याव्यात.

**(क)** उपरोक्त "अ" व "ब" नुसार प्राप्त झालेल्या तक्रारींच्या संदर्भात उपरोक्त परिच्छेद ८ नुसार गठीत करण्यात आलेल्या जिल्हा दक्षता समितीने ९० दिवसात निर्णय घ्यावा. त्यामध्ये जर संबंधित अधिकारी/कर्मचारी सकृतदर्शनी दोषी दिसत असेल तर त्याबाबत शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांना आपला अहवाल सादर करावा. त्याची प्रत शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यास लगत वरिष्ठ असणाऱ्या प्राधिकाऱ्यास सादर करावी.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद ८ नुसार गठीत केलेल्या जिल्हा स्तरीय दक्षता समितीकडे पाठविण्यात आलेल्या तक्रारींवर ९० दिवसांच्या कालावधीत निर्णय घेण्याची कार्यवाही झाली नाही तर तक्रारदारास त्याची

तक्रार जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे पुराव्यासह सादर करता येईल. त्यास अनुसरुन जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीने दक्षता समिती प्रमुखांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतची शिफारस त्यांच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्यास सादर करावी. त्याचप्रमाणे ज्यांच्याविरुद्ध पुरावे सादर झाले आहेत, त्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध पुराव्याची तपासणी करण्यासाठी संबंधित कार्यालयातील वरिष्ठतम अधिकाऱ्याकडे जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीने पाठवावी. संबंधित अधिकाऱ्यांनी तपासणी करुन योग्य त्या अभिप्रायासह आपला अहवाल जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीला सादर करावा. अशा अहवालानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी सकृतदर्शनी दोषी दिसून येत असल्यास त्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर विभागीय चौकशीची कारवाई करण्यासाठी संबंधित अहवाल जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीने शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्यास पाठवावा व त्याची एक प्रत शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याच्या लगत वरिष्ठ असलेल्या प्राधिकाऱ्याकडे सादर करावी.

**(इ)** जिल्हा प्रमुख तसेच विभागीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे पुरावे तक्रारदाराने विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे सादर करावेत. या सादर झालेल्या पुराव्यांच्या आधारे संबंधित अधिकारी/कर्मचारी सकृतदर्शनी दोषी ठरत असल्यास विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीने आपला अहवाल ९० दिवसात संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांच्या शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यास पाठवावा व त्याची एक प्रत शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याच्या लगत वरिष्ठ असलेल्या प्राधिकाऱ्याकडे सादर करावी.

**(ई)** वरीलप्रमाणे कार्यवाही करीत असताना, ज्या प्रकरणी शासन हे शिस्तभंग विषयक प्राधिकारी ठरत असेल, त्या प्रकरणी असा अहवाल संबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांना सादर करण्यात यावा.

**(फ)** जिल्हा दक्षता समितीने आपल्या बैठका आवश्यकतेनुसार परंतु किमान ३ महिन्यातून एकदा घ्याव्यात.

**(ग)** वरीलप्रमाणे कार्यवाही करीत असताना, जिल्हा दक्षता समिती, तालुका/जिल्हा/विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा संबंधित अधिकारी/कर्मचारी दोषी ठरत नसल्याचे आढळून आल्यास, त्याप्रमाणे संबंधित तक्रारदारास कळवावे.

**(घ)** सदर शासन परिपत्रकातील तरतूदी सर्व कार्यालय प्रमुखांनी आपल्या कार्यालयात दर्शनी जागी प्रदर्शित करुन सामान्य जनतेला याची माहिती होईल, असे पहावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०११०२०४१९०५१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

०४/०२/११

( पां.जो.जाधव )
उप सचिव

प्रति,

राज्यपालांचे प्रधान सचिव

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य
प्रधान सचिव(सेवा), सामान्य प्रशासन विभाग
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त/पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ पोलीस महानिरीक्षक व संचालक, एसीबी, महाराष्ट्र राज्य, मुबई/सर्व पोलीस उप महानिरीक्षक/ सर्व पोलीस आयुक्त/ सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व अधीक्षक, कृषी अधिकारी
सर्व मुख्य वन संरक्षक
सर्व सहनिबंधक, सहकारी संस्था
सर्व उप आयुक्त (महसूल)
सर्व जिल्हाधिकारी **(ह्यांना विनंती की, या परिपत्रकात नमूद केल्यानुसार तालुकास्तरावर भ्रष्टाचार निर्मूलन समित्या नेमण्याबाबत त्यांच्या अधिपत्याखालील तहसिलांचे प्रभारी सहायक/ उप जिल्हाधिकारी यांना तात्काळ सूचना द्याव्यात.)**

सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व पोलीस अधीक्षक
सर्व अधीक्षक/कार्यकारी अभियंता, पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग /सर्व विभागीय मृद संधारण अधिकारी/सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था/सर्व निवासी उप जिल्हाधिकारी/सर्व तहसिलांचे प्रभारी सहायक/ उप जिल्हाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
**(ह्यांना विनंती की, या परिपत्रकातील सूचना त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात)**

मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व प्रशासकीय कार्यालये
सामान्य प्रशासन विभागातील कार्यासने
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (पत्राने)
निवडनस्ती.
*पत्राने *****

१

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंवर देखरेख ठेवण्यासाठी दक्षता समित्या............
एकत्रित आदेश

**महाराष्ट्र शासन**
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :दक्षस-१००७/प्र.क्र.५४८ /नापु.२१
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ जानेवारी,२००८

संदर्भ:-

१) शासन निर्णय, क्रमांक:दक्षस-१०९९/प्र.क्र.८८७०/ना.पु.२८,दिनांक : ५ नोव्हेंबर,१९९९.
२) शासन निर्णय, क्रमांक:दक्षस-२०००/प्र.क्र.९/२०००/नापु.२८, दिनांक ११ जानेवारी,२०००
३) शासन निर्णय, क्रमांक:दक्षस-१०००/प्र.क्र.९/२०००/नापु:२८, दिनांक २५ जानेवारी,२०००
४) शासन निर्णय, क्रमांक.दक्षस-२०००/प्र.क्र.४४/नापु.२४, दिनांक १७ जून,२०००
५) शासन निर्णय,क्रमांक:दक्षस-१०००/प्र.क्र.४५/नापु.२४,दिनांक ०९ ऑगस्ट,२०००
६) शासन निर्णय,क्रमांक: दक्षस-१०००/३२५/प्र.क्र.२०००/नापु.२१,दिनांक १६ ऑगस्ट,२००२
७) शासन निर्णय,क्रमांक: दक्षस-१३००/१०५७/प्र.क्र.४२९५/नापु.३०,दिनांक ३० ऑक्टोबर,२००३
८) शासन निर्णय, क्रमांक दक्षस-१००५/६३१/प्र.क्र.२६७/नापु.२१,दिनांक ०६ डिसेंबर,२००७

**शासन निर्णय**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंवर देखरेख ठेवण्यासाठी दक्षता समित्या गठीत करण्याबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले उपरोक्त संदर्भीत शासन निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे दक्षता समित्या गठीत करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. *दक्षता समित्यांची रचना :-*

**I) ग्राम पातळीवरील दक्षता समिती**

| | |
|---|---|
| १) सरपंच ग्रामपंचायत | अध्यक्ष |
| २) पोलीस पाटील | सदस्य |
| ३) ग्रामसेवक | सदस्य |
| ४) अध्यक्ष विविध कार्यकारी सोसायटी | सदस्य |
| ५) तीन महिला सदस्य | सदस्य |
| ६) विरोधी पक्षाचे दोन सदस्य (यापैकी एक महिला असावी ) | सदस्य |
| ७) अनुसूचित जातीचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ८) अनुसूचित जमातीचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ९) एक सामाजिक कार्यकर्ता | सदस्य |
| १०) तलाठी | सदस्य सचिव |

ROTA/H-2194(2000-1-2008)-1

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
पुरवठा विभाग
दिनांक- 23/1 क्र.- 892
जिल्हा पु. अ.

14/3/2008

**टिपः-**

१) ज्यावेळी सरपंच रास्तभाव धान्य दुकान चालवित असतील त्यावेळी उपसरपंच हे दक्षता समितीचे अध्यक्ष असतील.

२) ज्यावेळी सरपंच रास्तभाव धान्य दुकान चालवित असतील व उपसरपंचाचे पद काही कारणास्तव रिक्त असेल त्यावेळी त्या गावातील विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष हे दक्षता समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतील.त्याचप्रमाणे अध्यक्ष विविध कार्यकारी सोसायटी हे सुध्दा उपलब्ध नसतील अशावेळी वरीलपैकी कोणतीही एक व्यक्ती उपलब्ध होईपर्यंत संबंधीत तहसिलदार कोणत्याही एका अशासकीय सदस्याची दक्षता समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करतील.

३) ग्रामपातळीवरील दक्षता समितीवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त करण्यात येणारी, सरपंच वगळता, कोणतीही व्यक्ती रास्तभाव धान्य दुकानदार नसावी.

४) जेव्हा एका तलाठ्याकडे एकापेक्षा अधिक गावांचे काम सोपविलेले असेल तेव्हा सदरहू तलाठी अशा सर्व संबंधीत ग्रामपातळीवरील दक्षता समित्याचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

## II) नगरपालिका (अ , ब , क वर्ग ) पातळीवरील दक्षता समिती

| | |
|---|---|
| **१)** विधान सभा सदस्य (जास्तीत जास्त वार्डांचे प्रतिनिधीत्व करणारे) | अध्यक्ष |
| २) विधान परिषद सदस्य | उपाध्यक्ष |
| ३) नगरपालीकेचे अध्यक्ष | सदस्य |
| ४) दोन महिला सदस्य | सदस्य |
| ५) विरोधी पक्षांचे दोन सदस्य **(यापैकी एक महिला असावी)** | सदस्य |
| ६) अनुसुचित जातीचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ७) अनुसुचित जमातीचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ८) शहरातील रास्त भाव धान्य दुकानदारांचा जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्त केलेला एक प्रतिनिधी | सदस्य |
| ९) ग्राहक चळवळीशी संबंधीत एक व्यक्ती | सदस्य |
| १०) अल्पसंख्यांकांचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ११) एक सामाजिक कार्यकर्ता | सदस्य |
| १२) अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा तहसिलदार | सदस्य-सचिव |

टिपः-- नगरपालीका पातळीवरील दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांपैकी ५०% सदस्यांची नियुक्ती ही महिलांची करावयाची आहे.त्यामुळे उपरोक्त नमुद अशासकीय सदस्यापैकी अनुक्रमांक ६ ते ११ यामधील सदस्यांची नियुक्ती करताना यापैकी **दोन सदस्याची नियुक्ती महिलांमधून करण्यात यावी.**

## III ) तालुका पातळीवरील दक्षता समिती

| | |
|---|---|
| **१)** विधान सभा सदस्य ( तालुक्यातील जास्तीतजास्त भागाचे प्रतिनिधीत्व करणारे) | अध्यक्ष |
| **२)** तालुक्यातून निवडून आलेले इतर विधान सभा सदस्य/ विधान पषिद सदस्य | सह-अध्यक्ष |
| ३) तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या नगरपरिषदेचे अध्यक्ष | उपाध्यक्ष |

**( नगरपरिषद नसल्यास उपाध्यक्ष हे पद असणार नाही)**

H-2194 -1a

४) पंचायत समितीचे अध्यक्ष — सदस्य
५) गट विकास अधिकारी — सदस्य
६) तीन महिला सदस्य — सदस्य
७) विरोधी पक्षाचे दोन सदस्य **( यापैकी एक महिला असावी)** — सदस्य
८) जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेला रास्त भाव दुकानदारांचा एक प्रतिनिधी — सदस्य
९) अनुसुचित जातीचा एक प्रतिनिधी — सदस्य
१०) अनुसुचित जमातीचा एक प्रतिनिधी — सदस्य
११) एक सामाजिक कार्यकर्ता — सदस्य
१२) श्री. अण्णा हजारे सूचवितील अशी एक व्यक्ती — सदस्य
१२) तहसिलदार — सदस्य-सचिव

टिपः-- तालुका पातळीवरील दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांपैकी ५०% सदस्यांची नियुक्ती ही महिलांची करावयाची आहे.त्यामुळे उपरोक्त नमुद अशासकीय सदस्यापैकी अनुक्रमांक ८ ते ११ यामधील सदस्यांची नियुक्ती करताना यापैकी **एका सदस्याची नियुक्ती महिलांमधून करण्यात यावी.**

**IV) जिल्हा पातळीवरील दक्षता समिती**

१) पालकमंत्री — अध्यक्ष
२) जिल्हाधिकारी — उपाध्यक्ष
३) जिल्हाधिकारी नामनिर्देशित करतील असे जिल्हयातील दोन विधान सभा सदस्य — सदस्य
४) जिल्हाधिकारी नामनिर्देशित करतीलअसे जिल्हयातील एक विधान परिषद सदस्य — सदस्य
५) अध्यक्ष, जिल्हापरिषद — सदस्य
६) अध्यक्ष, जिल्हा खरेदी विक्री संघ — सदस्य
७) अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक — सदस्य
८) अपर जिल्हाधिकारी — सदस्य
९) जिल्हा उप निबंधक — सदस्य
१०) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी — सदस्य
११) दोन महिला प्रतिनिधी — सदस्य
१२) विरोधी पक्षाचे दोन सदस्य **( यापैकी एक महिला असावी)** — सदस्य
१३) अनुसूचित जातीचा एक प्रतिनिधी — सदस्य
१४) अनुसूचित जमातीचा एक प्रतिनिधी — सदस्य
१५) दुकानदार संघटनेचा एक प्रतिनिधी — सदस्य
१६) ग्राहक चळवळीशी संबंधीत एक व्यक्ती — सदस्य
१७) श्री. अण्णा हजारे सूचवितील अशी एक व्यक्ती — सदस्य
१८) जिल्हा पुरवठा अधिकारी — सदस्य-सचिव

टिपः-- जिल्हा पातळीवरील दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांपैकी ५०% सदस्यांची नियुक्ती ही महिलांची करावयाची आहे.त्यामुळे उपरोक्त नमुद अशासकीय सदस्यापैकी अनुक्रमांक ३,४आणि १३ ते १६ यामधील सदस्यांची नियुक्ती करताना यापैकी **तीन सदस्याची नियुक्ती महिलांमधून करण्यात यावी.**

H-2194 -2

**V) <u>मुंबई शिधावाटप क्षेत्र व राज्यातील सर्व महानगरपालीका ( शिधावाटप कार्यालय निहाय ) दक्षता समित्या</u>**

| | |
|---|---|
| १) शिधावाटप क्षेत्रातील विधान सभा सदस्य | अध्यक्ष |
| २) उर्वरीत विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य | उपाध्यक्ष |
| ३) तीन महिला सदस्य | सदस्य |
| ४) विरोधी पक्षाचे दोन सदस्य **( यापैकी एक महिला असावी)** | सदस्य |
| ५) शिधावाटप कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील ५ नगरसेवक **( यापैकी एक महिला असावी)** | सदस्य |
| ६) नियंत्रक शिधावाटप, मुंबई किंवा जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेला रास्त भावधान्य / शिधावाटप दुकानदारांचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ७) इतर दोन व्यक्ती ( यापैकी एक ग्राहक चळवळीशी संबंधीत असावा तसेच या **यापैकी एक महिला असावी** ) | सदस्य |
| ८) मुंबई शिधावाटप क्षेत्राकरीता संघटीत संस्थांचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ९) अनुसूचित जातीचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| १०) अनुसूचित जमातीचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ११) अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेले अधिकारी/ मुंबई शिधवाटप क्षेत्रासाठी शिधावाटप अधिकारी | सदस्य-सचिव |

<u>टिप:--</u>

१) शिधावाटप कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील ५ नगरसेवकांची नियुक्ती करताना त्यापैकी किमान २ विरोधी पक्षाचे सदस्य असावेत.

२) महानगरपालीका पातळीवरील दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांपैकी ५०% सदस्यांची नियुक्ती ही महिलांची करावयाची आहे.त्यामुळे उपरोक्त नमुद अशासकीय सदस्यापैकी अनुक्रमांक ६,८,९ आणि १० यामधील सदस्यांची नियुक्ती करताना यापैकी **दोन सदस्याची नियुक्ती महिलांमधून करण्यात यावी.**

***३) <u>दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांसाठी अर्हता</u> :-***

१) ग्रामपातळीवरील दक्षता समितीवर सदस्य म्हणून नियुक्त करण्यात येणारी व्यक्ती किमान ७ वी उत्तीर्ण असावी.

२) तालुका, नगरपालीका, महानगरपालीका आणि जिल्हास्तरावर नियुक्त करण्यात येणारी व्यक्ती किमान १० वी (एस.एस.सी. ) उत्तीर्ण असावी.

***४) <u>दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांसाठी निरर्हता</u> :-***

१) ज्या व्यक्तीस फौजदारी गुन्ह्याकरीता शिक्षा झाली आहे किंवा ज्या व्यक्तीविरूध्द फौजदारी प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे अशा व्यक्तीस कोणत्याही स्तरावरील दक्षता समितीवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त करता येणार नाही.

२) तालुका , नगरपालीका, महानगरपालीका आणि जिल्हास्तरावरील दक्षता समित्यांवर नियुक्त करण्यात येणाऱ्या रास्त भाव धान्य दुकानांच्या प्रतिनिधीवर जीवनावश्यक वस्तु कायद्यांखालील गुन्हे दाखल झालेले नसावेत अथवा त्यांच्याविरूध्द सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याच्या अपहाराबाबत कारवा

H-2194 -2a

झालेले नसावी. दक्षता समितीवर नियुक्त करण्यात आलेल्या एखाद्या दुकानदार सदस्यावर उपरोक्त प्रमाणे कारवाई झाल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यात येऊन त्या जागेवर नविन नियुक्ती करण्यात यावी.

५) ***दक्षता समितीवरल सदस्यांच्या नियुक्त्यांची कार्यपध्दती :--***

**अ- दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या**

१) (i) ग्रामपातळीवरील दक्षता समितीच्या १) तीन महिला सदस्य , २) अनुसूचित जातीचा एक प्रतिनिधी, ३) अनुसूचित जमातीचा एक प्रतिनिधी आणि एक सामाजिक कार्यकर्ता या अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या या ग्रामसभेने केलेल्या शिफारसीनुसार करण्यात याव्यात.याबाबतचे नियुक्ती आदेश संबंधीत तहसिलदारांनी पारीत करावेत.

(ii) ग्रामपातळीवरील दक्षता समितीच्या विरोधी पक्षाच्या दोन सदस्यांच्या नियुक्त्या संबंधीत तहसिलदारांनी कराव्यात.

२) तालुका पातळीवरील दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्यांबाबतच्या शिफारसी या संबंधीत तहसिलदारांनी कराव्यात आणि नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी पारीत करावेत.

३) जिल्हा पातळीवरील दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या संबंधीत जिल्हाधिकारी यांनी कराव्यात.

४) ब आणि क वर्ग नगरपालीका पातळीवरील दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्यांबाबतच्या शिफारसी या संबंधीत तहसिलदारांनी कराव्यात आणि नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी पारीत करावेत.

५) अ वर्ग नगरपालीका आणि महानगरपालीका स्तरावरील ( मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्र वगळून) दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या संबंधीत जिल्हाधिकारी यांनी कराव्यात

६) मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्रातील दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी कराव्यात.

७) दक्षता समितीवर नियुक्ती करताना सर्व तहसिलदार, जिल्हाधिकारी आणि नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी ग्राम, तालुका, नगरपालीका, महानगरपालीका ( जिल्हयामध्ये महानगरपालीका असल्यास ) आणि जिल्हास्तरावरील दक्षता समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या करताना घटनाबाहय नेमणूका होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी.

८) सर्व पातळींवरील दक्षता समित्यांवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करताना जास्तीत जास्त सदस्य बी.पी.एल. आणि अंत्योदय लाभार्थी असतील याबाबत खबरदारी घेण्यात यावी. मात्र श्री अण्णा हजारे यांच्याकडून तालुका आणि जिल्हापातळीवरील दक्षता समित्यांवर नियुक्त करण्यात येणाऱ्या सदस्यांकरीता ही बाब लागू राहणार नाही.

९) ग्राहक चळवळींशी संबंधीत सदस्यांची नियुक्ती :-- मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्रासह राज्यातील सर्व महानगरपालीका (शिधावाटप कार्यालय निहाय) स्तरावरील दक्षता समित्यांवर अशासकीय सदस्य म्हणून ग्राहक चळवळींशी संबंधीत व्यक्तीची नियुक्ती करताना ती शक्यतो राज्य शासनाच्या ग्राहक संरक्षण विभागाच्या शिफारसीने करण्यात यावी.

१०) सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी दक्षता समित्यांच्या पुनर्रचनेबाबतची माहिती शासनास वेळोवेळी पाठवावी.

**ब ) विरोधी पक्षांच्या सदस्यांची नियुक्ती :--**

१ -- ग्रामपातळी, तालुकापातळी आणि " अ ", " ब" आणि " क " वर्ग नगरपालीका स्तरावरील दक्षता समितीवर नियुक्त करावयाचे विरोधी पक्ष सदस्य म्हणजे **स्थानिक विधान सभा सदस्य** ज्या राजकीय पक्षाचे नाहीत असे उर्वरीत पक्ष, विरोधी पक्ष आहेत असे समजावे.

२-- जिल्हा पातळी आणि महानगरपालीका स्तरावरील दक्षता समिती वर नियुक्त करावयाचे विरोधी पक्ष सदस्य म्हणजे सदर **समितीचे अध्यक्ष** ज्या राजकीय पक्षाचे नाहीत असे उर्वरीत पक्ष, विरोधी पक्ष आहेत असे समजावे.

***६) दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांची मुदत :--*** सर्व स्तरावरील दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांचा कार्यकाल त्यांच्या नियुक्त्यांच्या दिनांकापासून तीन वर्ष अथवा त्यांच्या जागी नविन अशासकीय सदस्यांची नियुक्ती होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत राहील.

***७) दक्षता समित्यांच्या बैठका :--***

अ) सर्व स्तरावरील प्रत्येक दक्षता समितीची बैठक महिन्यातून एकदा घेण्यात यावी.समितीच्या सदस्य सचिवांनी शक्यतो त्याच बैठकीमध्ये पुढील बैठकीची तारीख समितीच्या अध्यक्षांकडून ठरवून घ्यावी.जर काही कारणास्तव बैठकीची तारीख ठरविणे शक्य झाले नाही तर सदस्य-सचिवांनी त्या महिन्याच्या १५ तारखेच्या आत समितीच्या अध्यक्षांशी संपर्क साधून बैठकीची तारीख आणि वेळ निश्चित करावी. त्याच महिन्याच्या २० तारखेपर्यंत काही अपरिहार्य कारणास्तव अध्यक्षांकडून बैठकीची तारीख निश्चित करून मिळाली नाही तर सचिवांनी बैठकीची तारीख आणि वेळ स्वत: ठरवावी व त्याप्रमाणे समितीच्या सर्व सभासदांना कळवावे. दक्षता समितीच्या बैठका नियमितपणे घेण्याची संपुर्ण जबाबदारी समितीच्या सदस्य- सचिवांची राहील.

ब) दक्षता समित्या स्थायी स्वरूपाच्या समित्या असल्यामुळे दक्षता समितीवरील सर्व किंवा काही अशासकीय सदस्यांची नियुक्ती होणे बाकी असले तरीही दक्षता समितीच्या बैठका नियमितपणे घेण्यात याव्यात.

क) सर्व दक्षता समित्यांच्या बैठका वेळच्या वेळी घेतल्या जातात किंवा नाही याची जिल्हास्तरावर अपर जिल्हाधिकारी यांनी तर मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी स्वत: खातरजमा करावी.

ड) केंद्रीय निवडणूक आयोग/ राज्य निवडणूक आयोग ज्या-ज्या वेळी निवडणूका जाहीर करील त्या-त्या वेळी , दक्षता समित्यांच्या बैठकांचे आयोजन निवडणूक जाहीर होण्यापुर्वी करण्यात आले असेल त्या बैठका घेण्यास हरकत नाही. मात्र निवडणूकीची उद्घोषणा झाल्यानंतर आचारसंहीता संपेपर्यंतच्या कालावधीत दक्षता समित्यांच्या बैठकांचे आयोजन करता येणार नाही.

***८) दक्षता समित्यांच्या बैठकांचे अहवाल शासनास पाठविण्याबाबत :--*** सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्हयातील सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या त्या-त्या महिन्यामध्ये घेण्यात आलेल्या बैठकांबाबतचा अहवाल पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता शासनास पाठवावा.

***९) अशासकीय सदस्यांची नेमणूक रद्द करण्याबाबत :--***

१) एखादा अशासकीय सदस्य दक्षता समितीच्या अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीशिवाय सततच्या तीन बैठकींना गैरहजर राहील्यास त्याची दक्षता समितीवरील अशासकीय सदस्य म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी व त्याच्या जागी त्याच प्रवर्गातील नवीन अशासकीय सदस्याची नियुक्ती विहीत पध्दतीचा अवलंब करून करण्यात यावी.

H-2194 -3a

२) तथापी एखादा सदस्य आजारपणाच्या कारणामुळे सलग तीन बैठकांना अनुपस्थित राहीला असेल आणि त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र त्याने समितीचे अध्यक्ष/ सदस्य-सचिव यांना सादर केले असे तर त्याचे सदस्यत्व पुढे चालु राहील.

३) एखादा अशासकीय सदस्य मानसिक रुग्ण झाल्यास त्याचे सदस्यत्व आपोआप रद्द होईल. त्याच्या जागी त्याच प्रवर्गातील नविन अशासकीय सदस्याची नियुक्ती विहीत पध्दतीचा अवलंब करून करण्यात यावी.

४) दक्षता समितीवरील शासकीय सदस्य ( अधिकारी/ कर्मचारी) पुर्वसूचना न देता बैठकीस गैरहजर राहील्यास त्यांना त्यांच्या वरिष्ठांमार्फत ताकीद देण्यात यावी.

***<u>१०) दक्षता समितीच्या बैठकीसाठी गणपुर्ती :--</u>*** सर्व स्तरावरील दक्षता समितीच्या बैठकीसाठी किमान ५०% सदस्यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. अन्यथा समितीची बैठक अर्धा तास पुढे ढकलून त्यानंतर घेण्यात यावी. अर्ध्या तासानंतर घेण्यात येणाऱ्या बैठकीकरीता मात्र गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

***<u>११) दक्षता समितीच्या बैठकीचे कार्यवृत्तांत :--</u>*** सर्व स्तरावरील दक्षता समितीच्या प्रत्येक बैठकीच्या कार्यवृत्तांची नोंद विहीत नोंदवहीत करण्यात यावी. ही जबाबदारी सदस्य-सचिवांची राहील.

***<u>१२) दक्षता समितीची कार्ये :--</u>***

**<u>अ) ग्रामस्तरावरील दक्षता समितीची कार्ये:--</u>**

१) गावाची लोकसंख्या, शिधापत्रिका आणि एकाकांची संख्या, जीवनावश्यक वस्तुचे परिमाण या आधारे जावनावश्यक वस्तुची गरज आणि प्रत्यक्ष उचल याचा तपशील तपासून आढावा घेणे.

२) रास्त भाव धान्य दुकानात झालेली जीवनावश्यक वस्तुची प्रत्येक आवक दक्षता समितीच्या किमान दोन सदस्यांनी प्रमाणित करणे व त्याची प्रत संबंधित तहसिलदार आणि दुकानदाराला देणे.

३) जीवनावश्यक वस्तुचा नियमित पुरवठा, आवश्यक नियतन, प्रत्यक्षात झालेली आवक, उचल , गरज व साठ्याच्या तुटींचा आढावा घेणे.

४) शिधापत्रिकधारकांना विहीत प्रमाणात आणि वेळेवर तसेच शासनाने निर्धारीत केलेल्या दरानुसार जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा केला जातो किंवा नाही ही बाब तपासून पाहणे व त्यात काही उणीवा आढळून आल्यास त्याबाबतचा अहवाल तहसिलदारांना सादर करणे.

५) रास्त भाव धान्य दुकानांमार्फत शिधापत्रिकधारकांना पुरविल्या जाणाऱ्या जीवनावश्यक वस्तुच्या प्रतीचो ( Quality ) तपासणी करणे व त्याबाबतचा अहवाल संबंधित तहसिलदारांना पाठविणे.

६) रास्त भाव धान्य दुकानाबाबत शिधापत्रिकधारकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत रास्त भाव धान्य दुकानातील नोंद वहयांची तपासणी करून त्याबाबतचा अहवाल संबंधित तहसिलदारांना पाठविणे आणि त्याची एक प्रत दुकानदाराला देणे.

७) बनावट/ खोटया ( Bogus ) शिधापत्रिका व शिधापत्रिका न मिळालेले गरजू रहिवासी याबाबत आढावा घेऊन त्याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित तहसिलदारांना पाठविणे.

८) रास्त भाव धान्य दुकानदार अथवा शिधापत्रिकाधारक यांनी गैरप्रकार /गैरव्यवहार केल्याचे आढळून आल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित तहसिलदारांना पाठविणे.

९) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने सुचना करणे

१०) रास्त भाव धान्य दुकानातून शिधापत्रिकधारकांना नियमितपणे विहीत प्रमाणात शासन निर्धारीत किंमतीत आणि शासनाने निश्चित केलेली प्रत ( Quality) असलेल्या जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा

करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व बाबींवर विचार करून त्याबाबतचा अहवाल संबंधित तहसिलदारांना पाठविणे.

११) शिधापत्रिकाधारकांच्या सोयीच्या दृष्टीने रास्त भाव धान्य दुकान कार्यक्षेत्राच्या पुनर्रचनेबाबत सुचना करणे.

**ब) तालुका स्तरावरील दक्षता समितीचे कार्य**

१) तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांची संख्या, त्यावरील एकांके, शासनाने विहित केलेले परिमाण या बाबींचा विचार करुन जीवनावश्यक वस्तुंची मागणी,पुरवठा, गरज,नियतन,प्रत्यक्ष आवक व उचल याबाबींचा आढावा घेणे.

२) ग्रामपातळीवरील दक्षता समित्यांचा कामाचा आढावा घेणे.

३) तालुक्यातील गोदाम व्यवस्थेचा आढावा घेऊन त्याबाबत अभ्यासपूर्ण सूचना करणे.

४) रास्तभाव धान्य दुकानांविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करुन त्याबाबतचे अहवाल पुढील कार्यवाहीसाठी संबंधीत तहसिलदाराना पाठविणे व त्याची प्रत संबंधित दुकानदाराला देणे.

५) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम व मजबूत करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना शासनास पाठविणे.

६) रास्तभाव धान्य दुकानांच्या कार्यक्षेत्राच्या पुर्नरचनेबाबत शिफारस करणे.

७) तालुका दक्षता समितीतील सदस्य तालुक्यातील कोणत्याही रास्तभाव धान्य दुकानास/ केरोसीन परवानाधारकास भेट देवून त्या दुकानाची/ केरोसीन परवान्याची तपासणी करणे .

८) तहसिलदारांशी प्रथम संपर्क साधून तालुक्यातील शासकीय गोदामांना भेट देवून रास्तभाव धान्य दुकानदारांना दिल्या जाणाऱ्या शिधावस्तुंच्या दर्जाची पाहणी करुन त्याबाबतचे अभिप्राय / शिफारशी संबंधीत तहसिलदाराना पाठविणे.

**क) जिल्हास्तरीय दक्षता समितीचे कार्य**

१) जिल्हयातील तालुका स्तरीय दक्षता समित्यांच्या कामाचा आढावा घेणे.

२) जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांची संख्या त्यावरील एकांके, शासनाने विहित केलेले परिमाण या बाबींचा विचार करुन जीवनावश्यक वस्तुंची मागणी,पुरवठा, गरज,नियतन,प्रत्यक्ष आवक व उचल याबाबींचा आढावा घेणे.

३) जिल्ह्यातील धान्य साठवणूकीची क्षमता आणि व्यवस्था यांचा आढावा घेणे व त्यासंबंधीतील सूचना शासनास पाठविणे.

४) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम व मजबूत करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना शासनास पाठविणे.

५) तालुका, नगरपालिका आणि ग्रामपातळीवरील दक्षता समितीकडून प्राप्त झालेल्या सूचनांवर विचार करुन त्याबाबत आवश्यक शिफारशी शासनास पाठविणे.

६) शिधापत्रिकाधारकांच्या सोयीच्या दृष्टीने रास्तभाव धान्य दुकानाच्या कार्यक्षेत्राच्या पुर्नरचनेबाबत विचार करुन सूचना करणे.

७) जिल्हा दक्षता समितीचे सदस्य जिल्ह्यातील कोणत्याही रास्तभाव धान्य दुकानास/ केरोसीन परवाना धारकास भेट देवून त्या दुकानाची/ केरोसीन परवान्याची तपासणी करणे.

H-2194 -4a

८) जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी प्रथम संपर्क साधून जिल्ह्यातील शासकीय गोदामांना भेट देवून रास्तभाव धान्य दुकानदारांना दिल्या जाणाऱ्या शिधावस्तुंच्या दर्जाची पहाणी करुन त्याबाबतचे अभिप्राय / शिफारशी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांना पाठविणे.

**<u>ड) नगरपालिका / महानगरपालिका स्तरावरील दक्षता समितीचे कार्ये</u>**

१) नगरपालिका / महानगरपालिकेची लोकसंख्या,शिधापत्रिका एकांकाची संख्या, जीवनावश्यक वस्तुंच्या वितरणाचे परिमाण याआधारे जीवनावश्यक वस्तुंची गरज व प्रत्यक्ष आवक यांचा तपशील तपासून आढावा घेणे.

२) जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा, आवश्यक नियतन,प्रत्यक्षात झालेले आवक, उचल, गरज आणि साठयाच्या स्थितीचा आढावा घेणे.

३) शिधापत्रिकाधारकांना विहित प्रमाणात वेळेवर आणि निर्धारित किंमतीत जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा केला जातो किंवा नाही ही बाब तपासून पाहणे आणि त्यात काही उणीवा / त्रुटी आढळून आल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधीत अधिकाऱ्यांना पाठविणे.

४) रास्तभाव धान्य दुकानातून शिधापत्रिकाधारकांना पुरविल्या जाणाऱ्या जीवनावश्यक वस्तुंच्या प्रतीची (Quality ) तपासणी करणे व त्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना कळविणे.

५) रास्तभाव धान्य दुकानाबाबत शिधापत्रिकाधारकाकडून प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत रास्तभाव धान्य दुकानातील नोंदवह्यांची तपासणी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल संबंधीत अधिकाऱ्यांना पाठविणे.

६) बनावट/ खोटया ( Bogus ) शिधापत्रिका व शिधापत्रिका न मिळालेले गरजू रहिवासी याबाबत आढावा घेऊन त्याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित अधिकाऱ्यांना पाठविणे.

७) रास्त भाव धान्य दुकानदार अथवा शिधापत्रिकधारक यांनी गैरप्रकार /गैरव्यवहार केल्याचे आढळून आल्यस त्याबाबतचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांना पाठविणे व त्याची प्रत संबंधित दुकानदाराला देणे.

८) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम व मजबूत करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना करणे.

९) रास्त भाव धान्य दुकानातून शिधापत्रिकाधारकांना नियमितपणे विहीत प्रमाणात शासन निर्धारीत किंमतीत आणि शासनाने निश्चित केलेली प्रत ( Quality) असलेल्या जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व बाबींवर विचार करून त्याबाबतचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांना पाठविणे.

***<u>१३) दक्षता समित्यांचे विशेष अधिकार :--</u>***

१) रास्तभाव धान्य दुकानदाराने त्याला शासनाकडून मिळालेल्या शिधावस्तुंची काळयाबाजारात विक्री केल्याचे किंवा कोणत्याही अनधिकृत मार्गाने विल्हेवाट लावल्याचे दक्षता समितीच्या निदर्शनास आल्यास सदर दक्षता समिती किमान ५ सदस्यांच्या <u>(त्यापैकी किमान दोन शासकीय सदस्य)</u> मदतीने अशा रास्तभाव धान्य दुकानास सील लावू शकेल.

२) अशा प्रकारे दुकानास सील लावल्यानंतर दक्षता समितीचे सचिव त्याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ संबंधीत तहसिलदार/ शिधावाटप अधिकारी यांना पाठविल आणि त्याची प्रत दुकानदारास देतील.

३) दक्षता समितीच्या सचिवांकडून अहवाल प्राप्त होताच दुकानास सील लावल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत संबंधीत निरीक्षक / निरीक्षण अधिकारी अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी त्या रास्तभाव धान्य दुकानाची सविस्तर तपासणी करील आणि तपासणीत काही गैर आढळून आल्यास त्या रास्तभाव धान्य दुकानदाराविरुध्द नियमानुसार कारवाई करील.

H-2194(2000-1-2008)-5

४) या दक्षता समित्या पेट्रोल व डिझेल पंपावरील वितरीत करण्यात आलेल्या पेट्रोल/ डिझेलच्या वितरणावर सर्वसाधारण देखरेख / पर्यवेक्षण ठेवतील.या वितरण व्यवस्थेत काही त्रुटी आढळल्यास त्या दूर करण्यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी/ तहसिलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी आणि नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्याकडे आवश्यक त्या शिफारशी / सूचना करतील.

५) सर्व स्तरावरील दक्षता समित्यांना आपापल्या क्षेत्रातील रास्त भाव धान्य दुकानांचे तसेच केरोसीन परवानाधारकांचे सामाजिक लेखापरिक्षण (**Social Audit**) करण्याचे अधिकार असतील.

## ***१४) मंत्रिमंडळात समावेश झालेल्या विधान मंडळ सदस्यांचे सदस्यत्व संपुष्टात आणण्याबाबत :--***

१) तालुक्यातील स्थानिक भागातून निवडून आलेले विधानसभा सदस्य हे तालुकापातळीवरील तसेच मुंबई व्यतिरिक्त इतर महानगरपालिका दक्षता समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात तथापि ज्यावेळी अशा विधानसभा सदस्यांची राज्य मंत्रिमंडळात मंत्री / राज्यमंत्री /उपमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात येईल त्यावेळी जिल्हाधिकारी तसेच मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्राबाबत नियंत्रक शिधावाटप, मुंबई हे, इतर विधानसभा सदस्याची समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करतील.

२) ज्यावेळी एका तालुक्यात एकापेक्षा अधिक विधानसभा सदस्य निवडून आले असतील त्यावेळी जिल्हाधिकारी तालुक्याच्या जास्तीत जास्त भागाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विधानसभा सदस्याची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करतील.

३) ज्यावेळी एक विधानसभा सदस्य एकापेक्षा अनेक तालुक्यातून निवडून आले असतील त्यावेळी ते ज्या-ज्या तालुक्यातून निवडून आले असतील त्या त्या तालुका दक्षता समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील.

४) ज्यावेळी एका विधानसभा सदस्याच्या निर्वाचन क्षेत्रामध्ये एकापेक्षा अधिक दक्षता समित्या असतील अशावेळी संबंधीत विधानसभा सदस्य हे अशा सर्व दक्षता समित्यांचे पदसिध्द अध्यक्ष असतील.

## ***१५) अशासकीय सदस्यांना प्रवासभत्ता / दैनिकभत्ता / बैठकभत्ता***

१) जिल्हा व तालुकास्तरावरील दक्षता समितीतील अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिकभत्ता, मुंबई नागरी सेवा नियम खंड-२ मधील परिशिष्ट-४२ (ए) यातील सेक्शन १ मधील १ (१) (बी) च्या तरतूदीनुसार व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक :टीआरए-१४७७/१०३२-सी /एसीआर-५,दिनांक २३ सप्टेंबर,१९७७, क्रमांक टीआरए-१०८३/१४२६/एसीआर-५, दिनांक ०१ फेब्रवारी,१९८४, क्रमांक: आरपीएस-१२८८/५६८/सेवा-१०,दिनांक०३ ऑक्टोबर,१९८८ आणि क्रमांक प्रवास-१०९२/सीआर-५९ / सेवा - ५, दिनांक ०१ एप्रिल,१९९२ च्या आधारे नियमित केला जावा या नियमाच्या तरतुदी केवळ रेल्वे / सडक प्रवासासाठी असल्यामुळे अशासकीय सदस्यांना विमानप्रवास तसेच रेल्वेच्या वातानुकुलित प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

२) दक्षता समितीवर अशासकीय सदस्य म्हणून असणाऱ्या विधानसभा /विधानपरिषद सदस्यांचा प्रवासभत्ता / दैनिकभत्ता शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक :टीआरए-१४७०/१३१/१८,दिनांक २७ जानेवारी,१९७१ अन्वये त्यांना विधानमंडळाच्या कामकाजासाठी अनुज्ञेय असलेल्या दराने नियमित केला जावा.

३) जिल्हास्तरीय दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांना शासकीय कर्मचाऱ्यांच्या दैनिकभत्ता अनुज्ञेयतेसाठीच्या श्रेणी - १ उच्च वेतन गटास (रुपये ५१०० व त्याहून अधिक) लागू असलेल्या दराने दैनिकभत्ता अनुज्ञेय राहील तर तालुकास्तरीय दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांना शासकीय

H-2194 -5a

कर्मचाऱ्याच्या दैनिकभत्ता अनुज्ञेयतेसाठीच्या श्रेणी-२ मधील ( रुपये १९००-२७९९) वेतन गटास लागू असलेल्या दराने दैनिकभत्ता देय राहील.

सदर दैनिकभत्त्याचे दर खालीलप्रमाणे राहील.

| श्रेणी | वेतन मर्यादा | सर्व साधारण दर | विशेष दर मुंबई/पुणे/ नागपूर/औरंगाबाद /नाशिक/ अमरावती | अनूसूचित दर हॉटेलमधील दैनिकभत्त्याचे सर्वसाधारण दर ,राज्यातील व राज्याबाहेरील (रकाना ६ मधील शहरे वगळून ) इतर सर्व ठिकाणी | आकारणाऱ्या वास्तव्यासाठी दर विशेष दर,मुंबई/पुणे/नागपूर/ औरंगाबाद/नाशिक/ अमरावी/दिल्ली व भारतातील इतर राज्यांच्या राजधानीची शहरे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| प्रथम श्रेणी | ५१०० आणि त्याहून अधिक | ७८ | ८५ | २०५ | २२५ |
| | ३०००-५०९९ | ७० | ८४ | १६० | १८० |
| द्वितीय श्रेणी | २८००-२९९९ | ७० | ८४ | १६० | १८० |
| | १९००-२७९९ | ६० | ७५ | ११५ | १३५ |
| | १४००-१८९९ | ५३ | ६८ | ७५ | १०० |
| तृतीय श्रेणी | १४०० पेक्षा कमी | ४५ | ६० | ६० | ७५ |

४) ग्रामस्तरीय, अ,ब आणि क वर्ग नगरपालिकास्तरीय आणि मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रातील तसेच सर्व महानगरपालिका क्षेत्रातील शिधावाटप कार्यालय दक्षता समित्याच्या अशासकीय सदस्यांना प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय असणार नाही.

५) अशासकीय सदस्यांपैकी जे सदस्य दक्षता समितीच्या मुख्यालयाच्या हद्दीत राहतात, त्यांना तसेच ग्रामस्तरीय, अ,ब व क वर्ग नगरपालिकास्तरीय व मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रातील तसेच सर्व महानगरपालिका क्षेत्रातील शिधावाटप कार्यालय दक्षता समित्यांच्या अशासकीय सदस्यांना प्रत्येक बैठकीसाठी बैठकभत्ता अनुज्ञेय राहील.

६) सर्वस्तरावरील दक्षता समित्यांच्या अशासकीय सदस्यांना प्रत्येक बैठकीसाठी रुपये २०/- या दराने बैठकभत्ता अनुज्ञेय राहील.

H-2194 -6

७) जेव्हा अशासकीय सदस्य त्यांच्या कार्यक्षेत्रातील रास्तभाव धान्य दुकानाच्या तपासणीसाठी जातील तेव्हा त्यांना प्रवासभत्ता / दैनिकभत्ता /बैठक भत्ता देय असणार नाही. अशासकीय सदस्यांना उपस्थिती असलेल्या बैठकोसाठीचा प्रवासभत्ता /दैनिकभत्ता/ बैठकभत्ता वेळच्यावेळी शक्यतो पुढील बैठकीपूर्वी ..ा करण्यात यावा.

( **टीपः-** प्रवास भत्ता, दैनिक भत्ता अनुज्ञेय ठरविताना मुंबई नागरी सेवा नियमातील सर्वसाधारण तरतुदी विचारात घेण्यात याव्यात)

८) अशासकीय सदस्यांच्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या देयकांवर मुंबई शिधावाटप क्षेत्रात संबंधित परिमंडळाचे उप नियंत्रक शिधावाटप तसेच इतर जिल्ह्यांच्या बाबतीत जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले जिल्हा पातळीवरील किंवा उप विभागीय पातळीवरील अधिकारी प्रतिस्वाक्षरी करतील.

९) या बाबींवर होणारा खर्च मुंबई शिधावाटप क्षेत्रात " मागणी क्रमांक एम-४, २४०८-अन्न साठवण व वखार साठवण -०१,अन्न,१०१ प्रापण व पुरवठा (दोन) शिधावाटप (ए) मुंबई शिधावाटप क्षेत्र, संगणक संकेतांक (२०४८ ००६४) व जिल्ह्यांकरीता " मागणी क्रमांक एम-४, २४०८-अन्न साठवण व वखार साठवण -०१,अन्न,१०१ प्रापण व पुरवठा (तीन) प्रापण वितरण व भाव नियंत्रण (बी) मुफसल , संगणक संकेतांक (२४०८ ०१०८) " या लेखाशिर्षाखाली दाखविण्यात यावा व त्याखालील मंजुर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

## १६) *अशासकीय सदस्यांना ओळखपत्रे :--*

सर्व पातळीवरील दक्षता समित्यांच्या अशासकीय सदस्यांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट " अ " नुसार ओळखपत्रे देण्यात यावे. मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक शिधावाटप, मुंबई व इतर ठिकाणी संबंधित जिल्हाधिकारी यांनी ही ओळखपत्रे द्यावीत. ही ओळखपत्रे स्थानिक रित्या निविदा मागवून व विहीत पध्दतीचा अवलंब करून छापून घेण्यात यावीत. ओळखपत्र छपाईसाठी येणारा खर्च उपरोक्त परिच्छेदामध्ये उल्लेखिलेल्या लेखाशिर्षाखाली दाखविण्यात यावा आणि तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

काही जिल्हयांमध्ये अशासकीय सदस्य हे लेटरहेड छापून घेऊन त्यावर राजमुद्रा देखील छापून घेतात असे निदर्शनास आले आहे. दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांनो त्यांच्या लेटरहेडवर राजमुद्रा छापून घेणे सर्वथा अयोग्य असल्यामुळे यापुढे त्यांच्या लेटरहेडवर राजमुद्रा छापण्यात येऊ नये अशा सुचना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत त्यांना देण्यात याव्यात.

## *१७) इतर तरतुदी :--*

१) दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांना वैयक्तीकरित्या त्यांच्या हद्दीतील रास्त भाव धान्य दुकानांची तपासणी करण्याचे अधिकार राहतील . सर्वसाधारणपणे एका दुकानाची तपासणी महिण्यातून एकदाच करण्यात यावी. तसेच प्रत्येक दक्षता समितीने आपल्या सदस्यांना यासाठी विशिष्ट दुकाने ठरवून देण्यास हरकत नाही.

२) अन्नधान्य , साखर, खाद्यतेल व केरोसीन यांच्या वाटपाच्या परिमाणाच्या आदेशांच्या प्रती संबंधित जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी समितीच्या सदस्यांना पुरवाव्यात.

३) प्रत्येक पातळीवरील दक्षता समितीच्या सदस्यांची नावे संबंधित रास्त भाव धान्य दुकानदारांना कळविण्यात यावीत व त्या दुकानदाराने त्यांच्या दुकानातील फलकावर त्या-त्या क्षेत्रातील नियुक्त केलेल्या सदस्यांची नावे लावावीत.

H-2194 -6a

४) एका दुकानातून दुसऱ्या दुकानात मोठ्या प्रमाणात कौटुंबिक शिधापत्रिका/ पुरवठा पत्रिका हस्तांतरीत करण्यापुर्वी संबंधित दक्षता समितीचा सल्ला घेण्यात यावा. तथापी शिधापत्रिका हस्तांतरीत करणे ही प्रशासकीय बाब असल्यामुळे असे प्रत्येक प्रकरण दक्षता समितीच्या सदस्यांपुढे आणण्याची आवश्यकता नाही. शिधापत्रिका हस्तांतरीत करण्याची दैनंदिन मागणी आल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांनी योगय तो निर्णय घ्यावा व या कार्यवाहीस दक्षता समितीच्या सदस्यांनी हरकत घेतल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचे समर्थन दक्षता समितीच्या सदस्यांपुढे ठेवावे व आवश्यक वाटल्यास फेरविचार करावा.

५) सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरळीत चालण्याच्या दृष्टीने शिधापत्रिकाधारक व दुकानदार यांच्यामध्ये सुसंवाद साधण्याच्या दृष्टीने एखाद्या दक्षता समितीच्या सदस्याने त्यांच्या अखत्यारीतील क्षेत्रात शिधापत्रिकाधारक व दुकानदाराची बैठक घेतल्यास त्यास शासनाची हरकत नाही.

६) दक्षता समितीच्या सदस्यांना त्यांच्या अखत्यारीतील सर्व अन्नधान्य गोदामांना पुर्वपरवानगी घेऊन भेटी देण्यास परवानगी देण्यात यावी. मात्र मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात शिधावाटप दुकानांना सर्वसाधारणपणे ज्या गोदामातून अन्नधान्याचा पुरवठा केला जातो फक्त त्याच गोदामांना भेटी देण्याची परवानगी देता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(सु.द. शेवाळे)
कार्यासन अधिकारी
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व विभागीय उप आयुक्त (पुरवठा)
सर्व जिल्हाधिकारी
सर्व अपर जिल्हाधिकारी
सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
नियंत्रक शिधावाटप, मुंबई
वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
संचालक , नागरी पुरवठा(गो/वा) मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
खाजगी सचिव, मंत्री (अनापुवग्रासं)
खाजगी सचिव, राज्यमंत्री (अनापुवग्रासं)
सर्व कार्यासने
निवड नस्ती.

H-2194(2000-1-2008)-7

तहसीलदार सर्व
२/- प्रस्तुतचे शासन निर्णयानुसार कार्यवाही तात्काळ करणेसाठी रवाना
जिल्हा पुरवठा अधिकारी
नाशिक

**परिशिष्ट " अ "**

**ओळखपत्र**

श्री.------------------------------------

हे ------------------------------

हया दक्षता समितीचे अशासकीय सदस्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक:-

उप नियंत्रक शिधावाटप/
तहसिलदार/
जिल्हाधिकारी

---------

H-2194(2000-1-2008)-8.

**अवैध दारुस प्रतिबंध घालण्यासाठी**
**समिती गठीत करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक : सीआरएम २००४/६०८/पोल-११,
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२, दिनांक:२३ फेब्रुवारी,२००५

**पहा** :- (१) शासन परिपत्रक क्र. सीएलएल ११०१/सीआर-१/
भाग-२ /इएक्ससी-२, दिनांक ६ डिसेंबर,२००२
(२) शासन परिपत्रक सीआरएम २००४/६०८/पोल-११,
दिनांक ५ जुलै,२००४

**प्रस्तावना :-** अवैध दारु निर्मिती व विक्रीवर पायबंद घालण्यासाठी शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रके निर्गमित केली आहेत. तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात नाही. यास्तव अवैध दारु धंदयांच्या अनुषंगाने काढलेल्या आदेशांचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी तसेच या अवैध धंदयांना परिणामकारकपणे आळा घालण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे समिती गठीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**निर्णय** :- वर उल्लेखित दि.६ डिसेंबर,२००२ चे शासन निर्णय अधिक्रमीत करुन, प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यातील प्रत्येक तालुक्यात **तहसीलदार** यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. हया समितीत ५० % सदस्य हया महिला असाव्यात. समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | तहसीलदार | - | अध्यक्ष |
| (२) | वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र | - | सदस्य |
| (३) | तालुक्यातील स्वयंसेवी संस्थाचे एक प्रतिनिधी आणि समाजातील एक प्रतिष्ठित नागरीक * | - | सदस्य |
| (४) | उत्पादन शुल्क निरीक्षक/उपनिरीक्षक | - | सदस्य |
| (५) | पोलीस स्टेशनचा ठाणेदार | - | सदस्य सचिव |

२. या समितीवर आणखी शासकीय/अशासकीय सदस्य नेमावयाचा असल्यास जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्हयाचे पालक मंत्री यांच्याशी विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

३. समितीचे कार्यक्षेत्र फक्त तालुक्यापुरतेच मर्यादीत राहील. एका तालुक्यात एक अथवा जास्त पोलीस स्टेशन अस्तित्वात असल्यास सदर समिती संपूर्ण तालुक्यासाठी कार्यरत राहील. समितीचे कामकाज हे शासनाने अवैध दारु बंदीच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन होते अथवा नाही हे पाहणे असेल. अवैध दारु धंदयाबाबत पोलीस स्टेशन ठाणेदार व उत्पादन शुल्क निरीक्षक/उपनिरीक्षक यांना **जबाबदार धरले जाईल.**

४. समितीने महिन्यातून किमान एकदा न चुकता बैठक घ्यावी व तालुक्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये हातभट्टी दारु बंदीच्या निर्णयांचे काटेकोरपणे पालन होते अथवा कसे, याबाबत आढावा घेऊन हातभट्टीच्या दारुस संपूर्ण पायबंद घालण्यासाठी उपाययोजना कराव्यात.पोलीस महासंचालक व आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी अवैध दारु धंदयाना संपूर्ण पायबंद घालण्यासाठी त्यांचे स्तरावरुन त्यांचे अधिनस्त घटक कार्यालय प्रमुखांना त्वरीत आदेश निर्गमित करावेत. तसेच, या शासन निर्णयास स्थानिक वृत्तपत्रामध्ये सुयोग्य प्रसिध्दी देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना. रा. शेरे )
उप सचिव, गृह विभाग

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस आयुक्त (सर्व)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य,मुंबई
सर्व विभागीय उप आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क)
विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व परिक्षेत्र)
जिल्हाधिकारी (सर्व)
पोलीस अधिक्षक (सर्व)
अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क (सर्व)
तहसीलदार (सर्व)
कार्यासन, विशा-५, इएक्ससी-२, इएक्ससी-३, गृह विभाग
निवड नस्ती, गृह विभाग

**महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७**
**पंचायतस्तरावरील समित्यांची रचना.**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्र.समिती-१००१/प्र.३६०/रोहयो-८,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ९।४। २००२.

वाचा :- १. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८०/ ७६/३७, दिनांक १७.३.१९८१.
२. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८१/ १०६/३७, दिनांक ४.१२.१९८१
३. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८१/ १०६/३७, दिनांक २६.२.१९८२.
४. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८०/ ७६/३७, दिनांक १९.३.१९८२.
५. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८०/ ७६/३७, दिनांक १०.८.१९८२.
६. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८०/ ७६/३७, दिनांक २५.३.१९८५.
७. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८५/ १६/इएमपी-८, दिनांक २८.५.१९८५.
८. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८५/ १६/इएमपी-८, दिनांक ११.७.१९८५.
९. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१३८५/ ४७/३७, दिनांक १८.१२.१९८५.
१०. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८५/ १६/इएमपी-८, दिनांक १९.१२.१९८५.
११. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१३८६/ २५/इएमपी-८, दिनांक १७.४.१९८६.
१२. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१३८६/ २७/इएमपी-८, दिनांक २८.४.१९८६.
१३. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१०८७/ ४४/रोहयो-८, दिनांक २९.७.१९८८.
१४. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१३९०/ १९/रोहयो-८, दिनांक २१.९.१९९०.
१५. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-११९२/ प्र.१२/रोहयो-८, दिनांक २८.४.१९९२.

18.5.02
EGS
2 MAY 2002
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
EGS 13 MAY 2002

१६. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.समिती-१३९५/ प्र.२४/रोहयो-८, दिनांक २८.४.१९९५.
१७. शासन परिपत्रक,नियोजन विभाग क्र.समिती-१०९८/ प्र.१७२/रोहयो-८, दिनांक ७.९.१९९८.
१८. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.इजीएस-१३८६/ प्र.२७/रोहयो-८, दिनांक २८.४.१९९८.
१९. शासन निर्णय,नियोजन विभाग क्र.रोहयो-२०९८/ प्र.२७/रोहयो-६, दिनांक ७.५.१९९९.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या कलम ५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन महाराष्ट्र शासन जिल्हा रोजगार हमी योजना समिती आणि पंचायत स्तरीय रोजगार हमी योजना समितीची रचना, कार्यकक्षा इत्यादी बाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे वेळोवेळी सदर निर्णयामध्ये नियोजन विभागाने सुधारणा करुन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या सर्व आदेशांचे एकत्रिकरण करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार शासन सप्टेंबर २००१ अखेर अस्तित्वात असलेले सर्व आदेश अधिक्रमित करुन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. <u>पंचायत स्तरीय रोजगार हमी योजना समिती रचना</u>

राज्यातील सर्व जिल्हयात (मुंबई जिल्हा वगळून) प्रत्येक पंचायत समिती करिता पंचायत स्तरावरील रोजगार हमी समितीची रचना खालीलप्रमाणे असावी.

| | | |
|---|---|---|
| १ | पंचायत समिती क्षेत्रातून निवडून आलेले विधानसभा सदस्य, पंचायत सदस्य समिती क्षेत्रातील विधान सभा सदस्य मंत्री/राज्यमंत्री असल्यास त्यांनी निवडून दिलेली व्यक्ती. | अध्यक्ष |
| २ | पंचायत समिती क्षेत्रात राहणारे विधान परिषद सदस्य. | सदस्य |
| ३ | पंचायत समिती सभापती. | सदस्य |
| ४ | मागासवर्गीय समाजाचे दोन सदस्य | सदस्य |
| ५ | अशासकीय दोन सदस्य | सदस्य |
| ६ | रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या मजूरांचे अथवा नोंदणी केलेल्या शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | एक महिला प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | प्रकल्प अधिकारी, (एकात्मिक आदिवासी विकास गट) | सदस्य |
| ९ | गट विकास अधिकारी | सदस्य |
| १० | तालुक्याचे तहसिलदार (समिती अधिकारी) | सदस्य सचिव |

पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीच्या संदर्भात केलेल्या तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

१) उपरोक्त समितीच्या रचनेतील अनु.क्र. ४,५,६ व ७ येथील अशासकीय सदस्यांची मुदत त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी राहील. या समित्यांवर नेमण्यात आलेल्या अशासकीय सदस्यांच्या नेमणूकीची मुदत संपल्यावर जर पुढील काळाकरिता अशा नेमणुका संबंधी शासनाचे आदेश नसल्यास त्या समित्यांवर नियुक्त करण्यात आलेले अशासकीय सदस्य पुढील आदेश होईपर्यन्त समितीवर सदस्य म्हणून राहतील.

२) पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीच्या रचनेनुसार आमदार, मागासवर्गीय समाजाचे सदस्य, रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या मजूरांचे अथवा नोंदणी केलेल्या शेत मजूर संघाचे प्रतिनिधी व महिला सदस्य यांच्या नेमणूकीचे अधिकार पालकमंत्री यांना आहेत.

३) पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीवर विरोधी पक्षाच्या आमदारांना सदस्य म्हणून घेण्यात यावे.

४) ज्या जिल्हयात पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे, त्या समितीवर विरोधी पक्षाच्या आमदारांची सदस्य म्हणून नियुक्ती झालेली असण्याचा संभव आहे. मात्र अशा प्रकारे विरोधी पक्षाला या समितीवर प्रतिनिधीत्व मिळाले नसल्यास विरोधी पक्षाच्या एखादया मान्यवर व्यक्तीची नेमणूक अशासकीय सदस्यां व्यतिरिक्त अतिरिक्त अशासकीय सदस्य म्हणून करण्यात यावी.

५) जिल्हयात पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीवरील अध्यक्ष, मागासवर्गीय समाजाचे दोन सदस्य, अशासकीय दोन सदस्य, रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या मजूरांचे अथवा नोंदणी केलेल्या शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी, एक महिला सदस्य यांच्या नेमणूकीचे अधिकार जिल्हा पालकमंत्री यांना आहेत. जिल्हा पालकमंत्र्यांच्या निर्णयानुसार संबंधित जिल्हाधिकारी आदेश काढतील व त्याची प्रत नियोजन विभागास सादर करतील.

६) जिल्हयात पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीवरील आमदार यांच्या नियुक्तीचा कालावधी समिती बरखास्त होईपर्यन्त अथवा त्या व्यक्ती आमदार या पदावर असेपर्यन्त (यापैकी जे आधी घडेल तोपर्यन्त) राहील.

७) पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीच्या कार्यकक्षेनुसार समितीने फक्त पंचायत समिती क्षेत्रातील मजूरांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कामाचे नियोजन करावे आणि मजूरांना मजूरी व सोईसवलती उपलब्ध होतात किंवा कसे याबाबत पाहणी करावी आणि आवश्यक त्या उपाययोजना जिल्हास्तरीय रोहयो समितीकडे कराव्यात.

पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीने कामाची तपासणी करावयाची नसल्याने पंचायतस्तरीय रोहयो समितीला शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या कामाच्या निरीक्षण/तपासणी अहवालाच्या प्रती सदर समितीला देण्याची आवश्यकता नाही. त्याप्रमाणे त्या प्रती त्यांना पुरविण्यात येऊ नये.

८) पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीची बैठक सर्वसाधारणपणे ३ महिन्यातून एकदा व आवश्यकता भासल्यास अधिक वेळाही घेण्यात यावी.

९) जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी कक्ष समितीला लागणारे आवश्यक ते कार्यालयीन सहाय्य करील.

१०) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.रोहयो-२०९७/प्र.१७७/रोहयो-६, दिनांक ८.९.९७ नुसार रोजगार हमी योजनेत सर्वकष सुधारणा करण्यासाठी मा.मंत्री (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शासनाने स्विकारलेल्या शिफारशीनुसार पंचायत समिती क्षेत्रातील रोहयो कामाची तपासणी करण्यासाठी स्थानिक स्तरीय समिती नेमण्याची तरतूद शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. रोहयो-२०९८/ प्र.२७/ रोहयो-६, दिनांक ७.७.९९ नुसार रद्द करण्यात आली आहे.

११) पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीचे शासकीय सदस्य हे ज्यावेळी समित्यांच्या बैठकीसाठी हजर राहतील, त्यावेळी त्यांना प्रवास भत्ता व दैनंदिन भत्ता, मुंबई मुलकी सेवा नियमानुसार मिळण्यास पात्र राहतील. अशासकीय सदस्यास (विधानमंडळ सदस्य वगळता) प्रवास भत्ता व दैनिक भत्ता उपरोक्त मुलकी सेवा नियम (खंड) २ मधील परिशिष्ट ४२-अ च्या भाग-१ मधील नियम १ (१) (ब) मधील स्केल २ प्रमाणे मिळेल. समित्यांवरील विधान मंडळाच्या सदस्यांस प्रवास भत्ता व दैनिक भत्ता उपरोक्त नियम १ (१) (२) नुसार अनुज्ञेय राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( ना.बा. पाटील )
सचिव,
रोजगार हमी योजना.

जिल्हास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समिती व तालुकास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समिती गठीत करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : जिस्तस -२०१५/प्र.क्र.५२/ऊर्जा-५**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ मार्च, २०१५.

**प्रस्तावना :**

वीज ही अत्यंत महत्वाची सेवा आहे. ग्राहक व वीज वितरण कंपनी यामध्ये संवाद व समन्वय नसल्यास अडचणीच्या प्रसंगी ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण होऊ नये व महावितरण कंपनीचा कारभार पारदर्शक व प्रभावीपणे चालविण्यासाठी व ग्राहकांना उत्तम व दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर विद्युत वितरण नियंत्रण समित्या नेमणे आवश्यक आहे. या समित्यांची संरचना परिशिष्ट- अ व ब मध्ये देण्यात आली असून, समितीच्या कार्यकक्षेबाबतचा तपशिल परिशिष्ट- क व ड मध्ये देण्यात आला आहे.

२. विद्युत अधिनियम, २००३ कलम १६६ (५) नुसार -

अ) प्रत्येक जिल्हयातील विद्युतीकरणाच्या विस्ताराचे समन्वयन व पुनर्विलोकन करण्यासाठी;

ब) वीज पुरवठयाच्या गुणवत्तेचे व ग्राहक संतोषाचे पुनर्विलोकन करण्यासाठी;

क) विजेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी राज्य शासनास जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याचे प्राधिकार आहेत.

त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे .

**शासन निर्णय :**

जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या गठित करण्यास याद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विद्युत वितरण समित्यांमध्ये ज्या सदस्यांचा अंतर्भाव करावयाचा आहे त्याबाबत माहिती सोबतच्या **परिशिष्ट "अ"** व **"ब"** मध्ये देण्यात आली आहे.

३. या समितीची कार्यकक्षा काय राहील याबाबत माहिती **परिशिष्ट "क"** व **"ड"** मध्ये देण्यात आली आहे. या कार्यकक्षेत समितीने आपले कार्य पार पाडून विद्युत वितरण विषयक शासनाच्या धोरणाची / निर्णयाची अंमलबजावणी करण्यास मदत करणे अपेक्षित आहे.

४. समितीच्या बैठका दर तीन महिन्यांनी घेण्यात याव्यात व बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांची/ शासनास करावयाच्या शिफारशी संदर्भात माहिती संबंधित मुख्य अभियंत्यामार्फत शासनास अवगत करावी.

५. सदर जिल्हास्तरीय समितीचे गठन संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावे व तालुकास्तरीय समितीचे गठण उपविभागीय अधिकारी (SDO) यांनी करावे. समितीचे गठन करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यापूर्वी अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीस मा. पालकमंत्री यांची सहमती संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधित मुख्य अभियंता, महावितरण यांच्या सहकार्याने घ्यावी. ही कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्यात पूर्ण करावी.

६. अशासकीय व शासकीय सदस्यांना प्रचलित नियमांनुसार प्रवास खर्च व देय भत्ते अनुज्ञेय नाही.

७. जिल्हास्तरीय समितीच्या अशासकीय सदस्यांना जिल्हाधिकारी यांनी व तालुका स्तरीय समितीच्या अशासकीय सदस्यांना उपविभागीय अधिकारी यांनी समितीचे ओळखपत्र द्यावे. अशासकीय सदस्यांच्या समितीवर केलेल्या नियुक्त्या शासनाच्या पुढील आदेशापर्यंत असल्याचे स्पष्टपणे संबंधित आदेशात नमुद करण्यात यावे तसेच सदर पदावर नियुक्त करण्याचे अधिकार अथवा पदमुक्त करण्याचे अधिकार शासन राखून ठेवित असल्याचा उल्लेखही आदेशात करण्यात यावा.

८. सर्व संबंधित मुख्य अभियंता, महावितरण / उपविभागीय अभियंता, महावितरण यांनी संबंधित जिल्हाधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी यांना समितीच्या गठन प्रकियेत सहकार्य करावे.

९. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी संबंधित जिल्हयाच्या/ तालुक्याच्या समित्यांच्या गठनासाठी अनुक्रमे अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता, महावितरण यांचे स्तरावरुन उचित सूचना द्याव्यात व तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांचे मार्फत समिती गठीत करण्याची कार्यवाही विहित कालमर्यादेत पार पाडली जावी याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

१०. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून यापूर्वी गठित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय विद्युत वितरण समित्या रद्द करण्यात येत आहेत.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१५०३२६११५६१४४३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

INAMDAR SIRAJ MANJAMIYA

Digitally signed by INAMDAR SIRAJ MANJAMIYA
DN: CN = INAMDAR SIRAJ MANJAMIYA, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = INDUSTRY ENERGY AND LABOUR,CID - 918056
Date: 2015.04.08 17:10:49 +05'30'

**(सि.मं.इनामदार)**
**शासनाचे सहसचिव**

**प्रत,**

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री(ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा,विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं.१,१३ वा मजला, मुंबई ०५.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
कक्ष अधिकारी, (प्रशासन-२), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.

# परिशिष्ट “अ”

जिल्हास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समितीची संरचना खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | पालकमंत्री |
| सदस्य | : | जिल्हयातील सर्व विधान परिषद / विधान सभा सदस्य |
| | : | अध्यक्ष, जिल्हा परिषद |
| | : | महापौर, महानगरपालिका |
| | : | जिल्हाधिकारी |
| | : | मनपा आयुक्त |
| | : | जिल्हा उद्योग अधिकारी |
| | : | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डी.सी. |
| | : | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |
| | : | पोलिस आयुक्त (शहर) |
| | : | पोलिस अधिक्षक (ग्रामीण) |
| | : | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (राज्य क्षेत्र) |
| | : | जिल्हा कृषी अधिकारी (जि.प.) |
| | : | अधिक्षक अभियंता, ग्रामिण / शहर मंडळ, महावितरण |
| | : | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| | : | विद्युत निरीक्षक, ऊर्जा विभाग |
| सदस्य सचिव | : | मुख्य अभियंता,महावितरण |
| ग्राहक प्रतिनिधी सदस्य | : | १. उद्योग क्षेत्र |
| ( पालकमंत्री निवडतील ते | | २.कृषी ग्राहक |
| ग्राहक प्रतिनिधी १ ते ६ ) | | ३. व्यावसायिक विद्युत क्षेत्र |
| | | ४. घरगुती विद्युत क्षेत्र |
| | : | ५ .वीज वितरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेली व्यक्ती |
| | | ६. वीज वितरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेली व्यक्ती |

# परिशिष्ट “ब”

तालुकास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समितीची संरचना खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | विधानसभा सदस्य (तालुक्यात एका पेक्षा जास्त संख्या असेल अशा प्रकरणी सर्वाधिक क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारे) (वि.स.स. मंत्री असतील तर मा. पालकमंत्री सुचवतील ते अध्यक्ष राहतील) |
| सहअध्यक्ष | - | क्षेत्रातील इतर विधानसभा सदस्य |
| सहअध्यक्ष | - | क्षेत्रातील कार्यकारी अभियंता,महावितरण |
| सदस्य | - | जि.प. सदस्य (सर्व) |
| - | | सभापती, पंचायत समिती |
| | | नगराध्यक्ष, तालुक्यातील सर्व नगरपालिका /नगर परिषदा /नगर पंचायती |
| - | | सभापती,कृषी उत्पन्न ( ए.पी.एम.सी.) |
| - | | तहसीलदार |
| - | | उपविभागीय पोलीस अधिकारी |
| - | | खंड विकास अधिकारी |
| - | | तालुका, कृषी अधिकारी, पं.स. |
| - | | तालुका, कृषी अधिकारी, राज्यक्षेत्र |
| सदस्य सचिव | - | उपविभागीय अभियंता, महावितरण (तालुक्यातील |
| जास्त | | |
| | | कार्यक्षेत्र असणारा) |
| प्रतिनिधी | | १. उद्योग क्षेत्र ग्राहक |
| (१ ते ६ सदस्य पालकमंत्री | | २. कृषी क्षेत्र ग्राहक |
| निवडतील ते प्रतिनिधी) | | ३. व्यावसायिक ग्राहक |
| | | ४. घरगुती ग्राहक |
| | | ५. वीज वितरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारी व्यक्ती |
| | | ६. वीज वितरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारी व्यक्ती |

# परिशिष्ट “क”

**जिल्हास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे :-**

१. महावितरणतर्फे सूरु असलेल्या पायाभूत आराखडा, गावठाणासाठी स्वतंत्र फिडर्स, दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना, एकात्मिक विद्युत विकास योजना, इतर कार्यान्वित असलेल्या योजना, देखभाल दुरुस्ती इत्यादी कामांचा आढावा घेणे, केंद्र व राज्य शासनाच्या वीज वितरणाबाबत सर्व योजनांचा आढावा घेणे.

२. महावितरणतर्फे विद्युत बिलांच्या वसुलीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

३. जिल्हयातील विजेचा गैरवापर रोखणे व त्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

४. जिल्हयातील पैसे भरुनही विद्युत जोडणी न मिळालेल्या कृषिपंप व घरगुती ग्राहकांच्या प्रलंबित जोडण्यांचा आढावा घेणे.

५. राज्य शासनातर्फे लवकरच सौर ऊर्जापंप दिले जाणार आहेत. या कामावर देखरेख ठेवणे व आढावा घेणे.

६. जिल्हयात सुरळीत व खात्रीशीर विद्युत पुरवठा व्हावा, ग्राहकांना व्यवस्थित सेवा मिळावी यासाठी मार्गदर्शन करणे.

७. समित्यांचे कामकाज योग्य पध्दतीने चालविण्यासाठी कालावधी निश्चित करणे. त्रैमासिक एक निश्चित तारीख ठरवावी व त्या दिवशी ती बैठक झालीच पाहिजे,असे बंधन असावे. सदस्य सचिवाने बैठकीचे आयोजन अध्यक्षांची वेळ घेऊन करावे.

८. समिती बैठकीत झालेली चर्चा व निर्णय योग्य माध्यमाद्वारे प्रसिध्द केले जावे .

९. समितीचे माध्यमातून मांडल्या गेलेल्या सूचनांची त्वरीत अंमलबजावणी करावी व केलेली अंमलबजावणी संबंधितांना कळवावी.

१०.समितीने नवीन प्रकल्प/ योजना सुचविल्यास त्याचा विचार करुन सक्षम प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवून मंजूर करणे. निधी मिळविणे.

११.समितीने वितरण कंपनी व ग्राहक यांच्यात समन्वय व संवाद साधावा.

१२.समितीसमोर ग्राहकांना त्यांची कैफियत / तक्रार मांडायची असेल तर तशी आगाऊ लेखी सूचना / तक्रार मागवून त्याला ती मांडण्याची व्यवस्था असावी .

१३.सदस्य महोदयांचा त्या- त्या स्तरावर योग्य तो सन्मान राखला जाईल याची दक्षता घ्यावी.

१४.सदस्यांना वीज वितरण कंपनीकडून ओळखपत्र द्यावे.

१५.महसूल वसूलीचे १००% उद्दिष्ट पूर्ण करणे, विजेची हानी कमी करणे, ग्राहक सेवा देणे व वीज वितरण क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हयातील एक कार्यकारी अभियंता / दोन अतिरिक्त कार्यकारी अभियंता / दोन उपकार्यकारी अभियंता / दोन सहाय्यक अभियंता / दोन वरिष्ठ तंत्रज्ञ/ दोन कनिष्ठ तंत्रज्ञ इतक्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची वार्षिक निवड करुन त्यांचा सत्कार जिल्हास्तरीय बैठकीत करण्यात यावा.

१६.नव्याने होत असलेल्या प्रकल्पाचे गुणवत्तेवर लक्ष देणे.

१७.विजेच्या पायाभूत सुविधा / देखभाल इत्यादी करीता जिल्हा नियोजन समिती / सामाजिक न्याय / अदिवासी विकास विभाग / शासनाचे इतर विभाग यांचेकडून निधी मिळविणे.

१८. वार्षिक जनता दरबार आयोजित करुन जनतेच्या समस्या सोडविणे.

१९.नैसर्गिक आपत्तीने उध्दवस्त झालेल्या पायाभूत सुविधा पुर्नस्थापन करणयाकरीता राज्याच्या मदत व पुनर्वसन खात्याकडून निधीची मागणी करणे.

२०.एनर्जी कॉन्झरवेशन पॉलिसीनुसार जिल्हयातील विजेची बचत करण्याकरीता उपाययोजना राबविणे.

२१.अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत तयार करुन अपारंपारिक ऊर्जा निर्माण करण्याचे प्रयत्न करणे.

------

## परिशिष्ट “ड”

### तालुकास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे :-

१. महावितरणतर्फे ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवेचा आढावा घेणे.
२. महावितरणतर्फे विद्युत बिलांच्या वसुलीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
३. विजेचा अनधिकृत वापर रोखणे व त्यासाठी महावितरणकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेणे / विजेची चोरी थांबविणेकरीता उपाययोजना करणे.
४. प्रलंबीत नवीन कृषिपंप व घरगुती जोडण्यांचा आढावा घेणे.
५. महावितरणतर्फे सुरु असलेल्या पायाभूत, देखभाल दुरुस्ती व तत्सम कामांचा आढावा घेणे.
६. सदस्यांकडून नवीन पायाभूत कामाबाबत / देखभाल दुरुस्तीबाबत आलेल्या सूचना घेऊन चर्चा करणे.
७. महावितरणच्या थकबाकी वसूलीबाबत जनजागृती व चर्चा करणे.
८. वीज वाहिन्यांची सुव्यवस्था व देखरेख ठेवणे. गावातील जीर्ण व जुन्या लाईनच्या देखभाल / दुरुस्तीबाबत योजना तयार करणे.
९. विजेचे अपघात टाळण्याबाबत जनमाणसात जनजागृती करण्याबाबत चर्चा करणे व गावातील ग्राहकांना वेळोवेळी वीज सुरक्षिततेची माहिती देणे, अनधिकृत वीज जोडण्या घेण्यापासून परावृत्त करणे.
१०.वीज वाहिन्यांच्या उभारणीच्या कामात येणारे अडथळे दूर करणे.
११.Energy Conservation Policy ची अंमलबजावणी करणे.
१२.भारनियमन कमी करण्याकरिता चर्चा करुन खालील बाबी राबविणे.
(१) ट्रान्सफॉर्मर बिघाड व जळण्याचे प्रमाण कमी करण्याकरीता जनजागरण करणे.
(२) डी.सी.एल. ग्रुप मध्ये सुधारणा करणे.
(३) वेळेवर वीज बील भरण्याबाबत ग्राहकांना प्रवृत्त करणे.
(४) थकबाकी वसूली मोहिम राबविणे.
(५) वीजचोरी शोध मोहिमेस मदत करणे.
(६) वीज चोरी करणाऱ्याबाबत माहिती घेवून मोहिम सुरु करणे.

१३.अपारंपारिक उर्जा क्षेत्राबाबत नियोजन करणे.
१४. वीज बीलाबाबत उदभवणाऱ्या तक्रारीवर चर्चा करुन निवारण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.
१५.समन्वय समितीचा त्रैमासिक अहवाल मुख्य अभियंता, महावितरण कार्यालयास सादर करणे.
१६.नव्याने होत असलेल्या प्रकल्पाचे गुणवत्तेवर लक्ष देणे.
१७.विजेच्या पायाभूत सुविधा / देखभाल इत्यादी करीता जिल्हा नियोजन समिती /सामाजिक न्याय / अदिवासी विकास विभाग / शासनाचे इतर विभाग यांचेकडून निधी मिळविणे.
१८.वार्षिक जनता दरबार आयोजित करुन जनतेच्या समस्या सोडविणे.
१९.दर तीन महिन्यांनी बैठक आयोजित करण्याची जबाबदारी सदस्य सचिव यांची राहिल. अध्यक्षांसोबत चर्चा करुन वेळ निश्चित करावी व नियमित बैठक घ्यावी.

**सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन
## जलसंधारण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १ मार्च, २०१६

<u>वाचा-</u>

**१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक : जलअ -२०१४/ प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर,२०१४, व दिनांक ०३ मार्च, २०१५**

**२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन शुद्धीपत्रक क्रमांक : जलअ -२०१४/ प्र.क्र.२०३ / जल-७ दिनांक २८ जानेवारी, २०१५**

<u>प्रस्तावना</u> :

सर्वासाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र -२०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायस्वरूपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राज्यात संदर्भाधीन दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर २०१४ च्या परिच्छेद क्रमांक ५ मध्ये सुधारणा करून आता तालुका स्तरावर तालुक्यातील विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली आढावा व समन्वय समितीचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर, २०१४ मधील परि. क्र ५ नुसार तालुका स्तरीय आराखडा सर्व यंत्रणांच्या समन्वयाने तयार करून जिल्हास्तरीय समितीस सादर करण्याकरिता उपविभागिय अधिकारी (प्रांत) यांच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची कार्यकक्षा अबाधित ठेवून अभियांनातर्गत राबविल्या जाण-या प्रकल्पांच्या आढावा घेणे व समन्वय करणे यासाठी खालीलप्रमाणे तालुकास्तरीय आढावा व समन्वय समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

**तालुकास्तरीय आढावा व समन्वय समिती** : या अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पांचे आढावा घेणे व समन्वय करणे यासाठी तालुक्यातील विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| १. तालुक्यातील विधानसभा सदस्य | : | अध्यक्ष |
| २. उपविभागीय अधिकारी (प्रांत) | : | सह अध्यक्ष |
| ३. तालुक्यातील विधान परिषद सदस्य | : | विशेष आमंत्रित |
| ४. पंचायत समिती सभापती | : | सदस्य |
| ५. तहसिलदार | : | सदस्य सचिव |
| ६. गट विकास अधिकारी | : | सदस्य |
| ७. उपविभागिय कृषि अधिकारी | : | सदस्य |
| ८. तालुक्यातील पातळीवरील सर्व संबंधीत अधिकारी | : | आमंत्रित |

**समितीची कार्यकक्षा** :

१. कार्यक्रमाचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

२.वेगवेगळ्या विभागात समन्वय करून Convergence करण्याकरिता मार्गदर्शन करणे.

३. कार्यक्रमाबाबत तालुकास्तरावर येत असलेल्या अडचणीचे निराकरण करणे

४. तालुक्यातील गावामधील लोकांचा अभियानाकरिता सहभाग वाढविणे

५. घेण्यात आलेल्या आढाव्यामधील बाबी जिल्हास्तरीय आढावा व संनियंत्रण समितीस कळविणे

६. या समितीची बैठक दोन महिन्यातून एकदा घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३०११६३०१९३४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b61892a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2016.03.05 12:41:51 +05'30'

**(वि.सि.वखारे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा सभापती विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव

३. मा अध्यक्ष विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव

४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
७. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
८. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे
१४. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
१६. सर्व जिल्हाधिकारी
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१८. महालेखापाल ½, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२१. सर्व उपायुक्त (विकास) , विभागीय आयुक्त कार्यालय,
२२. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२३. सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
२४. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२५. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण)
२६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२७.सर्व मंत्रालयीन विभाग
२८. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्रा. वि. व ज. सं. विभाग
२९. नियोजन विभाग /वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०. कार्यासन जल-११ ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.
३१. जल-७, निवड नस्ती.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः ताक्रीसं-१४१५/प्र.क्र.१३९/क्रीयुसे-१

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : २९ फेब्रुवारी, २०१६

**वाचा :**

१) **शासन निर्णय क्रमांकः सामाजिक न्याय व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००३/(प्र.क्र.११)/ क्रीयुसे-१, दिनांक २६.०३.२००३.**

२) **शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/ क्रीयुसे-१, दिनांक २१.०३.२००९.**

३) **शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.१३११/प्र.क्र.२६२/पुनर्बांधणी धारीका-७/ क्रीयुसे-१, दिनांक १९ सप्टेंबर, २०१४.**

४) **शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.ताक्रीस-१४१५/प्र.क्र.१३९)/ क्रीयुसे-१, दिनांक २०.०६.२०१५.**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ अंतर्गत विभागीय / जिल्हा /तालुका क्रीडा संकुलांची उभारणी करण्याची योजना दिनांक २६.०३.२००३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. या संकुलांची उभारणी स्वतंत्र व नोंदणीकृत क्रीडा संकुल समितीमार्फत होत आहे. या क्रीडा संकुलाचे अनुदान मर्यादा दिनांक २१.०३.२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्र.३ च्या शुध्दीपत्रकान्वये तालुका क्रीडा संकुल समितीच्या आंमत्रितांच्या यादीमध्ये तालुक्यांचे आमदार यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. मार्च २०१५ च्या विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये राज्यातील क्रीडा संकुलांच्या उभारणी सदंर्भात झालेल्या चर्चेच्यावेळी मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांनी संबंधित तालुक्यातील आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबतची घोषणा केली होती. त्यानुसार संदर्भाधीन क्र.४ अन्वये तालुका क्रीडा संकुल समिती गठीत करण्यात आली होती. तथापि, राज्यातील विविध तालुकानिहाय क्रीडा संकुल समितीची रचना सदर शासन निर्णयानुसार करताना काही व्यवहारीक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आल्याने तालुका क्रीडा संकुल समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

उपरोक्त पार्श्वभूमीवर यापूर्वी तालुका क्रीडा संकुल समितीच्या रचनेबाबत निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमीत करुन पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. संबंधित तालुक्याचे आमदार<br>(तथापि, एकाच मतदार संघात दोन तालुके असल्यास दुसऱ्या तालुका क्रीडा संकुलासाठी विधान परिषद सदस्यांचा अध्यक्ष म्हणून प्राध्यान्याने विचार करण्यात येईल. तसेच स्थानिक आमदार म्हणजे ज्या मतदार संघात क्रीडा संकुलाची जागा प्राप्त आहे ते स्थानिक आमदार अथवा जे आमदार वरिष्ठ असतील ते आमदार समितीचे अध्यक्ष असतील.) | : | अध्यक्ष |
| २. तहसिलदार | : | कार्याध्यक्ष |
| ३. संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी | : | सदस्य |
| ४. महानगरपालिका/नगरपालिका/पंचायत समिती यांचा प्रतिनिधी (अधिकारी) | : | सदस्य |
| ५. गट विकास अधिकारी | : | सदस्य |
| ६. उपअभियंता, सा.बां.वि. / नगरपरिषद / महानगर-पालिका अथवा त्यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ७. गटशिक्षण अधिकारी | : | सदस्य |
| ८. पोलिस निरिक्षक (जागा ज्या हद्दीत असेल त्या हद्दीतील पोलिस स्टेशनमधील) | : | सदस्य |
| ९. तालुका क्रीडा अधिकारी अथवा संबंधित क्रीडा अधिकारी / राज्य क्रीडा मार्गदर्शक (संबंधित) | : | सदस्य सचिव |

**<u>आंमत्रित सदस्य :-</u>**

अ) शारिरीक शिक्षण शिक्षक, तालुका क्रीडा मंडळे यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी.

आ) तालुका मुख्याध्यापक, शारिरीक शिक्षण शिक्षक संघटना प्रतिनिधी.

इ) तालुक्यातील राष्ट्रीय व राज्य पातळीवरील खेळाडूंचा एक प्रतिनिधी.

ई) तालुक्यातील महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचा एक सदस्य.

**<u>समितीची कार्यकक्षा :-</u>**

१) संबंधित तालुक्यामध्ये आवश्यक असलेल्या/ मागणी करण्यात आलेल्या क्रीडा विषयक/ खेळाबाबत उभारावयाच्या क्रीडा सुविधा विचारात घेऊन क्रीडा संकुलाची १ वर्षाच्या कालावधीमध्ये उभारणी करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे. त्यासंदर्भात अतिरिक्त निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आमदार विकास निधी व अन्य आर्थिक स्रोत निर्माण करणे.

२) उभारण्यात आलेल्या क्रीडा विषयक सुविधांचा महत्तम वापर करण्याच्या तसेच तालुका क्रीडा संकुलाची देखभाल / दुरुस्ती संदर्भात क्रीडा संकुलामध्ये आवश्यकतेनुसार केअर टेकरची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे.

३) संबंधित तालुक्याच्या क्षेत्रातील शाळा/महाविद्यालये यामधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी तालुका क्रीडा संकुलाचा वापर करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाय योजना करणे तसेच शालेय त्याचप्रमाणे अन्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे.

२. उपरोक्त सुधारित तरतूदीनुसार संबंधित मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाकडे संपर्क साधून तालुका क्रीडा संकुल समितीची पुनर्रचना करण्याची कार्यवाही सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी तातडीने पूर्ण करावी. या कार्यवाहीचा आढावा विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी घ्यावा. त्याप्रमाणे तालुका क्रीडा संकुल समित्यांच्या पुनर्रचनेचा एकत्रित अहवाल शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्या पर्यत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने शासनास सादर करावा.

३. वरिल समितीमधील तहसिलदार व सदस्य सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीच्या आधारे तसेच समितीच्या मान्यतेने आर्थिक व्यवहार हाताळण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. या शासन निर्णयातील तरतूदी शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२२९१२१९४५५०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Narhar Joshi

Digitally signed by Sudhir Narhar Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae398dc3198690b46b6cf9b227ff99cbbfa40f24b5beeb33a668bc465f937400, cn=Sudhir Narhar Joshi
Date: 2016.02.29 12:21:45 +05'30'

**(सु.न.जोशी)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
४) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
५) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) सर्व विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा.
७) सर्व विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद.
८) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई.

९) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रबंधक, लोकआयुक्त व उपआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१४) सर्व विभागीय आयुक्त.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
१७) आयुक्त, शिक्षण, पुणे.
१८) शिक्षण संचालक, प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक,पुणे.
१९) अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, पुणे.
२०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२१) सर्व विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा. (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)
२२) सर्व जिल्हा / तालुका क्रीडा अधिकारी. (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)
२३) सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मुंबई.
२४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
२५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
२६) नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई.
२७) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
२८) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
२९) अवर सचिव, (क्रीयुसे - २, क्रीयुसे- ३)
३०) निवडनस्ती, क्रीयुसे-१.

**कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यात जिल्हा/तालुका स्तरावर शांतता समिती स्थापन करुन प्रभावीपणे कार्यरत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग (विशेष)**
परिपत्रक क्रमांक- डीआयएस २००१/ सीआर-३१५/विशा-१(ब),
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२, दिनांक ०३ जून, २००३.

**वाचा** : १) जातीय दंगली हाताळण्यासाठी मार्गदर्शक तत्वे- १९८६.
२) शासनाचे अर्धशासकीय पत्र क्र.एमआयएस १०९७/सीएम-१९/सीआर ४६३/विशा-१ब,दिनांक ६.९.९९ अन्वये पाठविण्यात आलेल्या केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या जातीय सलोख्या संदर्भातील मार्गदर्शक तत्वे.
३) शासन परिपत्रक, गृह विभाग,क्र.एमआयएस १०९९/२२१४/सीआर २१४/वि.शा.१ ब, दिनांक २९.९.९९ अन्वये न्या.श्रीकृष्ण चौकशी आयोगाच्या शिफारशीनुसार देण्यात आलेल्या सूचना.
४) शासन परिपत्रक, गृह विभाग ( विशेष ) क्र.एमआयएस १०९७/सीआर-४६३ /सीएम-१९/वि.शा.१(ब), दिनांक ८.९.९९ अन्वये मोहल्ला समितीच्या स्थापनेबद्दल देण्यात आलेल्या सूचना.

**परिपत्रक** :- राज्यातील जातीय तणावाच्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था , जातीय सलोखा व शांतता राखण्याच्या दृष्टीने जिल्हा व पोलीस स्तरावर तसेच जातीय तणावाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या इतर ठिकाणी शांतता समिती स्थापन करण्याबाबत वर नमूद केलेल्या आदेशान्वये शासनाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. जरी अशाप्रकारे शांतता समिती स्थापन होऊन कार्यान्वित असल्या तरी या समितीची रचना, कार्यपध्दती, सदस्यांची निवड, बैठकांची वारंवारता यामध्ये सारखेपणा नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे या शांतता समितीची रचना व कार्यपध्दती यामध्ये सारखेपणा आणण्यासाठी स्थायी स्वरुपात नव्याने आदेश देण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.

वर नमूद केलेल्या परिस्थितीत राज्यात शांतता समित्या खालीलप्रमाणे **पुनर्गठीत** करण्यात याव्यात :-

१) सदर शांतता समिती जिल्हयात जिल्हा, तालुका, पोलीस ठाणे स्तरावर तर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात पोलीस मुख्यालय, परिमंडळ आणि पोलीस ठाणे स्तरावर स्थापन कराव्यात.

२) जिल्हा स्तरावरील व पोलीस आयुक्तालयातील मुख्यालय स्तरावरील शांतता समितीमध्ये ३० ते ४० सदस्य तर तालुका / परिमंडळ व

पोलीस ठाणे स्तरावरील शांतता समितीमध्ये २० ते २५ सदस्य असतील.

३) शांतता समितीमध्ये अशासकीय सदस्यांच्या नेमणूका जिल्हा स्तरावर जिल्हादंडाधिकारी, तालुका स्तरावर तहसिलदार , तर पोलीस ठाणे स्तरावर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी कराव्यात. तसेच पोलीस आयुक्तालय स्तरावर पोलीस आयुक्त, परिमंडळ स्तरावर संबंधित पोलीस उप आयुक्त आणि पोलीस ठाणे स्तरावर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी अशासकीय सदस्यांची नेमणूक करावी. जिल्ह्यातील तालुका आणि पोलीस ठाणे स्तरावर तसेच आयुक्तालयातील परिमंडळ( पोलीस उपायुक्त) आणि पोलीस ठाणे स्तरावरील शांतता समितीमध्ये अशासकीय सदस्यांच्या नेमणूका करण्यापूर्वी अशा अशासकीय सदस्यांची नावे अनुक्रमे जिल्हा दंडाधिकारी / पोलीस आयुक्त यांच्याकडून मान्य करून घेण्यात यावीत.

४) सदर अशासकीय सदस्यांच्या नेमणूका दोन वर्षाकरिता करण्यात याव्यात आणि त्यानंतर नव्याने नेमणूका करण्यात याव्या.

५) पोलीस ठाणे, तालुका, परिमंडळ स्तरावर दर दोन महिन्याने व जिल्हा आणि पोलीस आयुक्तालय स्तरावर दर तीन महिन्याने शांतता समितीच्या बैठका आयोजित कराव्यात.

६) याखेरीज महत्वाचे सण व धार्मिक उत्सव आणि ज्यावेळी जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता असेल किंवा जातीय तणाव निर्माण झाला असेल अशा प्रत्येकवेळी शांतता समितीची बैठक आयोजित करावी.

अ) <u>जिल्हा शांतता समिती</u> -

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हा दंडाधिकारी | - | अध्यक्ष (स्थायी ) |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) | - | सदस्य (स्थायी) |
| ३) पोलीस अधिक्षक | - | सदस्य (स्थायी ) |
| ४)जिल्हा परिषद अध्यक्ष | - | सदस्य |
| ५) जिल्हयातीललोकसभा/राज्यसभा/ विधानसभा/विधान परिषद सदस्य | - | सदस्य (स्थायी ) |
| ६) राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य (असल्यास) | - | सदस्य (स्थायी ) |
| ७) अतिरिक्त पोलीस अधिक्षक / पोलीस उप अधीक्षक | - | सदस्य सचिव (स्थायी) |
| ८) सर्व धर्माच्या मान्यवर व्यक्ती | - | सदस्य (अस्थायी ) |
| ९) समाजातील मान्यवर व्यक्ती | - | सदस्य (अस्थायी ) |

अ) सामाजिक संघटनांचे सदस्य

ब) वकील/निवृत्त पोलीस अधिकारी/डॉक्टर

क) एनजीओ चे सदस्य



एच-324(1000-56-03)1अ

ड) व्यापारी, दुकानदार, उद्योजक, कामगार क्षेत्रातील व्यक्ती.

इ) शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती

**ब) <u>तालुका स्तरावरील शांतता समिती</u> -**

| | | |
|---|---|---|
| १) तहसिलदार / उपविभागीय दंडाधिकारी | - | अध्यक्ष (स्थायी) |
| २) तालूका पोलीस स्टेशन प्रमुख | - | सदस्य सचिव (स्थायी) |
| ३) त्या तालुक्यातील लोकसभा/राज्यसभा सदस्य (असल्यास) विधानमंडळ सदस्य / नगराध्यक्ष / पंचायत समितीचे सभापती. | - | सदस्य (स्थायी) |
| ४) सर्व धर्मांच्या मान्यवर व्यक्ती | - | सदस्य (अस्थायी) |
| ५) सर्व समाजातील मान्यवर व प्रतिष्ठित व्यक्ती | - | सदस्य (अस्थायी) |

अ) सामाजिक संघटनांचे सदस्य

ब) वकील/निवृत्त पोलीस अधिकारी / डॉक्टर

क) एनजीओ चे सदस्य

ड) व्यापारी, दुकानदार, उद्योजक, कामगार क्षेत्रातील व्यक्ती.

इ) शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती

**क) आयुक्तालय स्तरावरील शांतता समिती -**

| | | |
|---|---|---|
| १) पोलीस आयुक्त | - | अध्यक्ष (स्थायी) |
| २) सह पोलीस आयुक्त/उपायुक्त (मुख्यालय) | - | सदस्य सचिव |
| ३) त्या आयुक्तालय क्षेत्रातील लोकसभा/राज्यसभा सदस्य (असल्यास) विधानमंडळ सदस्य नगरसेवक. | - | सदस्य (स्थायी) |
| ४) सर्व धर्मांच्या मान्यवर व्यक्ती | - | सदस्य (अस्थायी) |
| ५) सर्व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती | - | सदस्य (अस्थायी) |

अ) सामाजिक संघटनांचे सदस्य

ब) वकील/निवृत्त पोलीस अधिकारी / डॉक्टर

क) एनजीओ चे सदस्य

ड) व्यापारी, दुकानदार, उद्योजक, कामगार क्षेत्रातील व्यक्ती.

इ) शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती

**ड) परिमंडळ स्तरावरील शांतता समिती -**

| | | |
|---|---|---|
| १) पोलीस उपायुक्त | - | अध्यक्ष |
| २) वरिष्ठ सहायक पोलीस आयुक्त | - | सदस्य सचिव |

३) या परिसरातील विधानमंडळ सदस्य/ नगरसेवक - सदस्य
४) सर्व धर्माच्या मान्यवर व्यक्ती - सदस्य (अस्थायी)
५) सर्व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती - सदस्य (अस्थायी)
अ) सामाजिक संघटनांचे सदस्य
ब) वकील/निवृत्त पोलीस अधिकारी /डॉक्टर
क) एनजीओ चे सदस्य
ड) व्यापारी, दुकानदार, उद्योजक, कामगार क्षेत्रातील व्यक्ती.
इ) शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती

**इ) पोलीस स्टेशन स्तरावरील शांतता समिती -**

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक/पोलीस निरीक्षक - अध्यक्ष
२) पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक - सदस्य सचिव
३) त्या परिसरातील विधानमंडळ सदस्य/नगरसेवक नगराध्यक्ष/पंचायत समिती सदस्य - सदस्य (स्थायी)
४) सर्व धर्माच्या मान्यवर व्यक्ती - सदस्य (अस्थायी)
५) सर्व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती - सदस्य (अस्थायी)
अ) सामाजिक संघटनांचे सदस्य
ब) वकील/निवृत्त पोलीस अधिकारी /डॉक्टर
क) एनजीओ चे सदस्य
ड) व्यापारी, दुकानदार, उद्योजक, कामगार क्षेत्रातील व्यक्ती.
इ) शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती

**समितीवर नियुक्ती करतांना खालील निकष विचारात घेण्यात यावेत :-**

१) शांतता समितीमध्ये जिल्हा / तालुका / आयुक्तालय / परिमंडळ / पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणा-या लोकांचा समावेश करावा.
२) शांतता समित्यामध्ये पुरोगामी दृष्टीकोन असलेल्या प्रभावी व्यक्तीचा समावेश असावा व ते सर्व थरांचे प्रतिनिधीत्व करणारे असावेत.
३) विविध क्षेत्रातील बुध्दीवान व्यक्तींना / निष्कलंक चारित्र्याचे स्थानिक राजकीय नेते यांना प्राधान्य देण्यात यावे.
४) शिक्षक / वकील / पत्रकार/ निवृत्त पोलीस अधिकारी यांना प्राधान्य देण्यात यावे.
५) निवडण्यात येणारे सदस्य निधर्मी बाण्याचे असावेत, कोणत्याही गोष्टीबद्दल त्यांची विचारशक्ती तर्कसंगत असावी व ते ज्या जमातीमधील असतील त्या जमातीचा त्यांच्यावर विश्वास असावा.
६) गुन्हेगार पार्श्वभूमी असणा-या व्यक्ती सदस्य म्हणून राहणार नाहीत.

७) समाजात ज्याचा लौकिक चांगला नाही अशा व्यक्तीची, किंवा जातीयवादी म्हणून प्रसिध्द असलेल्या व्यक्तीची तसेच समाजविरोधी कारवाया करणा-या व्यक्तीची समितीवर नेमणूक करण्यात येऊ नये.

**शांतता समितीच्या कक्षेतील विषय :-**

१) जातीय तणावाची शक्यता असल्यास, त्या संदर्भात विषयावर चर्चा करण्यासाठी समितीची बैठक बोलवावी. तणावाच्या कारणाबद्दल सर्वमान्य तोडगा काढणे व तणावग्रस्त परिस्थिती निवळण्यासाठी सर्व स्तरावरील जाती जमातीचे सहकार्य मिळविण्यासाठी शांतता समितीच्या सदस्यांनी प्रयत्न करावेत.

२) दंगलीनंतर लगेचच परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि परिस्थिती पुर्ववत करण्याच्या कामासाठी समितीची बैठक घेण्यात यावी व उपाययोजना सूचविणे.

३) शांतता समित्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक सरकारी यंत्रणेशी संपर्क साधावा.

४) जातीय दंगल/तणावात, निराधार झालेली मुले व विधवा यांना नॅशनल फाँऊडेशन फॉर कम्युनल हारमनी यांच्याकडून आर्थिक मदत देण्यासाठी प्रशासनाला मदत करावी.

५) जातीय दंगल/तणावाच्या वेळी एका समाजाच्या व्यक्तीने/लोकांनी दुस-या समाजाच्या लोकांचे प्राण वाचविले किंवा मालमत्ता वाचविण्याचा प्रयत्न केला तर अशा व्यक्ती/लोकांची नावे जिल्हा प्रशासनास कळवावी. जिल्हा प्रशासनाने अशा व्यक्ती/लोकांची नावे कबीर पुरस्कारासाठी केंद्र शासनास पाठविण्यासाठी शिफारस करावी.

६) बैठकीत कायदा व सुव्यवस्था विषयक समस्या, सुरक्षिततेचे उपाय, जातीय सलोखा अबाधीत राहण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात यावी.

७) शांतता व सुव्यवस्था कायम राखणे, ती बिघडल्यास सुधारणा करण्याकरीता उपाययोजना करण्याबद्दल तसेच जातीय तंटे व वाद याबद्दल समितीने वेळोवेळी सल्ला द्यावा आणि अशी परिस्थिती निर्माण झाल्यास, त्यातून उद्भवणा-या प्रश्नाची/अडचणीची सोडवणूक करण्यासाठी समितीने प्रयत्न करावा.

८) या संदर्भात तात्पुरते व कायमचे पुनर्वसन व मदत करण्यासाठी समितीने सल्ला द्यावा तसेच नागरिकांच्या मदतीच्या व पुनर्वसनाच्या कामामध्ये देखील सहकार्य करावे.

९) दंगलीच्या कालावधीत अफवा पसरणार नाहीत याबद्दल प्रयत्न करणे व दंगलीत सहभागी होण्यापासून लोकांना प्रवृत्त करण्यासाठी प्रयत्न करावे.

१०) अस्थायी सदस्यांच्या नियुक्ती संदर्भात २ वर्षांनी पुनर्विलोकन करावे व त्यांच्या पुनर्नेमणुकी बाबत निर्णय घेण्यात यावा.

११) पोलीस स्टेशन/परिमंडळ हद्दीत घडलेल्या जाती जमातीतील तक्रारी, असंतोष /गुन्हे यांची दखल घेऊन बैठकीत चर्चा करण्यात यावी.

१२) सर्व धर्मीयांच्या व इतर महत्वाच्या मिरवणूकांमध्ये विशेषत: गणपती, शिवजयंती, मोहरम या सणांच्या वेळी सर्व जाती धर्माच्या लोकांचा सहभाग असावा व शांतता समिती सदस्यांनी विशेष करुन संवेदनशील भागात सुरुवातीपासून शेवटपर्यंत आवर्जून उपस्थित रहावे.

१३) शांतता समितीच्या बैठकींना उपस्थित राहणा-या अशासकीय सदस्यांना कोणतेही मानधन व बैठक भत्ता देय होणार नाही.

१४) शांतता समितीवर नियुक्त केलेल्या अशासकीय सदस्याची नियुक्ती केव्हाही रद्द करण्याचे अधिकार शांतता समितीच्या अध्यक्षांना राहतील.

१५) इतर अनुषंगिक बाबी.

**शांतता समितीच्या बैठका :-**

१) शांतता समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत बैठक झाल्यापासून १० दिवसात संबंधित पोलीस आयुक्त व जिल्हा दंडाधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्याकडे पाठविण्यात यावा.

२) प्रत्येक सहामाहीत झालेल्या शांतता समितीच्या बैठकीमधील कार्यवृत्तांतावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल पोलीस आयुक्त /जिल्हा दंडाधिकारी / जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठवावा व त्यांनी एकत्रित अहवाल गृह विभागाला पाठवावा.

३) राज्यात किंवा राज्याबाहेर कोठेही जातीय दंगलीचा उद्रेक झाल्यास शांतता समितीची खास बैठक बोलाविण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( र. य. सलोखे )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन, गृह विभाग (विशेष)

प्रति,

१) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२) उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
४)अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहाय्यक,
५) प्रधान सचिव, गृह (विशेष) यांचे स्वीय सहाय्यक,
६) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७) सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक,(परिक्षेत्र)
८) पोलीस आयुक्त बृहन्मुंबई,
९) सर्व जिल्हादंडाधिकारी,
१०) सर्व पोलीस आयुक्त,
११) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक,
१२) गृह विभागातील सर्व कार्यासने,
१३) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) निवड नस्ती [ विशा-१(ब)].

एच–324(1000–6–03)3अ.

एकात्मिकृत विकासासाठी तालुका समन्वय
व पुनर्विलोकन समित्यांचे पुनर्घटन.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: तासपु-१०९०/सीआर-४०/योजना-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १६ मे, १९९०.

वाचा :- १] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: एमआयएस्-१०७५/पी-१, दिनांक १७ जानेवारी, १९७५.

२] शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक: एमआयएस्-१०७५/पी-१, दिनांक २७ मार्च, १९७५.

३] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: एमआयएस्-१०७८/ पीआरजी-बी, दिनांक ५ ऑक्टोबर, १९७८.

४] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: एमआयएस्-१०७९/ पीआरजी-बी, दिनांक २० एप्रिल, १९७९.

५] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: डीपीसी-१०८०/डेस्क-१७, दिनांक २९ ऑगस्ट, १९८०.

६] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: एमआयएस-१०८२/ सीआर-५१/डी-१७, दिनांक १० ऑगस्ट, १९८२.

७] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: डीपीसी-१०८५/४/ पीआरजी-२, दिनांक १८ एप्रिल, १९८५.

८] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: डीपीसी-१०८५/४/ पीआरजी-२, दिनांक २८ ऑगस्ट, १९८५.

९] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: १०८५/४/पीआरजी-२, दिनांक ३ जानेवारी, १९८६.

१०] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: १०८५/४/पीआरजी-२, दिनांक २३ एप्रिल, १९८६.

शासन निर्णय :- ग्रामीण क्षेत्राचा सर्वांगीण आणि व्यापक विकास घडून यावा या हेतूने आणि विशेषत: समाजातील अविकसित स्तराच्या विकासावर भर देण्याच्या दृष्टीने शासनाने सामाजिक व आर्थिक विकासाचे अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत. या कार्यक्रमांचे यशापयश हे सर्वस्वी ते कशा पध्दतीने कार्यान्वित केले जातात आणि या कार्यक्रमाशी संलग्न असलेले स्थानिक नेतृत्व आणि स्थानिक पुढाकार यांच्यावर अवलंबून असते. हे लक्षात घेऊन शासनाने तालुका पातळीवर नमूद केलेल्या वरील शासन निर्णयानुसार "एकात्मिकृत विकासासाठी तालुका समन्वय आणि पुनर्विलोकन समित्या" स्थापन केल्या आहेत. या समित्यांच्या आतापर्यंतच्या कामकाजाचा अनुभव तसेच [illegible]

वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश लक्षात घेऊन या समितीची रचना व समितीचे कार्यक्षेत्र यात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या आदेशासह आतापर्यंत निर्गमित केलेले सर्व आदेश, तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीच्या घटनेविषयी व त्यांच्या कार्यपध्दती विषयी येथपर्यंत्या संबंध असेल तेथपर्यंत्या, रद्दबातल करुन शासन असे आदेश देत आहे की, तालुका पातळी-वरील "एकात्मिकृत विकासासाठी समन्वय व पुनर्विलोकन समित्या" यांची रचना खाली दर्शविल्याप्रमाणे असावी :-

१] संबंधित विभागातून निवडून आलेले राज्य विधानसभेचे सदस्य.

२] संबंधित विभागात कायमचे वास्तव्य करणारे राज्य विधानपरिषदेचे सदस्य.

३] संबंधित पंचायत समितीचे अध्यक्ष

४] संबंधित विभागातील खरेदी विक्री संस्थेचे/संस्थांचे अध्यक्ष

५] संबंधित प्रभारी तहसिलदार ———————————— सदस्य सचिव

६] संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अध्यक्षांनी नियुक्त करावयाचे ५ अशासकीय सदस्य. यामध्ये एक सदस्य अनुसूचित जाती/जमाती/नवबौध्द/विमुक्त जाती/भटक्या जमाती या मागास-वर्गीयांपैकी असावा.

७] जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अध्यक्षांनी नियुक्त करावयाच्या २ अशासकीय महिला सदस्या.

३. ज्या तालुक्याचे व विधानसभा मतदार संघाचे भौगोलिक क्षेत्र सारखेच असेल त्या तालुक्याच्या एकात्मिकृत समन्वय व पुनर्विलोकन समित्यांचे अध्यक्ष हे त्या मतदारसंघातून निवडून आलेले विधानसभा सदस्य असतील. ज्या तालुक्यात एकापेक्षा जास्त विधानसभा सदस्य असतील तेथे त्या तालुक्यातील सर्वात मोठ्या भौगोलिक क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य यांची पदसिध्द अध्यक्ष म्हणून तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीवर नियुक्ती करण्यात यावी. मात्र एखाद्या विधानसभा सदस्याच्या विधानसभा क्षेत्राचे भौगोलिक क्षेत्र २ ते ३ तालुक्यांमध्ये सर्वात मोठे असल्यामुळे जर त्याची त्या सर्व तालुका समित्यांवर अध्यक्ष म्हणून नियुक्ती होत असेल तर, त्याची पदसिध्द अध्यक्ष म्हणून नियुक्ती कशा प्रकारे तालुक्याच्या समितीवर करण्यात यावी व इतर तालुक्यांचे प्रस्ताव आदेशांसाठी शासनाकडे पाठविण्यात यावेत.

या आदेशानुसार ज्या वेळी एखादे माननीय मंत्री/राज्यमंत्री समितीचे पदसिध्द अध्यक्ष होत असतील त्यावेळी समितीवरील अध्यक्षाची नेमणूक संबंधीत मंत्री महोदयांच्या सल्ल्याने जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे अध्यक्ष करतील. जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अध्यक्षांच्या बाबतीत ते स्वतःच याबाबत नियुक्ती करतील. पंचायत समितीचे अध्यक्ष हे या समितीचे सहअध्यक्ष असतील.

४. <u>समितीची कार्यकक्षा</u> :- शासनाची उद्दिष्टे अधिक हेतुपूर्वक रितीने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी पुढील क्षेत्रातील विविध कार्यक्रम व योजनांचा आढावा घेऊन त्या सुयोग्यपणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने समिती शासनास शिफारशी/सूचना करील :-

अ] भूमिहीन मजुरांना घरांसाठी जागांची तरतूद.

ब] पिण्याच्या पाण्याची सोय

क] प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन

ड] कुटुंब नियोजन, अल्पबचत, इत्यादि कार्यक्रमांसाठी विशेष सामुहीक मोहिमा संघटित करणे.

इ] अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त आणि भटक्या जमाती आणि इतर मागास वर्गाच्या कल्याणाबाबत शासनाने मंजूर केलेल्या योजनांचा आढावा घेणे.

फ] शासकीय यंत्रणेबाबत लोकांच्या सर्वसाधारण तक्रारी.

ग] राज्य आणि स्थानिक अशा दोन्ही क्षेत्रांनी निर्माण केलेल्या जलसिंचन क्षमतेच्या उपयोगाचा आढावा घेणे.

ह] कृषि उत्पादन कार्यक्रम.

ई] २० कलमी कार्यक्रमाचा आढावा घेणे.

ज] शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा इतर बाबी.

५. समित्यांच्या कामासंबंधीचे नियम परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील.

६. समितीच्या अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता, मुंबई नागरी सेवा नियम खंड २ मधील परिशिष्ट ४२ [अे] यातील सेक्शन-१ मधील १ [१] [बी] च्या तरतुदीनुसार व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: टीआरए-१४७७/१०३२-सी/एसईआर-५, दि. २३.९.१९७७, क्र.टीआरए-१०८३/१४२६/एसईआर-५, दि. १.२.१९८४ व क्रमांक:आरवीएस-१२८८/५६८/एसईआर-५, दिनांक ३ ऑक्टोबर, १९८८ च्या आधारे नियमित केला जावा. या नियमांच्या तरतुदी केवळ रेल्वे/सडक प्रवासासाठी लागु असल्यामुळे तसेच शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार प्रथम श्रेणीच्या शासकीय अधिकाऱ्यांना विमान प्रवास करण्यावर बंदी असल्यामुळे, अशासकीय सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेच्या वातानुकुलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

समितीवर सदस्य/अध्यक्ष म्हणून असणाऱ्या आमदार यांचा प्रवासभत्ता/दैनिकभत्ता, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:टीआरए-१४७०/१३१/अठरा, दिनांक २७.१.१९७१ प्रमाणे आमदार/खासदार यांना विधानमंडळाच्या कामकाजासाठी अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे नियमित केला जावा.

७. तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीच्या सदस्य सचिव असलेल्या सर्व तहसिलदारांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या नजरेस आणून द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सुधा भावे,
सह सचिव, नियोजन विभाग.

एमा-२१६ [१३००-४-९०]

## प रि शि ष्ट - अ

### तालुका पातळीवरील समन्वय व पुनर्विलोकन समित्यांच्या कामासंबंधी नियम

१] रचना :-

१. समितीची रचना व कार्ये शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: तासबु-१०९०/सीआर-४०, दिनांक १६ मे, १९९० यात नमूद केल्याप्रमाणे असतील.

२] सभेची नियतकालिकता :-

१. समितीची तीन महिन्यातून निदान एकदा तरी सभा होईल. समितीच्या बैठका तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी, शक्यतो तहसील कार्यालयात होतील.

३] सभेची कार्यपध्दती :-

१. समितीचे सदस्य-सचिव समितीच्या अध्यक्षांच्या सल्ल्याने सभेची जागा व तारीख निश्चित करतील व समितीच्या सर्व सभासदांना त्या सभेची पुरेशी आगाऊ सूचना देईल.

२. समितीचे सदस्य-सचिव समितीच्या अध्यक्षांच्या सल्ल्याने सभेची कार्यसूची तयार करील व ती एका टिप्पणीसह समितीच्या सर्व सभासदांना सभेच्या पुरेशी आधी पाठवून देतील. आकस्मिक उद्भवणा-या प्रकरणी समितीच्या अध्यक्षाच्या परवानगीने जादा बाबीचा विचार करता येईल.

३. समितीची बैठक भरविण्यासाठी लागणारी गणपूर्ती समितीच्या अशासकीय सभासदांच्या एक चतुर्थांश इतकी राहील. मात्र, समितीचे अध्यक्ष गणपूर्ती अभावीही आवश्यक असल्यास सभेची कार्यवाही चालू ठेवू शकतील.

४. समितीचे कामकाज सर्वसाधारणपणे मराठीतूनच चालेल.

५. समिती, आवश्यक त्या तालुका पातळीवरील अधिका-यांना बोलावून त्यांचा सल्ला घेऊ शकेल व कामे दक्षतेने पार पाडली जावीत म्हणून स्थानिक तज्ञांचा सल्लाही घेऊ शकेल.

४] नियंत्रण :-

१. तालुका पातळीवरील समितींच्या कामकाजाचे कार्यवृत्त संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अध्यक्षांना त्यांच्या माहितीसाठी व पुढता सादर केले पाहिजे.

एच-२१६ [१३००-५-९०]

२. जर एखादेवेळी तालुका पातळीवरील समितीची सभा तीन महिन्यांच्या कालावधीत झाली नाही तर, तालुका पातळीवरील समितीचे सदस्य-सचिव ती गोष्ट संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या सदस्य सचिवांना कळवतील आणि ते योग्य त्या मार्गदर्शनासाठी ती गोष्ट त्या समितीच्या अध्यक्षांच्या नजरेस आणतील.

५] <u>प्रतिबंध</u> :- ( Prohibition )

१. समितीने वैयक्तिक प्रकरणे विचारार्थ घेता कामा नये.

२. कोणतीही सभासद राज्य शासनाच्या व जिल्हा परिषद संस्थांच्या निरनिराळ्या दैनंदिन कामकाजात हस्तक्षेप करणार नाही याची काळजी समितीने घेतली पाहिजे.

३. समितीने दौरे करता कामा नयेत.

६] <u>अर्थाविष्कार</u> :- ( Interpretation )

या नियमाच्या अर्थाविष्कारासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर तो शासनाच्या नियोजन विभागाकडे मार्गदर्शनाकरिता सोपविण्यात येईल आणि याबाबत शासनाचा निर्णय बंधनकारक राहील.

तक्रारींचे निवारण - जिल्हा व तहसिल स्तरावर तक्रार निवारण समित्यांची स्थापना ...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-सीडीआर-२०८२/३१८८/६६/११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १४ फेब्रुवारी, १९८६.

पहा :- [१] शासन परिपत्रक, राजनैतिक व सेवा विभाग, क्रमांक-सीडीआर-२०५७, दिनांक ३ जुलै, १९५७.
[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-२०७५/अकरा, दिनांक १३ नोव्हेंबर १९७५.
[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-२०७६/६५९३/२०१-बी/अकरा, दिनांक ४ एप्रिल १९७७.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
APR1986
शाखा -

शासन निर्णय :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-२०७४/६५९३/२०१-बी/अकरा, दिनांक ४ एप्रिल १९७७ च्या आदेशात अंशत: फेरबदल करून शासन आता असे आदेश देत आहे की, यापुढे नवीन नियुक्त्या करताना जिल्हा व तहसिल तक्रार निवारण समित्यांच्या रचनेमध्ये अशासकीय सदस्यांची संख्या दोन ऐवजी

कृ. मा. प.

शा. म. मु. रोटा/एच-७९९[४०००-२-८६]

तक्रारींचे निवारण - जिल्हा व तहसिल स्तरावर
तक्रार निवारण समित्यांची स्थापना ...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-सीडीआर-२०८२/३१८८/६६/११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १४ फेब्रुवारी, १९८६.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
APR1986
शाखा -

पहा :- [१] शासन परिपत्रक, राजनैतिक व सेवा विभाग, क्रमांक-सीडीआर-२०५७, दिनांक ३ जुलै, १९५७.
[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-२०७५/अकरा, दिनांक १३ नोव्हेंबर १९७५.
[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-२०७६/६५९३/२०१-बी/अकरा, दिनांक ४ एप्रिल १९७७.

शासन निर्णय :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-२०७६/६५९३/२०१-बी/अकरा, दिनांक ४ एप्रिल १९७७ च्या आदेशात अंशत: फेरबदल करून शासन आता असे आदेश देत आहे की, यापुढे नवीन नियुक्त्या करताना जिल्हा व तहसिल तक्रार निवारण समित्यांच्या रचनेमध्ये अशासकीय सदस्यांची संख्या दोन ऐवजी

कृ. मा. प.

शा. म. मु. रोटा/एच-७९९[४०००-२-८६]

"तीन" अशी राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मु. स. मोकाशी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संचालक, लाचलुचपत प्रतिबंधक, दारुबंदी व गुप्त वार्ता केंद्र,
सर्व विभाग प्रमुख व मंत्रालयीन विभागाच्या अखत्यारातील सर्व कार्यालय प्रमुख,
गृह विभाग,
इतर सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती,

**<u>सामाजिक अर्थसहाय्य योजना</u>**

**१) संजय गांधी निराधार अनुदान योजना**

**२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना**

**३)इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना**

**४) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना**

**५) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२**

**मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१०.**

**वाचा :-** १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र.विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दि. ३० सप्टेंबर,२००८.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र.विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दि. २७ फेब्रुवारी,२००९.
३) शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र.विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दि. ६ मे,२००९.
४) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र.विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दि. २९ जून,२००९.
५) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र.विसयो-२०१०/प्र.क्र.३३/विसयो-२, दि.१३ जुलै,२०१०.
६) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्र. विसयो-२०१०/प्रक्र १७७/विसयो-२, दिनांक २८/०९/२०१०
७) शासन पत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्र. विसयो-२०१०/प्रक्र १९०/विसयो-२, दिनांक ०७/१०/२०१०
८) शासन पत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्र. विसयो-२०१०/प्रक्र १७५/विसयो-२, दिनांक १५/१०/२०१०

**प्रस्तावना :-** राज्यात निराधार वृध्द व्यक्ती, अंध, अपंग, शारिरीक व मानसिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती व निराधार विधवांना अर्थसहाय्य देण्याच्या मुळ हेतूने संजय गांधी निराधार / आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना सन १९८० पासून राबविण्यात येत होती. या योजनेमध्ये संदर्भ क्र.१ येथील दिनांक ३० सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये काही सुधारणा करुन ही योजना संजय गांधी निराधार अनुदान योजना या नावाने राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सध्या प्रतिमाह प्रति लाभार्थी रु.५००/- एवढे अनुदान देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेला पूरक म्हणून श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना सन २००४ पासून राबविण्यात येत आहे. या योजनांच्या अटी/शर्ती संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये पूर्वीचे सर्व शासन निर्णय, परिपत्रके अधिक्रमीत करुन सुनिश्चित करण्यात आलेल्या आहेत.

या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये काही अडचणी येत असून या योजनांच्या निकषात उदाहरणार्थ लाभार्थ्यांच्या मुलांचे वय २१ वर्षे झाल्यानंतर त्याला अनुदान द्यावयाचे नाही व या मुलांना २१ वर्षानंतर लगेच नोकरी मिळेल याची शाश्वती नसल्याने ही वयोमर्यादा वाढविणे, वाढत्या महागाईमुळे सध्याच्या अनुदानात वाढ करावी, तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या समितीच्या रचनेत बदल, देवदासी, परित्यक्त्या, तृतीयपंथी यांचा लाभार्थी म्हणून समावेश करावा, अशा अनेक मागण्या लोकप्रतिनिधी, निराधार इत्यादी व्यक्ती शासनाकडे सातत्याने करीत आहेत. वरील अडचणी लक्षात घेऊन लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष, निवड प्रक्रिया व लाभ

वितरण पध्दत यामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता संदर्भ क्रमांक १ ते ५, ७ व ८ येथील शासन निर्णय, परिपत्रके, पत्रे अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## शासन निर्णय :

**राज्य पुरस्कृत योजना :-**

**(१) संजय गांधी निराधार अनुदान योजना :-**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेखाली पात्र लाभार्थ्यांस यापूर्वी मिळणाऱ्या प्रतिमाह रुपये ५००/- अनुदानात रुपये १००/- इतकी वाढ करण्यात येत असून यापुढे प्रतिमाह रुपये ६००/- इतके अनुदान मिळेल.

एका कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास, यापूर्वी मिळणाऱ्या प्रतिमाह रुपये ७५०/- अनुदानाच्या मर्यादेत वाढ करण्यात येत असून, ती यापुढे प्रतिमाह रुपये ९००/- इतकी राहील.

या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांच्या यादीतून "**शेतमजुर महिला**" हा प्रवर्ग वगळण्यात येत आहे. म्हणजेच त्यांना यापुढे सदर योजनेत अनुदान मिळणार नाही.

आता, या शासन निर्णयान्वये पात्र लाभार्थींच्या यादीत "**तृतीयपंथी व परित्यक्त्या**" या प्रवर्गाचा समावेश करण्यात येत आहे. तसेच महिला व बालविकास विभागामार्फत सध्या ज्या **४०३८ देवदासींना** लाभ देण्यात येत आहे, त्यांना महिला व बालविकास विभागाच्या योजनेमधून वगळून त्या ऐवजी त्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेत / श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत लाभार्थी म्हणून समाविष्ट करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची मुले २१ वर्षाऐवजी २५ वर्षांची होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत (शासकीय / निमशासकीय / खाजगी), यामध्ये जे अगोदर घडेल तोपर्यंत लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. **यापूर्वी ज्या लाभार्थ्यांची मुले २१ वर्षांची झाल्यामुळे त्यांचा लाभ बंद करण्यात आलेला आहे, तथापि दिनांक १ नोव्हेंबर, २०१० रोजी ज्यांच्या मुलाचे वय २५ वर्ष पूर्ण झालेले नाही, अशा लाभार्थ्यांचा लाभ उप विभागीय अधिकारी (महसूल) यांची मंजूरी घेऊन पुनःश्च चालू करण्यात यावा. अशा लाभार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही.**

ज्या लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलीचे वय २५ वर्ष झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन त्या सांसारात गेल्या तरीसुध्दा लाभ चालू राहील.

योजनेच्या सुधारित अटी व निकष सोबतच्या **परिशिष्ट-१** प्रमाणे राहतील.

**(२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना :-**

६५ व ६५ वर्षावरील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार स्त्री व पुरुषांना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेमधून प्रतिमाह रुपये २००/- निवृत्ती वेतन देण्यात येते. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेमधून लाभार्थ्यांस सद्य:स्थितील प्रतिमाह रुपये ३००/- निवृत्ती वेतन देण्यात येते. यामध्ये रुपये १००/- इतकी वाढ करण्यात येत असून, यापुढे प्रतिमाह रुपये ४००/- इतके निवृत्ती वेतन देण्यात येईल. म्हणजेच लाभार्थ्यांस सद्य:स्थितील जे रुपये ५००/- (केंद्र शासनाचे रुपये २००/- + राज्य शासनाचे रुपये ३००/-) प्रतिमाह निवृत्ती वेतन मिळत आहे, त्याऐवजी त्यांना प्रतिमाह रुपये ६००/- इतके निवृत्ती वेतन यापुढे मिळेल. याला श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना-गट-अ असे वर्गीकरण करावे.

त्याचप्रमाणे श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत ज्या लाभार्थ्यांना (दारिद्र्य रेषेखालील यादीच्या कुटुंबात नाव नसलेल्या व रु २१०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या) सध्या प्रतिमाह रुपये ५००/- इतके निवृत्ती वेतन मिळत आहे, त्यांच्या निवृत्ती वेतनात प्रतिमाह रु १००/- इतकी वाढ करण्यात येत असून त्यांना यापुढे प्रतिमाह रुपये ६००/- इतके निवृत्तीवेतन मिळेल. याला श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट-ब असे वर्गीकरण करावे.

या योजनेच्या सुधारित अटी व निकष सोबतच्या **परिशिष्ट-२** प्रमाणे राहतील.

**केंद्र पुरस्कृत योजना :-** (या केंद्राच्या योजना संगणकावर ऑनलाईन पध्दतीने कार्यान्वित करणे आवश्यक राहील.)

**(३) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना :-**

अ) या योजनेमध्ये ग्रामीण भागाकरिता दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या घेतलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ६५ व ६५ वर्षावरील सर्व व्यक्ती पात्र होतील. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.२००/- प्रतिमाह प्रति लाभार्थी निवृत्तीवेतन देण्यात येईल. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून रु.३००/- प्रतिमाह ऐवजी रुपये ४००/- प्रतिमाह इतके निवृत्तीवेतन मिळेल. यामुळे या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रुपये २००/- व राज्य शासनाकडून रुपये ४००/- असे एकूण रुपये ६००/-प्रतिमाह प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळेल.

ब) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये यापुढे फक्त दारिद्र्यरेषे खालील कुटुंबाच्या यादीमध्ये नाव समाविष्ट असणाऱ्या ६५ व ६५ वर्षावरील लाभार्थ्यांना लाभ देण्याचा निकष केंद्र शासनाने विहित केलेला आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. (परिशिष्ट-१४ नुसार तहसिलदारांनी आदेश काढावेत ).

या योजनेच्या सुधारित अटी व निकष सोबतच्या **परिशिष्ट-३** प्रमाणे राहतील.

**(४) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना :-**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ४० ते ६५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील विधवा, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र आहेत. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्र शासनाकडून लाभार्थ्याला रुपये २००/- प्रतिमाह देण्यात येतात. त्याला पूरक असलेल्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून सद्य:स्थितीत जे रुपये ३००/- प्रतिमाह देण्यात येतात, त्यामध्ये रुपये १००/- प्रतिमाह इतकी वाढ करण्यात येत असून, यापुढे लाभार्थ्याला रुपये ४००/- प्रतिमाह देण्यात येतील. म्हणजेच या योजनेअंतर्गत लाभार्थ्यास सद्य:स्थितीत जे रुपये ५००/- प्रतिमाह मिळत आहेत, त्याऐवजी त्यांना रुपये ६००/- प्रतिमाह निवृत्ती वेतन मिळेल.

या योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक जे-११०१२/१/२००९-एनएसएपी, दि. ३०.९.२००९ नुसार राहतील. सदर अटी / शर्ती संक्षिप्तपणे **परिशिष्ट-४** येथे दर्शविल्या आहेत. वरील पात्र लाभार्थ्यांव्यतिरिक्त केंद्र शासनाच्या उपरोक्त कार्यालयीन ज्ञापनानुसार पात्र असलेले लाभार्थी (संजय गांधी निराधार अनुदान योजनेत जरी लाभ घेत नसले तरी) संबंधित तहसिलदार / नायब तहसिलदार यांच्याकडे स्वतंत्रपणे नव्याने अर्ज करु शकतील. संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये लाभ घेत असलेले पात्र लाभार्थी या योजनेत वर्ग करण्यात यावेत.

**(५) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना :-**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्याअपंग लाभार्थ्यांपैकी, फक्त १८ ते ६५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील, ८० टक्क्याहून जास्त अपंगत्व असलेले तसेच एक किंवा बहुअपंगत्व असलेले (दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व) लाभार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमध्ये निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र राहतील. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्र शासनाकडून लाभार्थ्याला रुपये २००/-प्रतिमाह देण्यात येतात. त्याला पूरक असलेल्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून सद्य:स्थितीत जे रुपये ३००/- प्रतिमाह देण्यात येतात, त्यामध्ये रुपये १००/-प्रतिमाह इतकी वाढ करण्यात येत असून यापुढे लाभार्थ्याला रुपये ४००/- प्रतिमाह निवृत्तीवेतन मिळेल. म्हणजेच या योजनेअंतर्गत लाभार्थ्यास जे रुपये ५००/- प्रतिमाह निवृत्तीवेतन मिळत आहे. त्याऐवजी त्यांना रुपये ६००/- प्रतिमाह निवृत्तीवेतन देण्यात येईल.

या योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक जे - ११०१२ / १ / २००९ - एनएसएपी, दि. ३०.९.२००९ नुसार राहतील. सदर अटी / शर्ती संक्षिप्तपणे **परिशिष्ट-५** येथे दर्शविल्या आहेत. वरील पात्र लाभार्थ्यांव्यतिरिक्त केंद्र शासनाच्या उपरोक्त ज्ञापनानुसार पात्र असलेले लाभार्थी (संजय गांधी निराधार अनुदान योजनेत जरी लाभ घेत नसले तरी) संबंधित तहसिलदार / नायब तहसिलदार यांच्याकडे स्वतंत्रपणे नव्याने अर्ज करु शकतील. संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये लाभ घेत असलेले पात्र लाभार्थी या योजनेत वर्ग करण्यात यावेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी अर्ज करण्याची पध्दत, समितीचे गठन, कार्यपध्दती, समितीच्या बैठका **परिशिष्ट-१, नमुना - दोन** प्रमाणे राहील. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजनांसाठी अर्ज मंजूर करण्याची पध्दत **परिशिष्ट-६** प्रमाणे राहील.

२. **लाभार्थ्यांचे अनुदान दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वितरीत करण्यात येईल.**

३. सदर शासन निर्णय **दिनांक १ नोव्हेंबर, २०१०** पासून अंमलात येईल.

४. **या योजनांखालील लाभार्थ्यांची संख्या, देय अनुदानाचे व खर्चाचे मासिक अहवाल परिशिष्ट-१५, परिशिष्ट-१६, परिशिष्ट-१७, परिशिष्ट-१८ मधील नमुना - एक मध्ये तहसिलदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावेत आणि परिशिष्ट-१५, परिशिष्ट-१६, परिशिष्ट-१७, परिशिष्ट-१८ मधील नमुना - दोन, नमुना-तीन मध्ये जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांनी त्रैमासिक/वार्षिक अहवाल शासनाला सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सध्या लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांना अनुदान नियमितपणे देण्यात यावे.**

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: ३७४/व्यय-१४/१०, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक - २०१०१०२६२०१२४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सतिश गवई )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

**सोबत : परिशिष्ट-१ ते परिशिष्ट-१८**

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व जिल्ह्यांचे पालक मंत्री
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषि भवन, नवी दिल्ली
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, नागरी प्रशासन, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१४ / अर्थसंकल्प -७ ), मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग / सर्व विभागीय आयुक्त / सर्व महापालिका आयुक्त / सर्व पोलीस आयुक्त

४

सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक / सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी व लेखा कार्यालय, मुंबई
विभागीय समाजकल्याण अधिकारी (मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर)
सर्व उप विभागीय उप जिल्हाधिकारी (प्रांत अधिकारी) /सर्व तहसिलदार
सर्व कोषागार अधिकारी / सर्व पंचायत समितींचे गट विकास अधिकारी
सर्व उप कोषगार अधिकारी
सर्व अधिकारी, सा.न्या.व वि.स.विभाग,मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती / का.विसयो-२.

# परिशिष्ट-१

## नमुना - एक

### संजय गांधी निराधार अनुदान योजना
### पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| २ | **वय-** ६५ वर्षापेक्षा कमी असावे. |
| ३ | **कुटुंबाचे उत्पन्न-** प्रतिवर्षी रुपये २१,०००/- पर्यंत. |
| ४ | **आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन -** एक व्यक्ती निराधार कुटुंबाला रुपये ६००/- प्रतिमाह<br>एकापेक्षा जास्त लाभार्थी निराधार कुटुंबाला रुपये ९००/- प्रतिमाह या मर्यादेत |
| ५ | **पात्रतेची अर्हता-**<br>१. अपंगातील अस्थिव्यंग, अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद इत्यादि प्रवर्गातील स्त्री व पुरुष.<br>२. क्षयरोग, पक्षाघात, प्रमस्तीष्कघात, कर्करोग, एड्स (एचआयव्ही +), कुष्ठरोग, सिकलसेल व सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दुर्धर आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे स्त्री व पुरुष.<br>३. निराधार पुरुष / महिला / तृतीयपंथी, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रीयेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या किंवा या योजनेखाली विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणाऱ्या महिला, परित्यक्त्या, देवदासी , अत्याचारित महिला व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला.<br>४. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न या योजनेखालील विहित उत्पन्नापेक्षा कमी असल्यास ते कुटुंब.<br>५. अनाथ मुले (१८ वर्षाखालील). |
| ६ | **१) वयाचा दाखला-** ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत ***किंवा*** शाळा सोडल्याचा दाखला, ***किंवा*** शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा ग्रामीण/नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला.<br>**२) उत्पन्नाचा दाखला--** तहसिलदार किंवा उप विभागीय अधिकारी यांनी दिलेला दाखला ***(अर्जदाराकडून रु.५/- च्या Court Fee Stamp वर प्राप्त झालेल्या अर्जानुसार)*** (अर्जाचा नमुना परिशिष्ट-१३ मध्ये दिला आहे) किंवा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा.<br>**३) रहिवाशी दाखला--** ग्रामसेवक/ तलाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल.<br>**४) अपंगाचे प्रमाणपत्र--** अस्थिव्यंग, अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद यांचे अपंगत्वाबाबत अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीप्रमाणे जिल्हा शल्यचिकित्सक ( सिव्हील सर्जन ) यांचे प्रमाणपत्र.<br>**५) असमर्थतेचा / रोगाचा दाखला--** जिल्हा शल्यचिकित्सक (सिव्हील सर्जन), शासकीय रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला दाखला.<br>**६) कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी किंवा शासन अनुदानित निवासगृहाचा अंतरवासी नसल्याबाबतचा दाखला--**<br>तहसिलदार किंवा ग्रामसेवक / तलाठी यांच्या शिफारशीवरुन दिलेला दाखला व महिला व बाल कल्याण अधिकारी यांनी दिलेला दाखला.<br>**७) अनाथ असल्याचा दाखला-** ग्रामसेवक / मुख्याधिकारी / प्रभाग अधिकारी यांनी दिलेला व गटविकास अधिकारी / प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी साक्षांकित केलेला दाखला. |
| ७ | **अतिरिक्त अटी-**<br>अ) लाभार्थ्यांची मुले (मुलगा) २५ वर्षाची होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत (शासकीय /निम शासकीय/खाजगी) यामध्ये जे अगोदर घडेल तोपर्यंत लाभार्थी व मुलांना लाभ देण्यात यावा.<br>ब) मुलाला नोकरी मिळाल्यानंतर (शासकीय/निम शासकीय/खाजगी) मुलाचे व कुटुंबाचे उत्पन्न विचारात घेऊन लाभार्थ्यांची पात्रता ठरविण्यात यावी.<br>क) ज्या लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील, अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलींचे वय २५ वर्ष झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन नांदावयास गेल्या तरीसुध्दा लाभ चालू ठेवण्यात यावा. |
| ८ | या योजनेखाली लाभ मिळण्यासाठी अर्जदाराच्या अपत्य संख्येची अट राहणार नाही. |

| | |
|---|---|
| ९ | (अ) अपंगातील अस्थिव्यंग, अंध, मुकबधीर, मतिमंद या सर्व प्रवर्गातील अपंगांना या योजनेचा लाभ मिळण्याकरिता त्यांचे कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न या योजनेत पात्र होण्यासाठी रुपये २१,०००/- पर्यंत असावे.<br>(ब) अस्थिव्यंग, अंध, मुकबधीर, कर्णबधीर, मतिमंद यांचे अपंगत्वाबाबत अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीप्रमाणे निर्णय होईल.(किमान ४० % अपंगत्व असलेल्या व्यक्ती या योजनेखाली लाभ घेण्यास पात्र ठरतील) यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन) यांचे प्रमाणपत्र बंधनकारक राहील. |
| १० | शारिरीक छळवणूक झालेल्या अथवा बलात्कार झालेल्या अत्याचारित स्त्रियांच्या बाबतीत जिल्हा शल्यचिकित्सक (सिव्हील सर्जन) व महिला व बाल विकास अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र तसेच बलात्कार संबंधात पोलीस ठाण्यामध्ये गुन्ह्याची नोंद झाल्याचे पोलीस ठाण्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. |
| ११ | (अ) घटस्फोट प्रक्रियेतील स्त्रिया, ज्या पती-पत्नीने कायदेशीर घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज केला आहे, परंतु घटस्फोट मिळण्याची अंतिम कार्यवाही झालेली नाही, अशा कालावधीत पतीपासून वेगळ्या राहणाऱ्या स्त्रियांनी रितसर घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयाकडे केलेल्या अर्जाची सत्य प्रत व पतीपासून वेगळी राहत असल्याबद्दलचे संबंधित गावच्या तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्तरित्या दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शहरी भागासाठी तलाठी किंवा नगरपालिका / महानगरपालिकांचे कर निरीक्षक यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>(ब) घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या किंवा या योजनेत विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणाऱ्या महिला अनुदान मिळण्यास पात्र राहतील. घटस्फोट झाल्याबाबत न्यायालयाच्या निर्णयाची प्रत व पोटगीची रक्कम याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.<br>(क) परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत ज्या स्त्रीला एक वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून पतीने सोडले आहे किंवा तिला पती नांदवत नाही व त्यामुळे अशा स्त्रीला स्वतंत्रपणे किंवा मातेवाईकाकडे राहावे लागते, अशा स्त्रिया पात्र असतील. याबाबत तलाठी व ग्रामसेवक यांचा संयुक्त दाखला आवश्यक राहील.<br>शहरी भागामध्ये तलाठी वा नगरपालिका/ महानगरपालिकांचे कर निरीक्षक यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील. |
| १२ | वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या स्त्रियांच्या बाबतीत, महिला व बालविकास अधिकाऱ्यांचे अशा महिलेला वेश्या व्यवसायातून मुक्त केल्याचे प्रमाणपत्र व तिला शासनाच्या अन्य योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ मिळत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| १३ | अनाथ मुले-मुली म्हणजे आई-वडील मृत्युमुखी पडल्यामुळे अनाथ झालेली व कोणत्याही शासकीय / निमशासकीय / शासन अनुदानित अनाथ आश्रमात न राहणारे मुले-मुली यांना लाभ मिळेल. आई-वडील मृत्युमुखी पडल्यामुळे अनाथ असल्याबद्दल तलाठी व ग्रामसेवक यांचे व संबंधित महिला व बाल विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अनाथ मुले/मुलींना देय असलेले अर्थसहाय्य हे लाभार्थी सज्ञान होईपर्यंत त्यांच्या संबंधित पालकांना देण्यात येईल. |
| १४ | **विधवा** ज्या स्त्रीच्या पतीचे निधन झाले आहे अशी स्त्री या योजनेखाली लाभ मिळण्यास पात्र राहील. पतीचे निधन झाल्याबद्दल संबंधित ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालिकेच्या मृत्यु नोंदवहीतील उतारा सादर करणे आवश्यक राहील. |
| १५ | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती संजय गांधी निराधार अनुदान योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| १६ | संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. |
| १७ | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |

## परिशिष्ट-१

### नमुना - दोन

### अर्ज मंजूर करण्याची पध्दत. संजय गांधी निराधार अनुदान योजना

**(१) अर्ज करण्याची पध्दत :**

(अ) अर्जदार या शासन निर्णयानुसार आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी निर्धारित केलेल्या, परिशिष्ट-१ मधील नमुना तीन मधील अर्जाच्या दोन प्रतीमध्ये, तो रहात असलेल्या भागातील संबंधित तलाठ्याकडे अर्ज करील.

(ब) अशा अर्जासोबत लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या अटींच्या पुष्ठ्यर्थ संबंधित कागदपत्रे व प्रमाणपत्रे जोडण्यात यावीत. नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अशा प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या दोन प्रती अर्जदाराने मिळवाव्यात.

(क) तलाठी यांनी त्यांच्याकडे प्राप्त अर्जाची तपासणी करुन अर्जासोबत जी कागदपत्रे जोडण्यात आली आहेत, त्यांची व अर्ज कोणत्या योजनेसाठी दिलेला आहे, याची सविस्तर नोंद नोंदवहीमध्ये घ्यावी व अर्जदाराला विहित नमुन्यात पोच पावती द्यावी. तलाठी यांनी नोंदवही ठेवणे व त्यामध्ये अर्जाची नोंद ठेवणे बंधनकारक राहील.

(ड) तलाठी यांनी प्राप्त अर्जाची व त्यासोबतच्या कागदपत्रांची छाननी व पडताळणी करुन अर्ज संबंधित तहसिलदार / नायब तहसिलदार यांचेकडे पाठवावेत.

**(२) नायब तहसिलदार/तहसिलदार यांच्याकडे आलेल्या अर्जाची छाननी :**

(अ) संबंधित नायब तहसिलदार / तहसिलदार यांच्याकडे आलेले अर्ज, प्राप्त तारखेनुसार लावण्यात येतील व त्यांना नोंदणी क्रमांक देऊन एका स्वतंत्र नोंदवहीमध्ये त्याची नोंद घेण्यात येईल.

(ब) आलेल्या अर्जाची छाननी व प्रत्यक्ष पडताळणी संबंधित नायब तहसिलदार / तहसिलदार यांनी करावी व समितीचे सदस्य सचिव म्हणून तहसिलदार यांनी अर्जदारांची यादी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीसमोर प्रत्येक तिमाहीस निर्णयासाठी ठेवावी.

(क) प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी समितीने करावी व छाननीनंतर लाभार्थ्यांची निवड समितीने करावी. अशी निवड झाल्यानंतर पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी सूचना फलकावर लावण्यात यावी.

(ड) अर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना कळवावे आणि ज्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आलेले आहेत त्यांनाही कारणासह कळवावे.

(इ) अर्जाच्या छाननीमध्ये सदस्य सचिवांनी नामंजूर करण्याचे प्रस्तावित केलेले, पण समितीने पात्र ठरविलेल्या अर्जाबाबत उप विभागीय अधिकारी (महसूल) पुनर्विलोकन करुन निर्णय घेतील.

(ई) लाभार्थ्यांची यादी ग्रामसभा / प्रभाग सभेला माहितीसाठी पाठवावी. सदर पात्र तसेच अपात्र अर्जदारांची यादी ग्रामपंचायतीच्या व प्रभाग कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावी. सदर यादीचे वाचन ग्राम सभेत व प्रभाग कार्यालयात करावे. ग्रामसभेने / प्रभाग कार्यालयाने काही व्यक्तींची चुकीची निवड झाली आहे, असे पुराव्यासह कळविल्यास अशा अर्जाची पडताळणी करुन समितीसमोर फेरविचारार्थ ठेवावेत.

(फ) केंद्र शासनाच्या निकषानुसार वर्षातून दोनदा ग्रामसभेच्या स्तरावर अपात्र लाभार्थी शोध मोहिम घ्यावी.

**(३) आर्थिक सहाय्य मंजूर करणे व तिचे वितरण :**

या शासन निर्णयानुसार द्यावयाचे आर्थिक सहाय्य संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीमार्फत मंजूर केले जाईल. नव्याने मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणातील लाभार्थ्यांची माहिती दर तिमाहीस शासनाला कळविण्यात यावी.

८

(४) **संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची रचना :**

| | |
|---|---|
| (१) मा.पालकमंत्री यांनी शिफारस केलेली संबंधित तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्ती | : अध्यक्ष |
| (२) मागासवर्गीय (अ.जा./अ.ज.) अशासकीय प्रतिनिधी (एक) | : सदस्य |
| (३) महिला अशासकीय प्रतिनिधी (एक) | : सदस्य |
| (४) इतर मागासवर्गीय/वि.जा.भ.ज. प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधी (दोन) | : सदस्य |
| (५) सर्वसाधारण प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधी (एक) | : सदस्य |
| (६) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी /मुख्य अधिकारी,नगरपालिका/ प्रभाग अधिकारी,महानगरपालिका (शासकीय प्रतिनिधी) | : सदस्य |
| (७) तहसिलदार (शासकीय प्रतिनिधी) | : सदस्य सचिव |

**अ)** संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ज्या समित्या यापूर्वी गठित केलेल्या आहेत, त्या सर्व समित्या बरखास्त करण्यात येत आहेत.

**ब)** वरील समितीमधील अध्यक्षांसह इतर पाच अशासकीय प्रतिनिधींच्या नावांची शिफारस जिल्ह्याचे पालकमंत्री या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अथवा नवनियुक्त पालकमंत्र्यांच्या बाबतीत त्यांचे नियुक्तीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे करतील. त्यानुसार जिल्हाधिकारी समिती गठनाचे आदेश तात्काळ काढतील. अशा पध्दतीने समिती गठीत होईपर्यंतच्या कालावधीत तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांची नावे तीन महिन्यांच्या आत संबंधित जिल्हाधिका-यांना दिली नाहीत अशा प्रसंगी जिल्हाधिकारी संदर्भ क्रमांक ६ येथील शासन निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समिती व्दारे अर्ज मंजूरी बाबत पुढील कार्यवाही करतील.

**क)** <u>समितीमध्ये लाभार्थी निवडीसंदर्भात काही मतभेद निर्माण झाल्यास समितीच्या सदस्य सचिवांनी म्हणजेच तहसिलदार यांनी अशी प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्याकडे १५ दिवसाचे आत सादर करावी. अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी ३० दिवसांच्या आत निर्णय घ्यावा. जिल्हाधिकारी यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.</u>

(५) **समितीच्या बैठका :**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा घेण्यात यावी. समितीच्या सदस्य सचिवांनी म्हणजे तहसिलदार यांनी अध्यक्षांची तारीख घेऊन बैठकीची सूचना समितीचे अध्यक्ष व संबंधितांना पाठवावी. समितीच्या बैठकीसाठी ५० % उपस्थिती असल्यास, बैठक घेण्यात येईल. ५०% उपस्थिती नसल्यास बैठकीच्या वेळेनंतर एक तासाने समितीची बैठक सुरु होईल.

(६) **संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा झाली नाही तर समितीच्या सदस्य सचिव यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :**

**(अ)** तहसिलदार (सं.गां.यो.) हे समितीचे अध्यक्ष यांचेशी संपर्क साधून बैठकीसाठी त्यांचेकडून दिनांक व वेळ मागून घेतील.

**(ब)** समितीचे अध्यक्ष यांनी वेळ दिल्यानंतर त्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल.

**(क)** समितीच्या अध्यक्षांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यास तहसिलदार हे त्यानुसार उप विभागीय अधिकारी यांना बैठक आयोजित करण्याबाबत तिसऱ्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अहवाल सादर करतील.

**(ड)** तहसिलदार यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर उप विभागीय अधिकारी हे तीन दिवसांच्या आत बैठकीची सूचना अध्यक्ष आणि इतर संबंधितांना पाठवतील.

**(इ)** जर बैठकीसाठी समितीचे अध्यक्ष त्या दिनांकास घेतल्या जाणाऱ्या बैठकीस उपस्थित राहिल्यास सदर बैठक त्यांचे अध्यक्षतेखाली होईल. अशा बैठकांना उप विभागीय अधिकारी हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहतील. तथापि, सदर बैठकीस समितीचे अध्यक्ष उपस्थित राहीले नाहीत तर सदर बैठक उप विभागीय अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल.

**(ई)** कोणत्याही परिस्थितीत समितीची बैठक तीन महिन्यांतून किमान एकदा निश्चितपणे होईल, याची दक्षता तहसिलदार यांनी घ्यावी.

**<u>(७) लाभार्थींच्या याद्या :</u>**

**अ)** लाभार्थ्यांच्या याद्या तयार करुन अशा याद्या प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये/नगरपालिकेमध्ये /महानगरपालिका प्रभाग कार्यालयात जनतेच्या माहितीसाठी लावण्यात याव्यात. अशा याद्यांची एक अद्ययावत प्रत ग्रामपंचायत/नगरपरिषद /महानगरपालिका प्रभाग कार्यालयात जनतेच्या तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. जिल्ह्यातील सर्व योजनांच्या योजनानिहाय लाभार्थी याद्या संगणकीकृत करुन ठेवाव्यात. लाभार्थ्यांच्या याद्या लावणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सक्तीचे आहे , याची जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

**ब) <u>जिल्हाधिका-यांनी लाभार्थ्यांच्या याद्या वेबसाईटवर टाकून त्या वेळोवेळी अद्ययावत कराव्यात.</u>**

~o~o~o~o~o~o~o~

## परिशिष्ट-१

### नमुना - तीन

**(संजय गांधी निराधार अनुदान योजनेखाली अर्थसहाय्यासाठी करावयाच्या अर्जाचा, अर्ज तपासणीचा व मंजूरीचा नमुना)**

प्रति,

तहसिलदार,
तालुका-
जिल्हा-

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :

२. पत्ता :

३. जन्मतारीख व वय :

४. महाराष्ट्रातील अधिवास :

५. कुटुंबातील व्यक्तींची संख्या :

६. कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न :

७. जातीचा प्रवर्ग (पोट जात नमूद करावी)

अ) खुला :

ब) अनुसूचित जाती :

क) अनुसूचित जमाती :

ड) विमुक्त जाती :

इ) भटक्या जमाती :

ई) विशेष मागास प्रवर्ग :

उ) इतर मागास वर्ग :

८. निराधाराचा प्रवर्ग

**अ) अपंग**

i ) अंध :

ii) अस्थिव्यंग :

iii) मुकबधिर :

iv) कर्णबधिर :

v) मतिमंद

९१

**ब) <u>आजार</u>**

i) क्षयरोग :

ii) पक्षघात :

iii) प्रमस्तीष्कघात :

iv) कर्करोग :

v) एड्स् (एच.आय.व्ही.+) :

vi) कुष्ठरोग :

Vii) सिकलसेल :

आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेले दुर्धर आजार :

**क) <u>महिलांचे प्रवर्ग</u>**

i) निराधार महिला :

ii) घटस्फोट प्रक्रियेतील महिला :

iii) घटस्फोट झालेली परंतु पोटगी न मिळणारी महिला :

iv) घटस्फोट झालेली परंतु योजनेत विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणारी महिला :

v) अत्याचारित महिला :

vi) वेश्या व्यवसायातून मुक्त केलेली महिला :

vii) परित्यक्त्या महिला :

**ड) आत्महत्या केलेल्या शेतक-याचे कुटूंब (या योजनेच्या विहित उत्पन्न मर्यादेनुसार सदर कुटूंब पात्र असणे आवश्यक )** :

**इ) अनाथ मुले** :

(i) मुलगा

(ii) मुलगी

**ई) तृतीयपंथी** :

९. मी असे जाहीर करतो / करते की, मी वर दिलेली माहिती सत्य व बिनचूक असून , मी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमीत मासिक आर्थिक लाभ घेत नाही. सदरची माहिती चुकीची आढळल्यास माझ्या विरुध्द फौजदारी कारवाईसह इतर कारवाई करण्यास मी पात्र असल्याची मला जाणीव आहे.

स्थळ:-

दिनांक-

उजव्या किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा. अर्जदाराची सही

टिप:- अर्जदाराने सही व अंगठ्याचा ठसा देणे बंधनकारक आहे.

१०.	माझ्या समक्ष श्री./श्रीमती .............................. ह्याने / हिने सही व अंगठ्याचा ठसा दिलेला आहे.

साक्षीदाराचे नांव व पत्ता:-

साक्षीदाराची सही.( दिनांकासह)

११.	मी आवश्यक त्या चौकशीनंतर प्रमाणित करतो की, वरील माहिती बरोबर आहे / वरील माहिती चुकीची असल्याने प्रस्तुत योजनेत लाभ मिळावा यासाठी या अर्जाची शिफारस करीत आहे / नाही.

स्थळ:
दिनांक:

तपासणी करणाऱ्याची सही व शिक्का.

१२.	असे प्रमाणित करण्यात येते की, मी प्रस्तुत अर्जाची छाननी केली आहे व अर्जामध्ये सादर केलेल्या माहितीची पडताळणी करून घेतली आहे.

मी संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभ मंजूर करण्यासाठी या अर्जाची शिफारस संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीकडे करीत आहे / नाही.

स्थळ:

दिनांक:

तहसिलदाराची सही व शिक्का.

१३.	**<u>समितीचे अभिप्राय</u>**

अ) मान्य :

ब) अमान्य :

**संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या सदस्यांची स्वाक्षरी**

१) अध्यक्ष :

२) सदस्य :

३) सदस्य :

४) सदस्य :

५) सदस्य :

६) सदस्य :

७) शासकीय सदस्य :

८) शासकीय सदस्य :

९२

शासन निर्णय क्रमांक: विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० चे परिशिष्ट

## परिशिष्ट-१

### नमुना - चार

**संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभ मंजूरीचे आदेश**

**आदेश क्रमांक व दिनांक** :

**कार्यालयाचा पूर्ण पत्ता** :

श्री./श्रीमती ...........................................................................................................

गाव ...................... तालुका .................... जिल्हा ........................ यांना राज्य पुरस्कृत विशेष सहाय्य योजनेअंतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये लाभार्थी म्हणून दिनांक ................रोजी झालेल्या समितीच्या बैठकील पात्र ठरल्यामुळे दरमहा रु. ............. (अक्षरी रुपये ..................................................), दिनांक ........................ पासून मंजूर करण्यात येत आहेत.

त्यांचा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील / राष्ट्रीयकृत बँकेतील / पोस्ट बचत खात्यातील बचत खाते क्रमांक- .................... असा आहे.

**दिनांक:-** **( स्वाक्षरी )**

**नायब तहसिलदार/तहसिलदार**

प्रति,

(१) श्री./श्रीमती ............................................................. (लाभार्थी)

(२) उप जिल्हाधिकारी (उप विभागीय ) ..................................................

(३) जिल्हाधिकारी ......................................................................

(४) सरपंच/नगराध्यक्ष/प्रभाग समिती अध्यक्ष............................ तालुका ......................
जिल्हा ..........................

९४

# परिशिष्ट-१

## नमुना - पाच (अ)

( अत्याचारित महिलांसाठी प्रमाणपत्र )

कुमारी/श्रीमती ............................................................ राहणार .............................. तालुका ........................ जिल्हा .............................. हिच्यावर आलेल्या अत्याचारामुळे निर्माण झालेल्या शारिरीक जखमांची मी वैद्यकीय तपासणी केली आहे. सदर स्त्रीस तिच्यावर झालेल्या अत्याचारामुळे अपंगत्व आले आहे/कुरुपता आली आहे. यामुळे तिच्यामध्ये स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी उत्पन्न मिळविण्याची क्षमता राहिलेली नाही. असे मी वैद्यकीय तपासणीअंती प्रमाणित करीत आहे.

( संबंधित अधिकाऱ्याचे नाव,स्वाक्षरी व शिक्का )

दिनांक : जिल्हा शल्य चिकित्सक

---

## नमुना - पाच (ब)

( अत्याचारीत महिलांसाठी प्रमाणपत्र )

असे प्रमाणित करण्यात येते आहे की, कुमारी/श्रीमती ............................................................ राहणार .............................. तालुका ........................ जिल्हा .............................. या स्त्रीवर दिनांक ........................ रोजी बलात्कार झाल्याचा गुन्हा क्रमांक .................... दाखल झाला आहे. या अत्याचारामुळे सदर स्त्रीचे मनोधैर्य खचले आहे.

दिनांक :

( नाव व स्वाक्षरी )

पोलीस उप निरीक्षक/निरीक्षक

पोलीस ठाणे ........................ ता. ........................

जि. ....................

९५

शासन निर्णय क्रमांक: विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० चे परिशिष्ट

# परिशिष्ट-१

**नमुना - सहा**

**( वेश्या व्यवसायामधून मुक्त केलेल्या स्त्रीबाबत द्यावयाचे प्रमाणपत्र )**

असे प्रमाणित करण्यात येत आहे की, कुमारी/श्रीमती ........................................................ रा. ............ ता. .................... जि. .................... हिस दिनांक ...................... रोजी वेश्या व्यवसायामधून मुक्त करण्यात आले आहे. सदर महिलेस शासनाच्या अन्य योजनेखाली नियमीत मासिक आर्थिक लाभ देण्यात येत नाही. तसेच तिच्या पुनर्वसनासाठी तिला शासनाच्या महिला सुधारगृहात ठेवण्यात आलेले नाही.

दिनांक :

( नाव व स्वाक्षरी )
संबंधित महिला व बालविकास अधिकारी
ता. ................ जि. ..............

९८

## <u>परिशिष्ट-१</u>

### नमुना -सात

**( घटस्फोट प्रक्रियेतील स्त्रियांसाठी प्रमाणपत्र )**

असे प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती ............................................................................ रा. .................................. ता. .............................. जि. ................................ हिचा विवाह श्री. ...................................................................... रा. ........................ ता. ........................ जि. ................................. यांच्याशी ................ साली झाला होता.

अ) परंतु त्यांचे कौटुंबिक संबंध सलोख्याचे न राहिल्याने त्या दोघांनी घटस्फोटासाठी न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे. न्यायालयाने दिनांक -------- च्या आदेशान्वये घटस्फोट मंजूर केला आहे.

ब) घटस्फोटाचा दावा न्यायालयात प्रलंबित आहे.

न्यायालयाच्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

**( नाव व दिनांकासह स्वाक्षरी )**
**तलाठी**

**( नाव व दिनांकासह स्वाक्षरी )**
**ग्रामसेवक**

**गाव ........................ तालुका ............................. जिल्हा ..................................**

**साक्षांकित केले.**

**( नाव व दिनांकासह स्वाक्षरी व शिक्का )**
**तहसिलदार**
**तालुका ........................ जिल्हा ..........................**

९८

## परिशिष्ट-१

### नमुना -आठ

( अनाथ मुलींबाबतचे / मुलांबाबतचे प्रमाणपत्र )

असे प्रमाणित करण्यात येत आहे की, कुमार/कुमारी ............................................................ रा. .................... ता. .................... जि. ........................यांचे/हिचे आई-वडील .................... सालात मृत झाले असल्यामुळे तो/ती अनाथ झाली असून त्याला/तिला उपजिवीकेसाठी उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही.

दिनांक :

( नाव व स्वाक्षरी )
ग्रामसेवक/नगरपालिकेचे मुख्य अधिकारी/
महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी
ता.................. जि....................

साक्षांकित केले.

( नाव व दिनांकासह स्वाक्षरी व शिक्का )
गटविकास अधिकारी / प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना

९८

# परिशिष्ट-२

## श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना
## पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | किमान १५ वर्षांपासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| २ | **वय-** ६५ व ६५ वर्षांवरील. |
| ३ | **पात्रतेची अर्हता-** कुटुंबाचे नाव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- पर्यंत असावे. |
| ४ | **आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन -** (अ) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीतील लाभार्थ्यांना - रुपये ४००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना + याच लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेखाली रुपये २००/- प्रतिमहिना असे एकूण रुपये ६००/- प्रतिमाह प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळेल.<br>(ब)दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव नसलेल्या व कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु २१०००/- पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना रुपये ६००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना निवृत्तीवेतन मिळेल. |
| ५ | **वयाचा दाखला-** ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहितील उतान्याची साक्षांकित प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा ग्रामीण / नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा तत्सम वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला. |
| ६ | **उत्पन्नाचा दाखला-** दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा **किंवा** तहसिलदार किंवा उप विभागीय अधिकारी यांनी दिलेला दाखला ***(अर्जदाराकडून रु.५/- च्या Court Fee Stamp वर प्राप्त झालेल्या अर्जानुसार)*** (अर्जाचा नमुना परिशिष्ट-१३ मध्ये दिला आहे) |
| ७ | **रहिवाशी दाखला-** ग्रामसेवक / तलाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल. |
| ८ | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| ९ | संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. |
| १० | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |

# परिशिष्ट-३

## इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना
## पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | **वय-** ६५ व ६५ वर्षावरील. |
| २ | **कुटुंबाचे उत्पन्न-** कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे . |
| ३ | **आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन -** रुपये २००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना + यांच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेखाली रुपये ४००/- प्रतिमहिना असे एकूण रुपये ६००/- प्रतिमाह प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळेल. |
| ४ | **पात्रतेची अर्हता-** दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असणे आवश्यक आहे. |
| ५ | **वयाचा दाखला-** ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा ग्रामीण / नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा तत्सम दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला. |
| ६ | **उत्पन्नाचा दाखला-** दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा. |
| ७ | **रहिवाशी दाखला-** ग्रामसेवक / तलाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल. |
| ८ | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| ९ | संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. |
| १० | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |

२०

## परिशिष्ट-४

# इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना
## पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | **वय-** ४० व ६५ वर्षाखालील विधवा. |
| २ | **कुटुंबाचे उत्पन्न-** कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे. |
| ३ | **आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन -** रुपये २००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना + याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रुपये ४००/- प्रतिमहिना असे एकूण रुपये ६००/- प्रतिमाह प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळेल. |
| ४ | **पात्रतेची अर्हता-** दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असणे आवश्यक व पतीचे निधन झाल्याबद्दल संबंधित ग्रामपंचायत/ नगरपरिषद / महानगरपालिकेच्या मृत्यू नोंदवहीतील उतारा सादर करणे आवश्यक राहील. |
| ५ | **वयाचा दाखला-** ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा ग्रामीण / नागरी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांचा किंवा तत्सम दर्जाच्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला. |
| ६ | **उत्पन्नाचा दाखला-** दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा. |
| ७ | **रहिवाशी दाखला-** ग्रामसेवक / तलाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल. |
| ८ | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| ९ | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |

२७

# परिशिष्ट-५

## इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना
## पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | **वय-** १८ ते ६५ वर्षाखालील अपंग. |
| २ | **कुटुंबाचे उत्पन्न-** कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे . |
| ३ | **आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन -** रुपये २००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना + याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रुपये ४००/- प्रतिमहिना असे एकूण रुपये ६००/- प्रतिमाह प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळेल. |
| ४ | **पात्रतेची अर्हता-** दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असणे आवश्यक आहे. |
| ५ | **अपंगत्वाचे प्रमाणपत्र-** केंद्र शासनाच्या ज्ञापन क्रमांक J-11012/1/2009-NSAP, दिनांक ३० सप्टेंबर, २००९ मधील तरतुदीनुसार अपंग असल्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक (सिव्हील सर्जन) यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| ६ | **वयाचा दाखला-** ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा ग्रामीण / नागरी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांचा किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला. |
| ७ | **उत्पन्नाचा दाखला-** दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा. |
| ८ | **रहिवाशी दाखला-** ग्रामसेवक / तलाठी / मंडळ निरीक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल. |
| ९ | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| १० | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |

२२

## परिशिष्ट-६

## अर्ज मंजूर करण्याची पध्दत.

## श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना.

(१) अर्ज करण्याची पध्दत :

(अ) अर्जदार या शासन निर्णयानुसार आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी निर्धारित केलेल्या परिशिष्ट-७ मधील मधील अर्जाच्या दोन प्रतीमध्ये, तो रहात असलेल्या भागातील संबंधित तलाठ्याकडे अर्ज करील.

(ब) अशा अर्जासोबत लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या अटींच्या पृष्ठयर्थ संबंधित कागदपत्रे व प्रमाणपत्रे जोडण्यात यावीत. नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अशा प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या दोन प्रती अर्जदाराने मिळवाव्यात.

(क) तलाठी यांनी त्यांच्याकडे प्राप्त अर्जाची तपासणी करुन अर्जासोबत जी कागदपत्रे जोडण्यात आली आहेत, त्यांची व अर्ज कोणत्या योजनेसाठी दिलेला आहे, याची सविस्तर नोंद नोंदवहीमध्ये घ्यावी व अर्जदाराला विहित नमुन्यात पोच पावती द्यावी. तलाठी यांनी नोंदवही ठेवणे व त्यामध्ये अर्जाची नोंद ठेवणे बंधनकारक राहील.

(ड) तलाठी यांनी प्राप्त अर्जाची व त्यासोबतच्या कागदपत्राची छाननी व पडताळणी करुन अर्ज संबंधित तहसिलदार / नायब तहसिलदार यांचेकडे पाठवावेत.

(२) नायब तहसिलदार/तहसिलदार यांच्याकडे आलेल्या अर्जाची छाननी :

(अ) संबंधित नायब तहसिलदार / तहसिलदार यांच्याकडे आलेले अर्ज, प्राप्त तारखेनुसार लावण्यात येतील व त्यांना नोंदणी क्रमांक देऊन एका स्वतंत्र नोंदवहीमध्ये त्याची नोंद घेण्यात येईल.

(ब) आलेल्या अर्जाची छाननी व प्रत्यक्ष पडताळणी संबंधित नायब तहसिलदार / तहसिलदार यांनी करावी व अर्ज मंजुरीसाठी संबंधित उप विभागीय अधिकारी यांचेकडे सादर करावेत.

(क) निवड झाल्यानंतर पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी सूचना फलकावर लावण्यात यावी.

(ड) अर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना कळवावे आणि ज्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आलेले आहेत त्यांनाही कारणासह कळवावे.

(इ) लाभार्थ्यांची यादी ग्रामसभा / प्रभाग सभेला माहितीसाठी पाठवावी. सदर पात्र तसेच अपात्र अर्जदारांची यादी ग्रामपंचायतीच्या व प्रभाग कार्यालयाच्या सुचना फलकावर लावावी. सदर यादीचे वाचन ग्राम सभेत व प्रभाग कार्यालयात करावे. ग्रामसभेने / प्रभाग कार्यालयाने काही व्यक्तींची चुकीची निवड झाली आहे, असे पुराव्यासह कळविल्यास, अशा अर्जाची पडताळणी करुन जिल्हाधिकारी यांनी ३० दिवसांचे आत अंतिम निर्णय घ्यावा.

(३) आर्थिक सहाय्य मंजूर करणे व तिचे वितरण :

या शासन निर्णयानुसार द्यावयाचे आर्थिक सहाय्य जिल्हाधिकारी यांचेमार्फत मंजूर केले जाईल. नव्याने मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणातील लाभार्थ्यांची माहिती दर तिमाहीस शासनाला कळविण्यात यावी.

(४) लाभार्थींच्या याद्या :

**अ)** सर्व योजनांमध्ये निवडलेल्या योजनांनिहाय लाभार्थ्यांच्या याद्या तयार करुन अशा याद्या प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये / नगरपालिकेमध्ये / महानगरपालिका प्रभाग कार्यालयात जनतेच्या माहितीसाठी लावण्यात याव्यात. अशा याद्यांची एक अद्ययावत प्रत ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालिका प्रभाग कार्यालयात जनतेच्या तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. जिल्ह्यातील सर्व योजनांच्या योजनानिहाय लाभार्थी याद्या संगणकीकृत करुन ठेवाव्यात व

अशा संगणकीकृत याद्यांची फ्लॉपी / सीडी शासनाकडे पाठविण्यात यावी. लाभार्थ्यांच्या याद्या लावणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सक्तीचे आहे, याची जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

ब) <u>जिल्हाधिका-यांनी लाभार्थ्यांच्या याद्या वेबसाईटवर टाकून त्या वेळोवेळी अद्ययावत कराव्यात.</u>

**(५) या सर्व योजनांमधील लाभार्थी मंजुरीचे आदेश फक्त <u>माहितीसाठी</u> संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीसमोर सादर करावेत. या अर्जांना समितीच्या मंजुरीची आवश्यकता नाही.**

*-*-*-*-*-*-*-*--*

२४

शासन निर्णय क्रमांकः विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० चे परिशिष्ट

# परिशिष्ट-७

**( श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेखाली अर्थसहाय्यासाठी करावयाच्या अर्जाचा, अर्ज तपासणीच्या व मंजूरीचा नमुना )**

प्रति,

तहसिलदार,
तालुका-
जिल्हा-

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :

२. पत्ता :

३. जन्मतारीख व वय :

४. महाराष्ट्रातील अधिवास :

५. कुटुंबातील व्यक्तींची संख्या :

६. (अ) कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न :

**किंवा**

(ब) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीतील क्रमांक :

७. जातीचा प्रवर्ग (पोट जात नमूद करावी )

अ) खुला :

ब) अनुसूचित जाती :

क) अनुसूचित जमाती :

ड) विमुक्त जाती :

इ) भटक्या जमाती :

ई) विशेष मागास प्रवर्ग :

उ) इतर मागास प्रवर्ग :

८. प्रवर्ग

**अ) वृध्द**

**ब) अपंग**

i ) अंध :

ii) अस्थिव्यंग :

iii) मुकबधिर :

iv) कर्णबधिर :

v) मतिमंद :

**क) विधवा**

२५

९.  मी असे जाहीर करतो की, मी वर दिलेली माहिती सत्य व बिनचूक असून , मी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमीत मासिक आर्थिक लाभ घेत नाही. सदरची माहिती चुकीची आढळल्यास माझ्या विरुध्द फौजदारी कारवाईसह इतर कारवाई करण्यास मी पात्र असल्याची मला जाणीव आहे.

स्थळ:-
दिनांक-
उजव्या किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा.  अर्जदाराची सही
टिप:- अर्जदाराने सही व अंगठ्याचा ठसा देणे बंधनकारक आहे.

१०.  माझ्या समक्ष श्री./श्रीमती ............................... ह्याने / हिने सही व अंगठ्याचा ठसा दिलेला आहे.

साक्षीदाराचे नांव व पत्ता:-

साक्षीदाराची सही.( दिनांकासह)

११.  मी आवश्यक त्या चौकशीनंतर प्रमाणित करतो की, वरील माहिती बरोबर आहे / वरील माहिती चुकीची असल्याने प्रस्तुत योजनेचा लाभ मिळावा यासाठी या अर्जाची शिफारस करीत आहे / नाही.

स्थळ:
दिनांक:

तपासणी करणा-याची सही व शिक्का.

१२.  असे प्रमाणित करण्यात येते की, मी प्रस्तुत अर्जाची छाननी केली आहे व अर्जामध्ये सादर केलेल्या माहितीची पडताळणी करुन घेतली आहे.

मी सदर अर्ज श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत लाभासाठी मंजूर करीत आहे.

स्थळ :

दिनांक :

उप विभागीय अधिका-याची सही व शिक्का.

२६

# परिशिष्ट-८

## राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजनेतंर्गत लाभ मंजुरीचे आदेश

**आदेश क्रमांक व दिनांक** :

**कार्यालयाचा पूर्ण पत्ता** :

श्री./श्रीमती ..........................................................................................................

गाव ...................... तालुका .................... जिल्हा ....................... यांना राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजनेतंर्गत श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना/इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना/इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना /इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना लाभार्थी म्हणून पात्र ठरल्याने उप विभागीय अधिकारी यांनी दिनांक ................रोजी दिलेल्या मंजुरीनुसार दरमहा रु. ............ (अक्षरी रुपये ..........................................), दिनांक ...................... पासून मंजूर करण्यात येत आहे.

त्यांचा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील / राष्ट्रीयकृत बँकेतील / पोस्ट बचत खात्यातील बचत खाते क्रमांक- ................. असा आहे.

दिनांक :-

( स्वाक्षरी )
नायब तहसिलदार/तहसिलदार

प्रति,
(१) श्री./श्रीमती ........................................................ (लाभार्थी)

(२) उप जिल्हाधिकारी (उप विभागीय) ..............................................

(३) जिल्हाधिकारी ..................................................................

(४) सरपंच/नगराध्यक्ष/प्रभाग समिती अध्यक्ष........................... तालुका ......................
जिल्हा ........................

२८

## परिशिष्ट-९

### सर्व योजनांसाठी अर्थसहाय्य वितरण व संनियंत्रण पध्दती

**(१) विशेष सहाय्याच्या योजनांसाठी अर्थसंकल्पिय तरतूद झाल्यानंतर अर्थसंकल्पिय वितरण पध्दतीद्वारे प्रत्येक जिल्हयाचे लाभार्थी विचारात घेऊन संबंधित जिल्हाधिका-याला अनुदानाचे वितरण शासनाकडून करण्यात येईल.**

**(२) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेसाठी सध्या असलेल्या स्वीय प्रपंजी लेखा (पीएलए) मध्ये तसेच इतर बँकेच्या खात्यात अनुदानाची रक्कम ठेवण्यात येऊ नये. या योजनेखालील अनुदानाचे वितरण खाली नमूद केलेल्या अनुक्रमांक ४ प्रमाणे करण्यात यावे.**

**(३) शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान संबंधित तालुक्याचे लाभार्थी विचारात घेऊन जिल्हाधिका-यांनी संबंधित तालुक्यांना वितरित करावे.**

(४) **अ)** या शासन निर्णयातील योजनेखालील लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेले अनुदान बँक खाते / पोस्ट बचत खाते ( पोस्ट ऑफिस सेव्हींग खाते ) यामार्फतच वितरीत करण्यात यावे. लाभार्थ्यांना त्यांच्या जवळच्या बँकेत बचत खाते उघडण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तहसिलदार / नायब तहसिलदार यांनी लाभार्थी संख्येनुसार तालुका उप कोषागारातून बँकनिहाय पैसे धनादेशाद्वारे काढावेत व लाभार्थ्यांच्या यादीसह धनादेश संबंधित बँकांना पाठवावेत.

**ब)** लाभार्थ्यांनी सतत <u>तीन महिने</u> अनुदान उचलले नाही तर संबंधित बँकांनी / पोस्ट मास्तरांनी त्याबाबतचा तपशिल संबंधित तहसिलदाराकडे कळवावा. असे पैसे तात्काळ पुन्हा कोषागारात जमा करण्यात यावेत.

**क)** वर निर्धारित केलेल्या लाभ वितरण पध्दतीपेक्षा वेगळया पध्दतीने आर्थिक सहाय्य वितरीत केल्यास, नियमानुसार आर्थिक सहाय्य वितरीत केले नाही, असे समजण्यात येईल व त्यासाठी संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल.

(५) <u>लाभार्थी मरण पावल्याची सूचना :</u>

**अ)** एखादा लाभार्थी मरण पावल्यास, ग्रामपंचायत क्षेत्राच्या बाबतीत ग्राम सेवकाने, नगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी व महानगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत प्रभाग अधिकारी यांनी ती बाब संबंधित नायब तहसिलदार / तहसिलदार यांना तात्काळ कळवावी. नायब तहसिलदार/तहसिलदार यांनी आपल्या आर्थिक सहाय्याच्या नोंदवहीमध्ये मृत्यूच्या घटनेची नोंद करावी व परिणामी आर्थिक सहाय्य देण्याचे बंद करावे.

**ब)** लाभार्थी मृत्यू पावलेल्या दिनांकास आर्थिक सहाय्याची काही थकबाकी नियत असल्यास मृत्यूच्या दिनांकापर्यंचा हिशोब करुन ती योग्य प्रमाणात लाभार्थीच्या उत्तरजीवी व्यक्तीला, म्हणजे त्याची पत्नी/तिचे पती किंवा कायदेशीर वारसास द्यावी.

(६) <u>लाभार्थ्यांची तपासणी :</u>

(अ) लाभार्थी हयात असल्याबाबतची तपासणी वर्षातून एकदा खालीलप्रमाणे करावी.

(i) दरवर्षी १ जानेवारी ते ३१ मार्च, या कालावधीत एकदा संबंधित लाभार्थ्यांनी त्यांचे जेथे खाते आहे अशा बँक मॅनेजरकडे अथवा पोस्ट मास्तरकडे स्वतः हजर राहावे व ते हयात असल्याची नोंद बँक मॅनेजर / पोस्ट मास्तर यांनी घ्यावी.(परिशिष्ट-९ , नमूना-नऊ)

(ii) कोणत्याही कारणामुळे लाभार्थी बँकेत हजर राहू शकला नाही तर त्या लाभार्थ्याने नायब तहसिलदार / तहसिलदार / उप विभागीय अधिकारी ( प्रांत अधिकारी ) यांचे समोर हजर राहून हयातीबाबतचे प्रमाणपत्र संबंधित तहसिलदाराकडे सादर करावे.

(iii) कोणत्याही परिस्थितीत हयात प्रमाणपत्र ( लाईफ सर्टीफिकेट ) सादर केल्याशिवाय सदर लाभार्थ्यास दरवर्षी १ एप्रिल पासून आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन देण्यात येऊ नये.

(iv) अशा प्रकारे प्राप्त झालेल्या हयात प्रमाणपत्राची (लाईफ सर्टीफिकेट ) नोंदवही ठेवण्यात यावी व ती बायडींग करुन कायम स्वरुपी रेकॉर्ड म्हणून तहसिलदार कार्यालयात ठेवण्यात यावी. (परिशिष्ट-९ नमुना-आठ)

(ब) वरील सर्व योजनेत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची पात्रता तपासणी वर्षातून एकदा करण्यात यावी. या तपासणीत एखादा लाभार्थी ज्या कारणामुळे अपात्र ठरत असेल त्याची कारणमीमांसा त्या लाभार्थीस कळवून त्याचा लाभ त्वरित बंद करण्यात यावा.

(७) संकीर्ण :

या शासन निर्णयान्वये आर्थिक सहाय्य करणे ही सर्वस्वी शासनाच्या मर्जीची बाब असून, आर्थिक सहाय्य मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यास कोणतेही कारण देऊन किंवा कारण न देता ती नाकारता/बंद करता येईल. सहाय्य मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निर्णयास कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही. तसेच कोणत्याही न्यायालयात त्याविरुध्द खटला किंवा कार्यवाही दाखल करता येणार नाही.

या शासन निर्णयातील विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यावर कायद्याच्या कोणत्याही प्रक्रियेने टाच आणता येणार नाही.

(८) पडताळणी पध्दती :

अ) योजना अंमलबजावणीतील लाभार्थ्यांची पडताळणी तसेच ठेवण्यात येणाऱ्या लेख्यांची पडताळणी जिल्हाधिकारी कार्यालयातील अंतर्गत लेखा परीक्षा पथकामार्फत वर्षातून एकदा करण्यात यावी. खर्चाचे हिशेब प्रत्येक तिमाहीस जिल्हाधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी यांनी तपासून त्याचे लेखा परीक्षण केल्याबद्दलचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

ब) शासन लाभार्थ्यांच्या आर्थिक सहाय्यासंदर्भात विशेष लेखा परीक्षण करु शकेल.

(९) क्षेत्रिय स्तरावरील संनियंत्रण अधिकारी :

विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयातील उप आयुक्त (महसूल) हे या योजनांचे विभागीय स्तरावरील संनियंत्रण अधिकारी असतील तर निवासी उप जिल्हाधिकारी हे जिल्हा स्तरावरील संनियंत्रण अधिकारी राहतील.

(१०) विविध प्रकारचे अहवाल :

विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक योजनेच्या खर्च विषयक बाबींचे मासिक, त्रैमासिक व वार्षिक अहवाल परिशिष्ट-९ मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये शासनास सादर करावेत.

प्रत्येक योजनेच्या अनुदान व खर्च विषयक बाबींचे लेखे स्वतंत्र नोंदवहयामध्ये अद्ययावत ठेवावेत.

(११) दक्षता पथके :

या सर्व योजनांच्या अंमलबजावणीमध्ये आढळून येणाऱ्या गंभीर अनियमितता, गैरव्यवहार याची पडताळणी करण्यासाठी राज्य शासनास योग्य वाटेल अशा अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली नियमित अथवा विशिष्ट प्रकरणात तपास करण्यासाठी क्षेत्रिय पातळीवरील अधिकारी / कर्मचारी यांच्या दक्षता पथकाची स्थापना करता येईल.

**(१२) या योजनांच्या अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आलेली सर्व अधिकारी / कर्मचारी यांची पदे रिक्त राहणार नाहीत. याची दक्षता जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त, महसूल यांनी घ्यावी .**

**(१३) या योजनेतील शासन रकमेचा गैरव्यवहार व अपहार झाल्याचे आढळून आल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरित तपास करुन दोषींवर गुन्हे दाखल करावेत.**

**(१४) वर नमूद केलेल्या वितरण पध्दतीमध्ये आवश्यकतेनुसार शासन बदल करील.**

२८

# परिशिष्ट-१०

(सामाजिक अर्थसहाय्य योजनांतर्गत राज्य पुरस्कृत योजनांचा लाभ मिळण्यासाठी आलेल्या अर्जांची नमुना नोंदवही)

तालुका / नगरपरिषद / महानगरपालिका :--------------

| अ. क्र. | अर्ज मिळाल्याची तारीख | अर्जदाराचे संपूर्ण नांव | अर्जदाराचा संपूर्ण पत्ता | तलाठ्याची शिफारस | मंजूरी अधिकाऱ्यास केलेल्या शिफारशीची तारीख | मंजूरीचा आदेश क्रमांक व दिनांक | शेरा (मंजूर/ नामंजूर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

( **टीप :** ही नोंदवही प्रत्येक योजनेसाठी वेगळी ठेवावी त्याचबरोबर ग्रामपंचायत / नगर परिषद / महानगरपालिका प्रभागनिहाय सुध्दा ठेवावी. )

दिनांकः-

तहसिलदार / नायब तहसिलदार यांची स्वाक्षरी

३०

शासन निर्णय क्रमांकः विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० चे परिशिष्ट

## परिशिष्ट-११

**(सामाजिक अर्थसहाय्य योजनांतर्गत राज्य पुरस्कृत योजनांचा लाभ मंजूर झालेल्या लाभार्थीची नमुना नोंदवही)**

तालुका/ नगरपरिषद/महानगरपालिका :--------------

| अ. क्र. | लाभार्थ्याचे नांव व पत्ता | लाभ मंजूर केल्याच्या आदेशाचा क्रमांक व तारीख | लाभ मंजूर झाल्याबाबत लाभार्थ्यास कळविल्या-बाबतची तारीख | शेरा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लाभार्थी हयात आहे व त्याच ठिकाणी राहात आहे | लाभार्थी हयात आहे पण त्याने आपले राहण्याचे ठिकाण बदलले आहे. | लाभार्थी दिनांक ------ रोजी मृत्यू पावला |
| १ | २ | ३ | ४ | ४ | ६ | ७ |

( **टीप :** ही नोंदवही प्रत्येक योजनेसाठी वेगळी ठेवावी त्याचबरोबर ग्रामपंचायत / नगर परिषद / महानगरपालिका प्रभागनिहाय सुध्दा ठेवावी. )

दिनांकः- तहसिलदार / नायब तहसिलदार यांची स्वाक्षरी

३१

शासन निर्णय क्रमांकः विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० चे परिशिष्ट

# परिशिष्ट-१२

## हयात प्रमाणपत्र (लाईव्ह सर्टीफिकेट)

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती ..................................................................

राहणार .......................... तालुका ........................................ जिल्हा ........................................ हे

/ ह्या ............................................ या योजनेखालील लाभार्थी असून, हयातीचा पुरावा म्हणून आज दिनांक

.................... रोजी माझ्या समोर प्रत्यक्ष हजर राहिले / राहिल्या.

स्थळ :

सही ................................

दिनांक :

तपासणी अधिकाऱ्याचे नांव, हुद्दा व कार्यालयाचा शिक्का.

## परिशिष्ट-१३

### उत्पन्न प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार श्री./श्रीमती ........................................................

राहणार ...................... ता. ...................... जि. ................................ हे / ह्या ................................................ या निराधार प्रवर्गातील असून, त्यांच्या कुटुंबाचे (अ) जमीन (एकर), (ब) घर (अंदाजे किंमत), (क) इतर मालमत्ता व (ड) व्यवसाय (नोकरी/धंदा इ.) या सर्व मार्गाने मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये ............. आहे.

स्थळ : सही .......................

दिनांक : तहसिलदार / उप विभागीय अधिकारी यांची स्वाक्षरी

## परिशिष्ट-१४

संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा योजनेत वर्ग करणे.

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती.................................................... रा.................. तालुका..........................जिल्हा...................... यांची जन्म तारीख ...................... असून हे / ह्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत लाभ घेत आहेत. त्यांचे वय दिनांक .................... रोजी ६४ वर्षे पूर्ण झाल्यामुळे आणि त्यांचे दारिद्र्यरेषेखालील यादीत अनुक्रमांक ............ नांव असल्यामुळे श्री / श्रीमती ........................ यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेत वर्ग करण्यात येत आहे.

ठिकाण :-

दिनांक:-

तहसिलदार / उप विभागीय अधिकारी यांची स्वाक्षरी

३४

# परिशिष्ट-१५

## संजय गांधी निराधार अनुदान योजना लाभार्थ्यांबाबतचा तिमाही अहवाल

**जिल्ह्याचे नांव :-** **कालावधी :** **अहवालाची तारीख :**

| अ.क्र. | लाभार्थी | तिमाहीच्या सुरुवातीस एकूण लाभार्थी | | | तिमाहीत मृत्यू अथवा अन्य कारणांमुळे कमी झालेले लाभार्थी | | | तिमाहीत नवीन मंजूर लाभार्थी | | | तिमाही अखेर एकूण प्रत्यक्ष लाभार्थी (निव्वळ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | एक लाभार्थी असणारे कुटुंब | | | | | | | | | | | | |
| २ | एकापेक्षा जास्त लाभार्थी असणारे कुटुंब | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी

दिनांक

टिप : १) संजय गांधी निराधार अनुदान योजना (गट-अ) - इंदिरा गांधी विधवा निवृत्तीवेतन योजनेला पुरक रु.४००/- प्रमाणे रु.७००/- लाभार्थी नोंदवही ठेवावी.
२) संजय गांधी निराधार अनुदान योजना (गट-ब) - इंदिरा गांधी अपंग निवृत्तीवेतन योजनेला पुरक रु.४००/- प्रमाणे रु.७००/- लाभार्थी नोंदवही ठेवावी.

# परिशिष्ट-१६

## श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना लाभार्थ्यांबाबतचा तिमाही अहवाल

**जिल्ह्याचे नांव :-** **कालावधी :** **अहवालाची तारीख :**

| अ.क्र. | लाभार्थी | तिमाहीच्या सुरुवातीस एकूण लाभार्थी | | | तिमाहीत मृत्यू अथवा अन्य कारणांमुळे कमी झालेले लाभार्थी | | | तिमाहीत नवीन मंजूर लाभार्थी | | | तिमाही अखेर एकूण प्रत्यक्ष लाभार्थी (निव्वळ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | रुपये ४००/- प्रमाणे लाभार्थी | | | | | | | | | | | | |
| २ | रुपये ६००/- प्रमाणे लाभार्थी | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी

दिनांक

टिप : १) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट-अ रु.४००/- प्रति महिना प्रमाणे लाभार्थ्यांची नोंदवही ठेवावी.
२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट-ब रु.६००/- प्रति महिना प्रमाणे लाभार्थ्यांची नोंदवही ठेवावी.

## परिशिष्ट-१७

### इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना लाभार्थ्यांबाबतचा तिमाही अहवाल

**जिल्ह्याचे नांव :-** **कालावधी :** **अहवालाची तारीख :**

| अ.क्र. | लाभार्थी | तिमाहीच्या सुरूवातीस एकूण लाभार्थी | | | तिमाहीत मृत्यू अथवा अन्य कारणांमुळे कमी झालेले लाभार्थी | | | तिमाहीत नवीन मंजूर लाभार्थी | | | तिमाही अखेर एकूण प्रत्यक्ष लाभार्थी (निव्वळ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम | लाभार्थी संख्या | अनुदानाचा दर (रुपये) | अनुदानाची एकूण रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी

दिनांक

टिप : १) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेसाठी स्वतंत्र नोंदवह्या ठेवण्यात याव्यात.

३८

## परिशिष्ट-१८

नमुना - एक

१) मासिक खर्च अहवाल : कालावधी : अहवालाची तारीख :

योजनेचे नांव (आठ अंकी संकेतांकासह) :- (रुपये हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | महिन्यासाठी प्राप्त अनुदान | महिन्यात झालेला खर्च | आतापर्यंतचा एकूण खर्च | महिन्यात कमी अधिक झालेला खर्च (+ / -) | महिन्यात कमी/अधिक झालेल्या खर्चाची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

स्वाक्षरी

दिनांक

३८

## परिशिष्ट-१८

नमुना - दोन

२) त्रैमासिक खर्चाचा अहवाल : कालावधी : अहवालाची तारीख :

योजनेचे नांव (आठ अंकी संकेतांकासह) :-

(रुपये हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | तिमाहीत प्राप्त अनुदान | तिमाहीत झालेला खर्च | आर्थिक वर्षात आतापर्यंतचा झालेला एकुण खर्च | कमी अधिक झालेला खर्च (+ / -) | तिमाहीत कमी/अधिक झालेल्या खर्चाची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

स्वाक्षरी

दिनांक

३९

## परिशिष्ट-१८

### नमुना - तीन

३) वार्षिक खर्च अहवाल : कालावधी : अहवालाची तारीख :

योजनेचे नांव (आठ अंकी संकेतांकासह) :-

(रुपये हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | आर्थिक वर्षात प्राप्त अनुदान | ३१ मार्च अखेर प्रत्यक्ष झालेला खर्च | कमी अधिक झालेला खर्च (+ / - ) | कमी/अधिक झालेल्या खर्चाची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ |
| | | | | | |

स्वाक्षरी

दिनांक

**'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम'**
**राज्यामध्ये राबविण्याबाबत ..**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक एमआयएस : २००७/सीआर-२३८/पोल-८,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १९ जुलै, २००७.**

प्रस्तावना :- भारत या सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्रातील महाराष्ट्र हे सजग, क्रियाशील व अनेक बाबतीत आद्यप्रवर्तक असे राज्य आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगामध्ये दुसरा क्रमांक असलेल्या आपल्या राष्ट्राच्या सन २००१ च्या जनगणनेनुसार १०२.८६ कोटी लोकसंख्येत महाराष्ट्राची लोकसंख्या ९.६८ कोटी (९.४ %) इतकी आहे. राज्यामध्ये अनेक धर्म, पंथ, अठरा पगड जाती, उपजातीचे लोक तसेच अनेक प्रकारचे व्यवसाय, व्यापार व उदीम करणारे लोक याशिवाय स्थित, विस्थापित व स्थलांतरित अशा अनेक घटकाचे लोक आपल्या परंपरा, चालीरिती, सण, उत्सव, वेशभूषा, विचार व आचारसरणी, इत्यादीसह रहात असून एक बहुविध समाज त्यातून प्रतिबिंबित होतो. उपरोक्त विविधता व प्रचंड लोकसंख्या यामुळे राज्यामधील तंटे व खटल्यांचे प्रमाणही मोठे आहे.

राज्यात विविध स्तरावरील न्यायालयांमध्ये दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे दावे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. न्यायव्यवस्थेवरील खटल्यांचा भार दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीमध्ये, लोकांना लवकरात लवकर व कमी खर्चात न्याय मिळवून देण्यासाठी पर्यायी व्यवस्थेच्या आवश्यकतेच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालय व केंद्र शासनाकडून यापूर्वी काही पर्यायी न्यायव्यवस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. तंटे निकाली काढण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून सन १९८० मध्ये लोकन्यायालयाची स्थापना करण्यात आली. तालुका व गांव पातळीवर लोकन्यायालये भरवून जलद गतीने खटले निकाली काढण्याचे काम त्यामार्फत केले जाते. ॲड.सालेम विरुध्द केंद्र शासन या याचिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने कोर्टामध्ये प्रलंबित खटले कमी करण्यासाठी सिव्हील प्रोसिजर कोड, कलम ८९ मध्ये योग्य ते बदल करुन Alternative Dispute Resolution (ADR) System सारखी प्रभावी यंत्रणा राबविण्याबाबत निर्णय घ्यावा असे केंद्र शासनास निर्देश दिले होते. त्यानुसार 'पर्यायी तंटा निवारण पध्दती' (ADR) ही व्यवस्था सध्या नव्याने अस्तित्वात आली असून तंटे सोडविण्याचे हे नवीन माध्यम अलिकडच्या काळात प्रभावी होत आहे. सदर प्रणालीद्वारे चांगल्या वातावरणात तडजोड होवून परस्परांमध्ये तेढ निर्माण न होता तंटे मिटविले

जातात. तसेच केंद्र शासनाने सन १९९२ मध्ये मोठ्या प्रमाणावरील न्यायालयीन प्रकरणांच्या निर्गतीसाठी ४५० फास्ट ट्रॅक कोर्टची निर्मिती केली आहे.

गांव पातळीवर छोट्या-छोट्या कारणांवरुन तंट्याची सुरुवात होते. त्यामध्ये सुरुवातीस कमी लोकांचा सहभाग असतो. छोट्या तंट्यांचे पुढे मोठ्या तंट्यात रुपांतर होते. अशा मोठ्या तंट्यांत अनेक लोकांचा सहभाग येतो. कधीकधी दिवाणी तंट्यातून फौजदारी तंटे निर्माण होतात. छोट्या कारणावरुन निर्माण झालेला तंटा मोठा होऊन पुढे फौजदारी तंटा बनतो व त्यातून कुटुंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येते. पर्यायाने असे तंटे मिटविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेवरील व न्यायिक यंत्रणेवरील ताण वाढतो. त्यासाठी तंटे मिटविण्याकरिता लोकन्यायालय व ADR सारखी पर्यायी व्यवस्था उपलब्ध असली तरीही तंटे निर्माणच होऊ नयेत व निर्माण झालेले तंटे गावपातळीवरच मिटविण्यासाठी व्यापक मोहीम फलदायी ठरेल. अशी मोहीम लोकसहभागातून राबविल्यास प्रभावी ठरु शकेल याचा विचार करुन गाव पातळीवर लोकसहभागातून सौहार्दपूर्ण व सलोख्याचे वातावरण निर्माण करुन त्याद्वारे आपापसातील तंटे सोडविण्यासाठी मोहीम आखण्यासंबंधी राज्य शासनाने उपमुख्यमंत्री यांचे उप सचिव यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास गट नेमला होता. अभ्यास गटाच्या अहवालात मोहीम आखणी, अंमलबजावणी व पुरस्कार योजनेचा आराखडा दिलेला आहे.

महाराष्ट्रात भक्ती सांप्रदायाची सुरुवात तेराव्या शतकात झाली. त्यामध्ये संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा अनेक संतांनी महाराष्ट्राच्या जनतेला वैचारिक व मानसिक दिशा दिली. त्यांच्या शिकवणीतील सलोखा व बंधुभावाचा गेल्या ७०० वर्षाचा प्रवाह आजही अव्याहतपणे सुरु आहे. ही व्यापक पार्श्वभूमी तंटामुक्तीसाठी लोकचळवळ निर्माण होण्यास पोषक अशीच आहे. म्हणून भक्ती सांप्रदायाने महाराष्ट्रात निर्माण केलेली जनजागृती व पूर्वापार खेडयामध्ये मान्यता पावलेल्या पंच पध्दतीसारखी पध्दती लोकसहभागातून निर्माण व्हावी आणि गावात तंटे निर्माण होवू नयेत व झालेले तंटे मिटविण्याची अभ्यास गटाच्या अहवालाच्या आधारे एक व्यापक मोहीम उभी केली जावी आणि या मोहिमेअंतर्गत पात्र ग्रामपंचायतींना पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे असा शासनाचा मानस आहे. त्या अनुषंगाने तंटामुक्त गाव मोहीम व बक्षिस योजनेसंबंधी शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय :-**

गाव पातळीवर छोटया छोटया कारणावरुन निर्माण होणा-या तंटयांचे पर्यावसन मोठया तंटयात होऊ न देणे, तसेच वादामध्ये मत्ता अडकून पडून त्यातून आर्थिक नुकसान होऊ न देणे व कुटुंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येवू नये यासाठी तंटे निर्माण होणार नाहीत व अस्तित्वातील तंटे लोकसहभागाने,

सामोपचाराने व आवश्यक तेथे प्रशासनाची मदत घेवून सोडविण्याची व्यवस्था निर्माण होण्यासाठी, शासन 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम' सुरु करीत आहे.

प्रतिबंधात्मक उपाययोजना, दाखल झालेले तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे असे सदर मोहीमेचे तीन भाग असून या तीनही भागातील कार्यवाही व तंटे मिटविण्याची मोहीम ही लोकचळवळ म्हणून राबविली जावी आणि त्या माध्यमातून गावे तंटामुक्त व्हावीत यासाठी मोहीम राबविल्यानंतर गाव तंटामुक्त झाल्यास अशा तंटामुक्त गावांना समारंभपूर्वक पुरस्काराने सन्मानित करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचे स्वरुप, मूल्यमापनाचे निकष, मूल्यमापनाची यंत्रणा, पुरस्कार योजना, प्रचार व प्रसार, इत्यादी याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम'**

**२. उद्दिष्टे**

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेसाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे ठरविण्यात येत आहेत:-

१) गाव पातळीवर तंटे निर्माण होऊ नयेत म्हणून उपक्रम राबविणे,
२) दाखल असलेल्या व नव्याने निर्माण होणा-या तंट्यांचे निराकरण करुन ते कमी करणे,
३) गावासाठी गांवातच लोकसहभागातून तात्काळ व सर्वमान्य तडजोड घडवून आणण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे,
४) गांवातील जनतेमध्ये जातीय व धार्मिक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करणे,
५) पोलिसांच्या कामामध्ये पारदर्शकता आणून त्यांची जनमानसातील प्रतिमा सुधारुन 'जनतेचे सेवक' अशी प्रतिष्ठा प्राप्त करणे,
६) लोकांच्या सहकार्याने अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मूलन करणे,
७) भ्रष्टाचार व भ्रष्टाचारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी गावपातळीवर प्रयत्न करणे,
८) अनिष्ट प्रथा व चाली-रीती नष्ट करण्यासाठी लोकांच्यामध्ये जागृती निर्माण करणे.

**३. मोहिमेचे स्वरुप व मोहीम केंद्रित तंटे**

१) गावात तंटे होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, अस्तित्वातील व निर्माण होणारे तंटे सामोपचाराने मिटविणे हे मोहिमेचे स्वरुप आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत पुढीलप्रमाणे ४ प्रकारातील तंटे ग्रामपंचायत पातळीवर मिटविण्यासाठी विचारात घेण्यात येतील.

**अ) दिवाणी-** स्थावर मालमत्तेचे मालकी हक्क, वारसा हक्क, वाटप, हस्तांतरण, इत्यादी तसेच भाडेपट्टा, जंगम मालमत्तेची खरेदी-विक्री, हस्तांतरण, गहाण व कर्ज व्यवहार, रकमांची देवाणघेवाण, पोटगी, इत्यादी व इतर कारणांवरुन निर्माण झालेले सर्व दिवाणी वाद/तंटे.

**ब) महसुली-** शेतीचे मालकी हक्क, वारसा हक्क, हद्दी, अतिक्रमणे, वाटप त्याचप्रमाणे गांवठाणातील जागा, गोठे, परडे यांचे मालकी हक्क, हद्दी आणि खुणा यांवरुन निर्माण झालेले तंटे. कुळ कायदा, वतन कायदा, जमीनविषयक इतर विविध कायदे, सार्वजनिक रस्ता व शेतात जावयाचा रस्ता, इत्यादी व इतर कारणांवरुन निर्माण झालेले सर्व तंटे.

**क) फौजदारी-** शारीरिक, मालमत्ता आणि फसवणूक यासंबंधीचे अदखलपात्र (एन.सी.) व दखलपात्र फौजदारी गुन्हयांपैकी जे गुन्हे संबंधित पक्षकारांच्या सहमतीने व कायद्यानुसार मिटविता येऊ शकतात (compoundable) असे तंटे/गुन्हे.

**ड) इतर तंटे-** दिवाणी, महसूली, फौजदारी तंटयांव्यतिरिक्त सहकार, कामगार, औद्योगिक क्षेत्रातील व इतर तंटे.

२) जे फौजदारी तंटे कायद्यातील तरतुदीनुसार मिटविता येऊ शकणार नाहीत अशा तंटयांबाबत संबंधित पोलीस ठाणे अथवा संबंधित न्यायालयामध्ये योग्य ती कार्यवाही होत राहील.

**४. मोहिमेची व्याप्ती व घटक**

सदर मोहीम राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये सातत्याने राबविण्यात येईल. मोहिमेसाठी ग्रामपंचायत हा घटक विहीत करण्यात येत असून त्यात ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावे, वाड्या, वस्त्या यांचा समावेश राहील. या मोहिमेच्या प्रयोजनार्थ ग्रामपंचायतीस 'गाव' संबोधण्यात येईल.

**५. मोहिमेचा कालबध्द कार्यक्रम**

प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे आयोजन आणि गावातील सध्या दाखल असलेले विविध तंटे आणि नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविण्यासंबंधी राबवावयाच्या मोहिमेचा कालबध्द कार्यक्रम **परिशिष्ट-१** मध्ये दिल्याप्रमाणे ठरविण्यात येत आहे.

**६. मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी समित्या स्थापन करणे**

महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा, तालुका, पोलीस ठाणे व गाव पातळीवर समित्या स्थापन करण्यात याव्यात. सदर समित्यांची रचना व कार्ये पुढीलप्रमाणे असतील:-

१) राज्य स्तरीय समिती

(अ) राज्य स्तरीय समितीची रचना

| | | |
|---|---|---|
| मा. मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| मा.उपमुख्यमंत्री (गृहमंत्री) | - | सह अध्यक्ष |
| मा.मंत्री, महसूल, | - | सदस्य |
| मा.मंत्री, ग्रामविकास | - | सदस्य |
| मा.मंत्री, सामाजिक न्याय | - | सदस्य |
| मा.मंत्री, आदिवासी विकास | - | सदस्य |
| मा.मंत्री, महिला व बालकल्याण | - | सदस्य |
| मा.राज्यमंत्री, गृह | - | सदस्य |
| मुख्य सचिव | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (गृह) | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (महसूल) | - | सदस्य |
| पोलीस महासंचालक | - | सदस्य |
| प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) | - | सदस्य |
| सचिव, शालेय शिक्षण | - | सदस्य |
| सचिव, ग्राम विकास | - | सदस्य |
| सचिव, सामाजिक न्याय | - | सदस्य |
| सचिव, आदिवासी विकास | - | सदस्य |
| सचिव, महिला व बालकल्याण | - | सदस्य |
| सचिव, विधि व न्याय | - | सदस्य |
| महासंचालक, माहिती व जनसंपर्क | - | सदस्य |
| संचालक, सरकारी अभियोग संचालनालय | - | सदस्य |
| सर्व विभागीय आयुक्त | - | सदस्य |
| अति.पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) | - | सदस्य |
| आयुक्त (राज्य गुप्तवार्ता विभाग) | - | सदस्य |
| सर्व परिक्षेत्रांचे विशेष पोलीस महानिरीक्षक | - | सदस्य |
| प्रधान सचिव (विशेष) | - | सदस्य सचिव |

(ब) समितीची कार्ये

(१) मोहिमेच्या अंमलबजावणीचा दरवर्षी आढावा घेऊन आवश्यकतेनुसार शासन निर्णयामध्ये बदल अथवा दुरुस्ती करणे.

(२) राज्य स्तरावर मोहिमेच्या प्रचार व प्रसिध्दीचे नियोजन व अंमलबजावणीतील अडीअडचणींवर देखरेख ठेवून मार्गदर्शन करणे.

(३) मोहिमेच्या मूल्यमापनाचे निकष निश्चित करणे व यथास्थिती बदल करणे.

(४) इतर अनुषंगिक बाबीसंबंधी निर्णय करणे.

२) जिल्हा, तालुका व पोलीस ठाणे स्तरावरील समित्या

जिल्हा, तालुका व पोलीस ठाणे स्तरावरील समित्या, त्यांची रचना आणि कार्ये **परिशिष्ट-२** प्रमाणे असतील.

३) गाव पातळीवरील समिती

(१) राज्यातील सर्व ग्रामपंचायतीना एक 'तंटामुक्त गाव समिती' स्थापन करणे अनिवार्य राहील. सदर तंटामुक्त गांव समितीच्या अध्यक्षाची व सदस्यांची निवड ग्रामसभा आयोजित करुन त्याद्वारे करण्यात येईल.

**(अ) समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| ग्रामसभेने निवडलेला प्रतिनिधी | - | अध्यक्ष |
| ग्रामपंचायतीचे सरपंच | - | सदस्य |
| ग्रामपंचायतीचे उपसरपंच | - | सदस्य |
| संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| निर्मल ग्राम योजनेच्या समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ग्राम शिक्षण समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| निवृत्त न्यायाधीश | - | सदस्य |
| माजी सैनिकांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| वकीलांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| पदविकाधारक मध्यस्थ (ADR) | - | सदस्य |
| डॉक्टरांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| पत्रकारांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| निवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| व्यापा-यांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| महिला बचत गटांचे प्रतिनिधी | - | २ सदस्य |
| अल्पसंख्यांकांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| मागासवर्गीयांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| विद्यार्थी/विद्यार्थीनींचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| नेहरु युवा केंद्राचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| युवकांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| गावातील महाविद्यालय/माध्यमिक विद्यालय/प्राथमिक शाळा यांमधील अध्यापकाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी | - | सदस्य |
| गावातील इतर प्रभावी व्यक्ती | - | ३ ते ५ सदस्य |
| वीज वितरण कंपनीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| विशेष पोलीस अधिकारी | - | सदस्य |
| बीट अंमलदार | - | सदस्य |
| ग्राम सुरक्षा दल प्रमुख | - | सदस्य |
| ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी | - | सदस्य |
| गांव कामगार तलाठी | - | सदस्य |
| पोलीस पाटील | - | निमंत्रक |

वरीलपैकी जे ग्रामपंचायत क्षेत्रात असतील तेवढयाच लोकांची समिती असेल.

(२) समाजात ज्यांचा प्रभाव आहे अशा गावातील प्रतिष्ठित, प्रामाणिक, समजुतदार, सामाजिक प्रश्नांची जाण असलेल्या निःस्पृह, निःस्वार्थी व्यक्तींचा समितीमध्ये

समावेश असेल. समितीमध्ये गुंड प्रवृत्तीच्या, कडव्या जातीय विचारसरणीच्या, अवैध धंदे असणा-या वा त्यांचा पुरस्कार करणा-या तसेच असामाजिक तत्वांचा अवलंब करणा-या व्यक्तींना स्थान असणार नाही. समितीचे सदस्य निर्व्यसनी व उत्तम चारित्र्याचे असावेत.

(३) समितीच्या बैठकीस उपस्थित राहणे गाव पातळीवरील शासकीय अधिकाऱ्यांना व कर्मचा-यांना अनिवार्य असेल.

**(ब) समितीचे निमंत्रक**

पोलीस पाटील हे सदर समितीचे निमंत्रक असतील. ज्या गावामध्ये पोलीस पाटील हे पद रिक्त असेल अशा ठिकाणी तलाठी समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहतील. ज्या ठिकाणी पोलीस पाटील व गाव कामगार तलाठी ही दोन्ही पदे रिक्त असतील अशा ठिकाणी ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी हे समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहतील.

**(क) समितीचा कार्यकाल व समिती सदस्य व अध्यक्ष बदलणे.**

तंटामुक्त गाव समिती कायमस्वरूपी कार्यरत राहील. तथापि जे सदस्य समितीच्या बैठकांना उपस्थित राहात नसतील, समितीच्या कामासाठी वेळ देत नसतील, समितीच्या कामात रस घेत नसतील, समितीच्या कामकाजात अडथळा निर्माण करत असतील अशा सदस्यांना बदलून नवीन सदस्य घेणेबाबत प्रत्येक वर्षाच्या १५ ऑगस्ट नंतरच्या पहिल्या ग्रामसभेमध्ये ग्रामसभेच्या मान्यतेने निर्णय घेता येईल. मात्र, कोणत्याही परिस्थितीत तंटामुक्त गाव समितीचे १/३ पेक्षा अधिक सदस्य एकाच वेळी बदलता येणार नाहीत. तसेच समितीचा अध्यक्ष बदलण्याची ग्रामसभेला आवश्यकता वाटत असेल तर अध्यक्ष बदलून नविन अध्यक्षाची निवड त्याच ग्रामसभेमध्ये करण्यात यावी.

**(ड) समितीच्या सदस्यांसाठी आचारसंहिता**

समितीच्या सदस्यांनी निरपेक्ष व निःपक्षपातीपणे काम करणे आवश्यक आहे. सदस्यांनी समितीच्या बैठकांना उपस्थित राहणे, समितीच्या कामासाठी वेळ देणे व तंटे मिटविण्याच्या कामामध्ये रस घेणे आवश्यक आहे. तंटे मिटविताना त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक असला पाहिजे. तंटे मिटवित असताना नकारात्मक अथवा पूर्वग्रहदुषीत दृष्टिकोन सदस्यांनी ठेवू नये.

**(इ) समितीची कार्ये व कक्षा**

१) गावांमध्ये शक्यतोवर तंटे निर्माण होऊ नयेत, जातीय व धार्मिक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि अनिष्ट चालिरीती व प्रथांचे निमूर्लन करण्यासाठी गावांमध्ये राबवायच्या उपरोक्त पुढील परिच्छेद-७.१ मधील व इतर सुयोग्य प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीची रुपरेषा ठरविणे, त्याबाबत जनजागृती करणे व अंमलबजावणी करणे.

२) प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामसभेला स्पष्ट करुन सांगणे.

३) गावातील लोकांना मोहिमेबद्दल मार्गदर्शन करुन सहभागी करुन घेणे. तंटे निर्माणच होऊ नयेत म्हणून प्रयत्न करणे. दाखल असलेल्या तंट्यांची यादी करुन जास्तीत जास्त प्रयत्न करुन ते मिटविणे. नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे.

४) समिती या कामामध्ये आवश्यकतेनुसार पोलीस अधिकारी, बीट अंमलदार, प्रशासकीय यंत्रणा व कायदेतज्ज्ञ यांचे सहाय्य घेवू शकेल.

५) तंटे मिटविताना तंटामुक्त गाव समिती ही मध्यस्थ व प्रेरकाची भूमिका बजावेल.

**७. मोहिमेची अंमलबजावणी**

या मोहिमेअंतर्गत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात :-

७.१ **प्रतिबंधात्मक उपाययोजना**- तंटे आणि तणाव निर्माण होण्याची प्रमुख कारणे शोधून त्यासंबंधी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे व त्यांचे प्रबोधन करणे, ग्रामसंरक्षण, मालमत्तांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षितता, इत्यादीसंबंधी विविध उपक्रम हाती घेऊन लोकांमध्ये सुरक्षित व सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करणे. त्यासाठी गावांमध्ये पुढीलप्रमाणे विविध विषयांवर लोकसहभागातून कार्यक्रम घेऊन ते प्रभावीपणे राबविण्यात यावेत.

(१) सार्वजनिक सण/उत्सव रचनात्मक पध्दतीने व शांततेने साजरे करणे;

- जयंती, उत्सव, गणेशोत्सव, इत्यादी समारंभ
- गावातील सार्वजनिक उत्सव साजरे करणा-या मंडळांचे कार्यक्रम.
- उत्सवांमधून समाजोपयोगी उपक्रम राबविणे.
- व्याख्यानमाला, प्रशिक्षण शिबीर, इत्यादी आयोजित करणे.

- `एक गाव एक गणपती` यासारखे उपक्रम राबविणे.
- गावातील उत्सव/सण/यात्रा पोलीस बंदोबस्ताशिवाय शांततेत पार पाडणे.

(२) जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणे;

- जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणारे उत्सव/सण एकत्रित येऊन साजरे करणे.
- आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहासाठी ग्रामस्थांना प्रोत्साहन देणे.
- मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांच्या तक्रारी मिटविणे.
- जातीय व धार्मिक सलोख्याचे कार्यक्रम घेणे.
- गावातील पुतळे व प्रार्थना स्थळे यांच्या देखभाल व संरक्षणासाठी उपाययोजना करणे.

(३) सार्वजनिक व खाजगी मालमत्तांचे संरक्षण करणे व विद्रुपीकरण रोखणे;

- निवडणूक, वाढदिवस व इतर कार्यक्रम यांच्या जाहिरातीचे फलक लावण्यासाठी नियमावली करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.
- जाहिरातीचे फलक न लावण्याबाबत सामंजस्याने अंमलबजावणी करणे.
- शासकीय व सार्वजनिक मिळकतीवर अतिक्रमणे होऊ न देणे.
- विद्रुप झालेल्या मालमत्ता पूर्ववत करणे.

(४) ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यरत करणे;

- ग्राम सुरक्षा दल स्थापन करणे.
- सदस्यांना गणवेश व प्रशिक्षण देणे.
- ग्राम सुरक्षा दलाची रात्रगस्त चालू करणे.

(५) अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मूलन करणे;

- गावातील अवैध धंदे रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- अवैध धंदे करणा-या लोकांना पर्यायी रोजगाराकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे.
- व्यसनमुक्तीसाठी कार्यक्रम राबविणे, व्यसनी लोकांचे समुपदेशन करणे.
- आवश्यकतेनुसार अवैध धंदे निर्मूलन व प्रतिबंध यासाठी पोलीसांची मदत घेणे वा या कामी पोलीसांना सहकार्य करणे.

(६) सामाजिक सुरक्षिततेसाठी कार्यक्रम राबविणे;

- हुंडाबळी रोखणे.
- महिलांचे सामाजिक प्रश्न व कौटुंबिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.
- जेष्ठ नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करणे.
- महिला बचत गट निर्मिती व सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे.

- सामूहिक विवाह सोहळे आयोजित करणे.
- गावामध्ये बालविवाह होणार नाहीत यासाठी प्रयत्न करणे.

(७) गावांमध्ये राजकीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी उपक्रम घेणे;

- गावातील विविध कार्यकारी सोसायटी, ग्रामपंचायत व पतपेढ्या यांच्या निवडणुका बिनविरोधी करण्यासाठी प्रयत्न करणे.
- पोलीस बंदोबस्ताशिवाय निवडणुका शांततेत पार पाडणे.

(८) गावातील अनिष्ट प्रथा रोखणे;

- अनिष्ट प्रथा, चालीरीती रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे.

(९) वैयक्तिक समारंभ/कार्यक्रम/उत्सव;

- ध्वनीक्षेपकाचा नियमानुसार व मर्यादित वापर
- वरातीमधील गैरप्रकारांना प्रतिबंध करणे.
- वैयक्तिक समारंभातील अनिष्ट प्रथा नष्ट करणे.

(१०) नाविण्यपूर्ण उपक्रम;

- गावातील स्त्री-पुरुष प्रमाण (जन्मदर) सुधारणे.
- बाल कामगार व बाल गुन्हेगारी रोखून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करणे.
- विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे.
- रस्ता सुरक्षेबद्दल उपाययोजना व प्रबोधन करणे.
- वन संवर्धन व वन संरक्षण याबाबत उपाययोजना करणे.
- गावाला व समितीला राबवावेत असे वाटणारे इतर उपक्रम.

मोहीम कालावधीत करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची नोंद या शासन निर्णयासोबतच्या नमुन्यातील **नोंदवही-१** मध्ये योग्य पध्दतीने करण्यात यावी. समितीचे अध्यक्ष व निमंत्रक यांच्या स्वाक्षरीने नोंदवही मूल्यमापन परिक्षणाच्यावेळी सादर केली जावी.

**७.२ दाखल असलेले तंटे मिटविणे.**

१) तंटयांची माहिती संकलीत करणे.

' तंटामुक्त गाव समिती ' गावामधील दाखल असलेल्या दिवाणी, महसूली, फौजदारी व इतर तंटयांची माहिती ३० सप्टेंबरपर्यन्त जमा करेल. त्यासाठी तंटे/ वाद याची माहिती तंटामुक्त गाव समितीकडे देण्यासाठी समिती ग्रामस्थांना आवाहन करेल. तसेच समितीस सुयोग्य वाटेल अशा

पध्दतीने व आवश्यकतेनुसार घरोघरी जावून माहिती जमा करेल. समिती पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, न्यायालय, इत्यादी कार्यालयातून माहिती मिळवेल. अशा सर्व प्राप्त माहितीचा मेळ घालून गावातील तंटयांची यादी करण्यात यावी.

२) संकलीत केलेल्या माहितीतील तंटयांचे वर्गीकरण करणे.

अ) संकलीत केलेल्या माहितीतील तंटयांचे दिवाणी, महसूली, फौजदारी व इतर तंटे यामध्ये वर्गीकरण करावे.

ब) फौजदारी तंटयांचे वर्गीकरण अदखलपात्र आणि दखलपात्र असे करावे. यासाठी आवश्यकतेनुसार बीट अंमलदार यांची मदत घ्यावी.

क) दखलपात्र फौजदारी तंटयांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करावे:-

(१) दखलपात्र मिटविता येण्यासारखे (कंपाऊंडेबल):- फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३२० मध्ये नमूद केलेले सर्व गुन्हे या प्रकारामध्ये समाविष्ट करावेत.

(२) दखलपात्र न मिटविता येणारे (नॉन-कंपाऊंडेबल):- फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३२० मध्ये नमूद केलेल्या गुन्हयांच्या व्यतिरिक्त इतर सर्व तंटे/गुन्हे या प्रकारामध्ये समाविष्ट करावेत.

३) तंटे/गुन्हे यांची वर्गीकरणानुसार नोंदी करणे.

तंटे/गुन्हे यांचे वर्गीकरण केल्यानंतर दिवाणी, महसूली, अदखलपात्र फौजदारी; मिटविता येण्यासारखे दखलपात्र फौजदारी (कंपाऊंडेबल) तंटे/गुन्हे यांची नोंद **नोंदवही-२(अ)** मध्ये करावी. मात्र मिटविता न येणारे दखलपात्र फौजदारी (नॉन कंपाऊंडेबल) तंटे/गुन्हयांची नोंद **नोंदवही -२(ब)** मध्ये केवळ माहितीसाठी करण्यात यावी.

४) तंटे मिटविणे.

**नोंदवही-२(अ)** मधील दिवाणी, महसूली, अदखलपात्र फौजदारी व मिटविता येण्यासारखे दखलपात्र (कंपाऊंडेबल) तंटे/गुन्हे समितीने मिटविण्याचा प्रयत्न करावा. मात्र **नोंदवही-२(ब)** मध्ये नोंदविलेले कायद्याप्रमाणे मिटविता न येण्यासारखे दखलपात्र फौजदारी (नॉन कंपाऊंडेबल) तंटे/गुन्हे समितीस मिटविता येणार नाहीत.

५) तंटे मिटविण्याची कार्यपध्दती

(१) समितीने उभय पक्षकारांना बोलावून आणि त्यांची बाजू ऐकून घेवून तंटे मिटविण्याचा प्रयत्न करावा. आवश्यक तेथे महसूल किंवा अन्य विभागाच्या कर्मचारी/अधिका-यांचे मार्गदर्शन व मदत घेण्यात यावी. त्याचबरोबर फौजदारी तंटयांच्या बाबतीत आवश्कतेनुसार पोलीस ठाणे प्रमुख व बीट अंमलदार यांचे मार्गदर्शन व सहाय्य घेवून तंटे मिटविण्याचे प्रयत्न करावेत.

(२) तंटे मिटविण्यासाठी महाराष्ट्र विधी सेवा आयोग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा प्राधिकरण यांचे सहाय्य घेण्यात यावे.

(३) तंटामुक्त गाव समितीने आवश्यक तेथे मोफत कायदे सल्लागार समितीचा अथवा तज्ञ वकीलांचा सल्ला घ्यावा. तसेच पक्षकारांना त्यांच्या तंटयांतील कायद्याच्या बाजू स्पष्ट करुन सांगण्यासाठीही आवश्यकतेनुसार त्यांची मदत घ्यावी.

(४) एकमेकामध्ये तेढ वाढू न देता तंटे मिटविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

(५) तंटा/वाद मिटल्यानंतर संबंधित पक्षकारांमध्ये लेखी तडजोडनामा तयार करून तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष आणि निमंत्रक यांच्या समक्ष पक्षकारांच्या त्यावर स्वाक्षरी घेण्यात याव्यात. तसेच अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर 'समोर' म्हणून स्वाक्षरी करावी.

(६) दिवाणी, महसुली व इतर न्यायालयात प्रलंबित दाव्यासंबंधी तडजोड झाल्यानंतर उभय पक्षकारांच्या स्वाक्षरीने न्यायालयामध्ये वा सक्षम प्राधिका-याकडे पक्षकारांनी स्वतः अथवा त्यांच्या वकीलांमार्फत तडजोडनामा दाखल करुन त्यावर न्यायालयाचे वा सक्षम प्राधिका-याचे आदेश प्राप्त करुन घ्यावेत. अशा आदेशांची सत्य प्रत प्राप्त झाल्यानंतर न्यायालयामध्ये प्रलंबित असलेले दावे मिटले असे समजण्यात येईल आणि त्यानंतर तशी नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

(७) अदखलपात्र व दखलपात्र फौजदारी तंटे/गुन्हे मिटविण्यासंबंधी खालील ३ प्रकारे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी:-

१) अदखलपात्र तंटयांच्या बाबतीत उभय पक्षकारांच्यामध्ये तंटा मिटल्याचा लेखी तडजोडनामा करुन त्यावर तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष व निमंत्रक यांच्यासमोर पक्षकारांच्या स्वाक्षरी घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर 'समोर' म्हणून स्वाक्षरी करावी.

२) दखलपात्र गुन्हयांच्या बाबतीत पोलीस ठाण्यात फिर्यादा दाखल झालेली आहे परंतु न्यायालयात दोषारोपपत्र पाठविलेले नाही अशा तंटयांमध्ये उभय पक्षकारांनी तडजोडनामा तयार करावा. फिर्यादीने तडजोडनाम्याची एक प्रत जोडून पोलीस ठाण्याकडे लेखी अर्ज करुन फिर्याद मागे घेत असल्याचे कळवावे. पोलीस ठाण्याच्या अधिका-यांनी या तंटयांसंबंधी उचित समरी मिळावी म्हणून संबंधित न्यायालयाकडे प्रस्ताव पाठवावा. न्यायालयाने समरी स्वीकारल्याचा आदेश निर्गमित केल्यानंतर तंटामुक्त गाव समितीने आदेशाची सत्य प्रत प्राप्त करुन घेवून दप्तरी ठेवून घ्यावी आणि त्यानंतर तंटा मिटल्याची नोंद नोंदवहीमध्ये करावी.

३) दखलपात्र गुन्हयांसंबंधी न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल झालेल्या तंटयांच्या बाबतीत फिर्यादी व आरोपी यांनी न्यायालयासमोर वाद मिटल्याची लेखी पुरसीस (अर्ज) दाखल करावी. न्यायालयाने फौजदारी तंटा मिटल्यासंबंधी दिलेल्या आदेशाची सत्य प्रत प्राप्त करुन घेवून तंटामुक्त गाव समितीने दप्तरी ठेवून घ्यावी व तंटा मिटल्याची नोंद संबंधीत नोंदवहीत करावी.

(८) मिटलेल्या सर्व तंटयांची नोंद **नोंदवही-२ (अ)** मध्ये घेण्यात यावी.

**७.३ नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविणे**

(१) प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यानंतरही काही तंटे निर्माण होण्याची शक्यता असल्याने गांवामध्ये ३० सप्टेंबरनंतर मोहीम कालावधीत नव्याने निर्माण झालेले तंटे समिती मिटवेल.

(२) नव्याने निर्माण झालेल्या तंटयांचे वर्गीकरण वरील परिच्छेद ७.२.२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे करावे व तंटयांची नोंद त्यांच्या प्रकारानुसार **नोंदवही -३ (अ) व नोंदवही-३ (ब)** मध्ये घेण्यात यावी.

(३) गावामध्ये एखादा तंटा निर्माण झाल्यास शक्यतोवर तंटा घडलेल्या ठिकाणाजवळ राहणा-या तंटामुक्त गाव समितीच्या सदस्यांशी अथवा समितीच्या इतर सदस्यांशी संपर्क साधण्यात यावा. संबंधित सदस्याने सदर प्रकरणामध्ये हस्तक्षेप करावा व तंटा मिटविण्याचा प्रयत्न करावा. तसेच आवश्यकतेनुसार समितीच्या अध्यक्षांशी संपर्क साधावा व समितीमार्फत उभय पक्षकारांमध्ये समझोता करण्याचा प्रयत्न करावा.

(४) नवीन निर्माण झालेले तंटे सुध्दा परिच्छेद-७.२.५)मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार मिटविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(५) गावात एखादा तंटा घडला असेल व तो कोणत्याच माध्यमातून समितीसमोर आला नसेल तर समितीने अशा तंटयांचे बाबतीत ऐकीव माहितीवर अपरोक्षरित्या वस्तुस्थिती जाणून घ्यावी व तथ्य असल्यास तो तंटा मिटविण्यासाठी विचारात घ्यावा.

(६) मिटलेल्या तंटयाच्या नोंदी **नोंदवही-३ (अ)** मध्ये घेण्यात यावी.

## ७.४ परस्पर पोलीस ठाण्याकडे प्राप्त होणा-या अर्जावरील कार्यवाही

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या कालावधीमध्ये जर काही लोकांचे अर्ज परस्पर पोलीस ठाण्याकडे प्राप्त झाले तर पोलीस ठाणे प्रमुखाने सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार त्याची दखल घेऊन चौकशी व कारवाई करावी. मात्र असा अर्ज प्राप्त होताच त्या अर्जातील या मोहीमेमध्ये मिटविता येणा-या तंटे/गुन्हयामध्ये जे तंटे/गुन्हे मोडतात अशा संबंधीच्या अर्जाची एक प्रत तंटामुक्त गाव समितीस पाठवावी. तंटामुक्त गाव समितीने अशा प्राप्त अर्जांची दखल घेऊन तक्रार मिटविण्याचा समांतर प्रयत्न करावा. सदर अर्जातील तंटा मिटल्यास समितीने त्याची नोंद **नोंदवही-३(अ)** मध्ये करावी आणि पोलीस स्टेशन स्तरावर तडजोडनाम्याच्या आधारावर प्रकरण निकाली काढावे.

## ८. मोहिमेचे अभिलेख

प्रतिबंधात्मक उपाययोजनांची नोंदवही ठेवणे, तंटयांसंबंधी माहिती संकलित करणे, नोंद घेणे, त्याचे वर्गीकरण करणे, इत्यादी सर्व कामे समितीचे निमंत्रक करतील असे अभिलेख समितीचे निमंत्रक व अध्यक्षांनी स्वाक्षरीत करावेत.

## ९. मोहिमेचा प्रारंभ

मोहिमेचा प्रारंभ दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी होईल.

## १०. मोहीम कार्यान्वयन

### १०.१ कार्यान्वयन

अ) दरवर्षी १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत मोहिमेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या ग्रामपंचायतींनी ग्रामसभा आयोजित करावी आणि ग्रामसभेने महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेत भाग घेण्याचा निर्णय करावा. मोहिमेत भाग घेऊ इच्छिल असल्याबाबतचे पत्र व तंटामुक्त गाव समिती सदस्यांची यादी संबंधित पोलीस ठाणे प्रमुखास ग्रामपंचायतीने तात्काळ पाठवावी.

ब) दिनांक १ सप्टेंबर रोजी संबंधित पोलीस ठाणे प्रमुख त्या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील मोहिमेत भाग घेणाऱ्या गावांची यादी व तंटामुक्त गाव समितीच्या सदस्यांची यादी जाहीर करतील व गावांची यादी तहसिलदार यांना पाठवतील.

क) संबंधित तालुक्याचे तहसिलदार तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेत भाग घेणाऱ्या गावांची यादी तालुका स्तरावरुन जाहीर करतील.

ड) पोलीस ठाण्याचे प्रमुख तंटामुक्त गाव समितीच्या जाहीर यादीची प्रत ग्राम पंचायतीस पाठवितील. ग्राम सेवक/ग्राम विकास अधिकारी अशी यादी ग्राम पंचायतीमध्ये लावतील.

### १०.२ मार्गदर्शन व प्रोत्साहन

अ) जिल्ह्यातील पोलीस व महसूल अधिकारी महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहीम आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील. त्यांच्या कार्यक्षेत्रातील दौ-याच्या वेळी गावांना भेटी देवून गावातील मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेतील. ग्रामपंचायतीला व तंटामुक्त गांव समितीला या मोहिमेसंबंधी येणा-या अडचणी जाणून घेऊन त्यांच्या अडचणींचे निराकरण करुन आणि मार्गदर्शन करुन त्यांना प्रोत्साहन देतील.

ब) तालुक्यातील तहसिलदार व पोलीस ठाणे प्रमुख हे त्यांच्या क्षेत्रामधील दौ-याच्या वेळी मोहिमेत सहभागी गावांना भेटी देवून तंटा मुक्त गाव समितीला मार्गदर्शन करतील. त्यांच्या अडचणी सोडविण्यात व तंटे सोडविण्यामध्ये सहकार्य करतील.

क) त्याचप्रमाणे तहसिलदार व पोलीस ठाणे प्रमुख हे संयुक्तपणे दौरे करुन मोहिमेमध्ये सहभागी गावांना भेटी देवून मार्गदर्शन करुन प्रोत्साहन देतील.

१०.३ तंटा निवारण कक्ष

अ) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी पोलीस अधिक्षक व जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून स्वतंत्र कर्मचारीवृंद उपलब्ध करुन देऊन 'तंटामुक्त गाव मोहीम कक्ष' निर्माण करण्यात येईल.

ब) शासन स्तरावर गृह विभागात प्रस्तुत मोहीमेसाठी स्वतंत्र " तंटामुक्त गाव मोहीम कक्ष" उपलब्ध कर्मचा-यांतून निर्माण करण्यात येईल.

१०.४ तंटामुक्त गाव अहवाल

अ) गाव तंटा मुक्त झाल्याचा अहवाल तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष व निमंत्रक त्यांच्या स्वाक्षरीने पोलीस ठाणे प्रमुख व तहसिलदार यांचेकडे पाठवतील.

ब) पोलीस ठाण्याचे प्रमुख व तहसिलदार यांच्या संयुक्त स्वाक्षरीने तहसिलदार तंटामुक्त गावांची यादी जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांना पाठवितील व त्याची एक प्रत उप विभागीय दंडाधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना देतील.

क) जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक हे संयुक्त स्वाक्षरीने जिल्हयातील तंटामुक्त गावांची यादी शासन, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक(परिक्षेत्र) यांना पाठवतील.

**११. मूल्यमापनाचे निकष**

१) मोहिमेमध्ये भाग घेतलेल्या गावांनी मोहिमेअंतर्गत केलेल्या कामांचे मूल्यमापन करण्यासाठी २०० गुण ठेवण्यात येतील. सदर गुणांची विभागणी व पात्रतेसाठी किमान गुण पुढीलप्रमाणे असतील:-

| तंटे निवारण | प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे | दाखल तंटे मिटविणे (३० सप्टेंबर पर्यंतचे) | नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे (३० सप्टेंबर ते ३० एप्रिल) |
|---|---|---|---|
| एकुण गुण २०० | ८० | १०० | २० |
| किमान आवश्यक गुण | ५६ | ७० | १४ |

२) तंटामुक्त गांव जाहीर करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, दाखल तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे यासाठी अनुक्रमे ५६, ७० व १४ किमान गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर किमान आवश्यक गुणांची बेरीज १४० येत असली तरी तंटामुक्त पात्रतेसाठी

एकत्रित १५० गुण मिळविणे आवश्यक राहील. एखादया गावात दाखल तंटेच नसतील किंवा नव्याने तंटे निर्माण झालेच नाहीत तर त्या त्या तंटयांच्या प्रकारातले किमान गुण त्यांना दिले जातील.

३) एकूण २०० गुणांपैकी किमान १५० गुण प्राप्त करणारे गाव तंटामुक्त गाव समजण्यात येईल.

४) गुणांबाबतचा सविस्तर तपशील आणि गुणप्रदानासंबंधी उदाहरण **परिशिष्ट-३** मध्ये दिलेले आहे.

**१२. मूल्यमापन समित्या व त्यांचे कामकाज**

१) मोहिमेमध्ये भाग घेतलेल्या गावांचे मूल्यमापन करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय कार्यकारी समिती प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र जिल्हा मूल्यमापन समित्या स्थापन करेल.

२) जिल्हा मूल्यमापन समिती पाच सदस्यांची असेल आणि त्यामध्ये महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी, विधी अधिकारी/विधी सल्लागार, एका पंचायत समितीचे सभापती व जिल्हा पत्रकार संघाने शिफारस केलेल्या एका प्रतिनिधीचा समावेश असेल. महसूल अधिकारी समितीचे अध्यक्ष राहतील.

३) जिल्हा स्तरावरील प्रत्येक मूल्यमापन समिती त्यांना नेमून दिलेल्या तालुक्यातील तंटामुक्त गावांचे परीक्षण करुन गाव तंटामुक्त झाले असल्यास तसा अहवाल जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सचिव तथा पोलीस अधिक्षक यांचेकडे पाठवतील.

४) मूल्यमापनामध्ये तंटामुक्त झालेल्या गावांची माहिती, राज्य शासन, पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त, विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना जिल्हास्तरीय कार्यकारी समिती पाठविल.

५) राज्य स्तरावरुन बाहय मूल्यमापनासाठी एका जिल्हयातील मूल्यमापन समित्या दुस-या जिल्हयात पाठविण्यात येतील. त्यासंबंधीचे आदेश शासन दरवर्षी निर्गमित करेल.

६) जिल्हास्तरीय कार्यकारी समिती त्यांना बाहय मूल्यमापनासाठी दिलेल्या जिल्हयांचे मूल्यमापन त्यांच्या जिल्हा मूल्यमापन समित्यांमार्फत करुन घेवून अहवाल शासनास पाठविल.

७) बाहय मूल्यमापनात पात्र गावांना शासन तंटामुक्त गाव म्हणून घोषित करील.

**१३. पुरस्कार योजना**

१) तंटामुक्त झालेल्या सर्व गावांना पुढीलप्रमाणे लोकसंख्येच्या आधारावर शासनाच्या वतीने रोख रकमेचा पुरस्कार आणि सन्मानचिन्ह देऊन राज्य पातळीवर समारंभपूर्वक गौरविण्यात येईल.

| तंटामुक्त गावाची लोकसंख्या | पुरस्काराची रक्कम |
|---|---|
| १००० पर्यंत | रुपये १,००,०००/- |
| १००१ ते २००० पर्यंत | रुपये २,००,०००/- |
| २००१ ते ३००० पर्यंत | रुपये ३,००,०००/- |
| ३००१ ते ४००० पर्यंत | रुपये ४,००,०००/- |
| ४००१ ते ५००० पर्यंत | रुपये ५,००,०००/- |
| ५००१ ते १०००० पर्यंत | रुपये ७,००,०००/- |
| १०००० अथवा त्याहून अधिक | रुपये १०,००,०००/- |

२) १९० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना त्यांना मिळणाऱ्या पुरस्काराशिवाय मिळालेल्या पुरस्कार रकमेच्या २५% इतकी रक्कम विशिष्ट सन्मानचिन्हांसह "शांतता पुरस्कार" म्हणून देण्यात येईल.

३) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत पुरस्कार प्राप्त गावांना पुन्हा पुरस्कार अनुज्ञेय असणार नाही. तथापि, अशा गावांनी पुढील वर्षांमध्ये तंटे मिटविण्यामध्ये सातत्य राखल्यास विशेष पुरस्कार देण्याबाबत राज्यस्तरीय समिती विचार करेल.

**१४. पुरस्कार रकमेचा विनियोग**

तंटामुक्त गाव पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती ग्रामसभेच्या मान्यतेने पुरस्काराची रक्कम केवळ मत्ता उभारण्याबाबतच्या विकास कामासाठी खर्च करतील. याबाबत मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**१५. प्रसिध्दीसाठी पुरस्कार**

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम प्रभावी व यशस्वीरित्या राबविण्यामध्ये पूरक व प्रबोधनात्मक बातम्यांच्या माध्यमातून मोहिमेतील कामांना वस्तुनिष्ठ प्रसिध्दी देणाऱ्या वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हा स्तर, विभागीय स्तर व राज्य स्तरावर प्रत्येकी तीन पुरस्कार देण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हा स्तर:- | अ) प्रथम पुरस्कार | रु. २५,०००/- |
| | ब) द्वितीय पुरस्कार | रु. १५,०००/- |
| | क) तृतीय पुरस्कार | रु. १०,०००/- |
| २) विभागीय स्तर :- | अ) प्रथम पुरस्कार | रु. १,००,०००/- |
| | ब) द्वितीय पुरस्कार | रु. ७५,०००/- |
| | क) तृतीय पुरस्कार | रु. ५०,०००/- |
| ३) राज्य स्तर:- :- | अ) प्रथम पुरस्कार | रु. २,५०,०००/- |
| | ब) द्वितीय पुरस्कार | रु. १,५०,०००/- |
| | क) तृतीय पुरस्कार | रु. १,००,०००/- |

सदर पुरस्कार योजनेसबंधी शासन वेगळयांने मार्गदर्शक सूचना निर्गमित करेल.

१६. **जनजागृती अभियान, प्रसिध्दी व प्रचार**

तंटामुक्त गांव मोहिमेची माहिती सर्व राज्यभर करुन देण्यासाठी, अधिकाधिक ग्रामपंचायतींनी या मोहिमेत भाग घेणे, तसेच लोकांनी आपले तंटे वाद या मोहिमेअंतर्गत मिटवून घेवून आपला फायदा करुन घ्यावा यासाठी या मोहिमेची इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यमे, जाहिराती, पोस्टर्स, बॅनर्स, माहितीपुस्तिका, लेख, लघुपट, इत्यादींच्याद्वारे प्रचार, प्रसिध्दी आणि जनजागृती करण्यात येईल. जिल्हा, तालुका व पोलीस स्टेशन पातळीवरुनही उपरोक्त मोहीम अधिक परिणामकारक व लोकोपयोगी होईल अशा रितीने मोहिमेची प्रचार व प्रसिध्दी करण्यात येईल, शासकीय यंत्रणा व खाजगी व्यावसायिकांच्या माध्यमातून प्रसार व प्रसिध्दी करण्यात येईल

१७. पुरस्कार योजनेसाठी सन २००८-०९ या वित्तीय वर्षापासून खर्च अपेक्षित असून तो त्या त्या वर्षाच्या मंजूर अनूदानातून भागविण्यात येईल. प्रचार व प्रसिध्दीच्या प्रयोजनार्थ येणाऱ्या रु. ३ कोटी खर्चापैकी आकस्मिकता निधीतून प्राप्त रु.१.५० कोटी एवढया अग्रीमातून करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

१) यासंबंधीचे देयक कोषागारात सादर करताना त्यावर लाल शाईने सदर खर्च आकस्मिकता निधीतून करण्यात आला आहे अशी नोंद घेण्यात यावी. व सदर प्रकरणी पूरक अनुदान प्राप्त झाल्यावर मागणी क्र. बी-१, २०५५-पोलीस-(००) (१०९)-जिल्हा पोलीस (००)(१०) तंटामुक्त गाव मोहिम (२०५५-०५३-३) योजनेत्तर/दत्तमत या लेखाशिर्षाखाली अंतिमतः खर्ची टाकण्यात यावा.

२) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना वरील मंजूरीप्रमाणे आकस्मिकता निधीतून अग्रीम कोषागारातून काढण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. पोलीस उप महानिरीक्षकांचे उप सहाय्यक, पोलीस महासंचालकांचे कार्यालय हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील. त्यांनी वरील मंजूरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रीम रकमेतून खर्च करण्यासाठी देयके सादर करण्यासंदर्भात पुढील सूचना काटेकोरपणे पाळण्याबाबत संबंधीतांना कळवावे.

(एक) आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात आगाऊ रकमेतून खर्च करताना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर, "आकस्मिकता निधी अग्रीम, शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्र.आकनि ११.७/३३/अर्थसंकल्प-२०, दिनांक १९.७.२००७ संगणक सांकेतांक ८०००-२९३-९" असे लाल शाईने लिहावे अशी सूचना आदेशात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

(दोन) आकस्मिकता निधी अग्रीम रकमेतून खर्च करण्यासाठी वेगळी देयके सादर करावीत.

(तीन) देयकावर जोडलेल्या संगणक चिठ्ठीवर अर्थसंकल्प शीर्षाचा कोड नंबर लिहिण्यात यावा.

(चार) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक सीएनएफ १०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट, १९८६ अन्वये आकस्मिकता निधीमधील आगाऊ रकमेबाबत दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(पाच) आकस्मिकता निधी अग्रीमातून करावयाच्या खर्चासंबंधी देयके काढताना संगणक सांकेताचा वापर करावा.

गृह विभागाचे आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरील मंजूरीप्रमाणे आकस्मिकता निधीतून अग्रीम रक्कम खर्च करताना ज्या कारणासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे त्याच कारणासाठी पूर्णपणे खर्च करावी. ते याकरिता पूर्ण जबाबदार राहतील. तसेच सदरहू अग्रीमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती त्यांनी शासनास डिसेंबर, २००७ पूर्वी अवगत करावी.

यासाठी होणारा खर्च मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) (१०९) - जिल्हा पोलीस (००) (१०) तंटामुक्त गाव मोहिम (२०५५-०५३-३) योजनेत्तर/ दत्तमत या लेखाशिर्षाखाली प्रथमतः शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि- ११.०७/३३ अर्थसंकल्प-१०, दिनांक १९.७.२००७ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.१.५० कोटी (रुपये दीड कोटी फक्त) आकस्मिकता निधी अग्रीमातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. (१) क्रमांक २१९/०७/ व्यय-७, दिनांक १६.७.२००७ व (२) क्रमांक २२२/०७/अर्थ ३ दिनांक १९.७.२००७ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०७२०१६५०५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( चित्कला झुत्शी )

अपर मुख्य सचिव(गृह), महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य,
सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य (पत्राद्वारे),
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पालक सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व उप विभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचेमार्फत),

(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)

सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचेमार्फत).

(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक पोलीस ठाणे, प्रत्येक ग्रामपंचायत यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)

सर्व गटविकास अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेमार्फत).
सर्व तहसिलदार (जिल्हाधिकारी यांचेमार्फत).
निवड नस्ती (पोल-८).

## नोंदवही-१

### प्रतिबंधात्मक उपाययोजनांसंबंधी केलेल्या कामाची माहिती

| अ.क्र. | प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे शीर्ष | राबविलेल्या उपक्रमांची माहिती | राबविलेल्या उपक्रमांचे गांवात झालेले परिणाम |
|---|---|---|---|
| | | | |

## नोंदवही-२ (अ)

### गावामधील ३० सप्टेंबर २००७ पर्यंतचे दाखल तंटे

| अ. क्र. | तक्रार दारांचे नांव/ नावे | तंटा ज्यांच्या विरुध्द आहे त्यांचे नांव/ नावे | दावा जेथे प्रलंबित आहे ते न्याया-लय/ सक्षम प्राधिकारी | तंटा/दावा क्रमांक (असल्यास) आणि संबंधित कायदा व त्यांची कलमे | तंटयाचा प्रकार (दिवाणी फौजदारी/ महसुली/ इतर) | मिट-लेल्या तंट्याचे स्वरुप | तंटा मिट-ल्याचा दिनांक | संबंधित न्याया-लयात/ सक्षम प्राधिका-याकडे तडजोड दाखल केल्याच तारीख | संबंधित न्याया-लयाने/ सक्षम प्राधिका-याने दिलेल्या आदेशा-ची तारीख | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

## नोंदवही-२ (ब)

### गावामधील ३० सप्टेंबर २००७ पर्यंतचे दाखल फौजदारी (नॉन कंपांऊंडेबल )तंटे

| अ. क्र. | तक्रार दारांचे नांव/ नावे | तंटा ज्यांच्या विरुध्द आहे त्यांचे नांव/ नावे | दावा जेथे प्रलंबित आहे ते न्यायालय | तंटा/दावा क्रमांक (असल्यास) आणि संबंधित कायदा व त्यांची कलमे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

## नोंदवही-३ (अ)

### नव्याने (दिनांक ३० सप्टेंबर ते ३० एप्रिल २००७ ) निर्माण झालेले तंटे

| अ. क्र. | तक्रार दारांचे नांव/ नावे | तंटा ज्यांच्या विरुध्द आहे त्यांचे नांव/ नावे | तंटा/ दावा जेथे प्रलंबित आहे ते न्यायालय/ सक्षम प्राधिकारी | दावा क्रमांक (असल्यास) आणि संबंधित कायदा व त्यांची कलमे | तंटयाचा प्रकार (दिवाणी/ फौजदारी/ महसुली/ इतर) | मिटलेल्या तंटयाचे स्वरुप | तंटा मिटल्याचा दिनांक | संबंधित न्यायालयात/ सक्षम प्राधिका-यापुढे तडजोड दाखल केल्याची तारीख | संबंधीत न्यायालयाने/ सक्षम प्राधिका-याने दिलेल्या आदेशाची तारीख | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

## नोंदवही-३ (ब)

### नव्याने (दिनांक ३० सप्टेंबर ते ३० एप्रिल २००७ ) निर्माण झालेले फौजदारी (नॉन कंपाऊंडेबल) तंटे

| अ. क्र. | तक्रारदारांचे नांव/ नावे | तंटा ज्यांच्या विरुध्द आहे त्यांचे नांव/नावे | तंटा/दावा जेथे प्रलंबित आहे ते न्यायालय | दावा क्रमांक आणि संबंधित कायदा व त्यांची कलमे (असल्यास) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

## परिशिष्ट-१

## तंटामुक्त गांव मोहिमेचा कार्यक्रम

- दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी तंटामुक्त गांव मोहीमेचा शुभारंभ करावा.
- दिनांक १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत ग्रामसभा आयोजित करुन ग्रामपंचायतीने मोहिमेतील सहभाग निश्चित करावा व तंटामुक्त ग्राम समितीची निवड करावी.
- दनांक ३० सप्टेंबर पूर्वी गांवातील सर्व दाखल तंट्यांची यादी करुन ती नोंदवहीत नोंदविण्यात यावी.
- दिनांक ३१ मार्च पर्यंत गांवातील नोंदवहीत नोंदविलेले व नवीन निर्माण झालेले तंटे मिटविण्याचे प्रयत्न तंटामुक्त गांव समितीने करावेत.
- नवीन निर्माण झालेले तंटे वेळोवेळी मिटवून व गाव तंटामुक्त करण्याचे निकष पूर्ण करुन दिनांक १ मे रोजी ग्रामसभेत गांव तंटामुक्त झाल्याचे जाहीर करण्यात यावे. संबंधित पोलीस ठाणे प्रमुख व तहसिलदार यांना समितीने कळवावे. तहसिलदार व पोलीस ठाणे प्रमुख यांनी त्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने पोलीस ठाण्याचा अहवाल सदस्य सचिव जिल्हास्तरीय कार्यकारी समिती तथा जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडे दिनांक ५ मे पूर्वी पाठवावा.
- जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने दिनांक ५ जून पूर्वी तंटामुक्त गांवांचा अहवाल राज्य शासन, पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त, विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना दिनांक १० जून पुर्वी पाठवावा.
- जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने जिल्हाबाहय मूल्यमापनासाठी त्यांना दिलेल्या जिल्हयामधील गावांचे मूल्यमापन त्यांच्या जिल्हयांतील मूल्यमापन समित्यामार्फत करुन घेवून त्या जिल्हयातील पुरस्कारपात्र गावांची माहिती दिनांक ३१ जुलै अखेर राज्य शासनास सादर करावी.
- दरवर्षी दिनांक १ ऑगस्ट रोजी राज्य शासन, राज्यातील तंटामुक्त झालेल्या गावांची यादी जाहीर करेल.
- दरवर्षी दिनांक ९ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ मुंबई येथे आयोजित करुन मा.मुख्यमंत्री / मा.उपमुखमंत्री यांचे हस्ते पुरस्कारपात्र गावांचा जाहीर सन्मान करण्यात येईल.

## परिशिष्ट-२
## जिल्हा/तालुका/पोलीस ठाणे स्तरावरील समित्या

### जिल्हा सल्लागार व अंमलबजावणी समिती

| | | |
|---|---|---|
| मा.पालकमंत्री | - | अध्यक्ष |
| मा.जिल्हा परिषद अध्यक्ष | - | सदस्य |
| मा.खासदार | - | सदस्य |
| मा.आमदार | - | सदस्य |
| जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| पोलीस अधिक्षक | - | सदस्य सचिव |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| अप्पर जिल्हाधिकारी | - | सदस्य |
| अप्पर पोलीस अधिक्षक | - | सदस्य |
| सर्व उप विभागीय अधिकारी | - | सदस्य |
| सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी | - | सदस्य |
| विभागीय समाजकल्याण अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा सरकारी वकील | - | सदस्य |
| सहा.संचालक व सरकारी अभियोक्ता | - | सदस्य |
| अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क | - | सदस्य |
| प्रकल्प संचालक, आदिवासी विकास | - | सदस्य |
| जिल्हा व्यसनमुक्ती अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा माहिती अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष | - | सदस्य |
| स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| जिल्हयातील सामाजिक क्षेत्रातील प्रभावी व्यक्ति | - | ४ सदस्य |

### जिल्हा स्तरीय कार्यकारी समिती

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| पोलीस अधिक्षक | - | सदस्य सचिव |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| अप्पर जिल्हाधिकारी | - | सदस्य |
| अप्पर पोलीस अधिक्षक | - | सदस्य |
| सर्व उप विभागीय अधिकारी | - | सदस्य |
| सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी | - | सदस्य |
| विभागीय समाजकल्याण अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा सरकारी वकील | - | सदस्य |
| सहा.संचालक व सरकारी अभियोक्ता | - | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| प्रकल्प संचालक, आदिवासी विकास | - | सदस्य |
| अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क | - | सदस्य |
| जिल्हा व्यसनमुक्ती अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा माहिती अधिकारी | - | सदस्य |

जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सल्लागार व अंमलबजावणी समितीने, जिल्ह्यामध्ये तंटामुक्त गांव मोहिमेच्या अंमलबजावणीसाठीचे धोरण ठरवावे आणि त्याप्रमाणे कार्यकारी समितीमार्फत अंमलबजावणी करावी. जिल्ह्यामधील सर्व लोकप्रतिनिधी व विविध संस्था यांचा सहभाग या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर घेण्यात यावा. यासाठी आवश्यक ती कार्यवाही सदर समितीने करावी. जिल्हास्तरीय कार्यकारी समितीवर या मोहिमेची प्रत्यक्ष अंमलबजावणी, प्रचार, प्रसिध्दी आणि तंटामुक्त गावांचे मूल्यमापन करुन घेण्याची जबाबदारी राहील. मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या बैठका वेळोवळी घेण्यात याव्यात.

## तालुका स्तरावरील समिती

| | | |
|---|---|---|
| तहसिलदार | - | अध्यक्ष |
| मा.पंचायत समिती सभापती | - | सदस्य |
| तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य | - | सदस्य |
| गट विकास अधिकारी | - | सदस्य |
| सहाय्यक सरकारी वकील | - | सदस्य |
| तालुक्यातील पोलीस ठाण्याचे प्रमुख | - | सदस्य |
| तालुका निरीक्षक, भूमि अभिलेखक | - | सदस्य |
| नगर भूमापन अधिकारी | - | सदस्य |
| स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| पत्रकार यांचे प्रतिनिधी | - | २ सदस्य |
| मोफत कायदेविषयक सल्लासमिती पॅनेलवरील एक वकील | - | सदस्य |

तालुक्यामध्ये मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या समितीवर राहील. सर्व गावांनी मोहिमेत भाग घ्यावा यासाठी आणि गावांना प्रोत्साहन देवून त्यांच्या अडचणी दूर करुन अधिकाधिक गांवे तंटामुक्त करण्यासाठी समिती प्रयत्न करेल. समितीची बैठक दर महिन्याला घेण्यात यावी.

## पोलीस ठाणे स्तरावरील समिती

| | | |
|---|---|---|
| पोलीस ठाणे प्रमुख | - | अध्यक्ष |
| महसूल मंडळ अधिकारी (सर्व) | - | सदस्य |
| बीट अंमलदार (सर्व) | - | सदस्य |
| सरपंचांचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| तंटामुक्त गाव समितीचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| पोलीस पाटील यांचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| तलाठी यांचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| ग्रामसेवकांचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| महिला प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| अ.जा., अ.ज.चे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी | - | ३ सदस्य |
| पत्रकार यांचे प्रतिनिधी | - | २ सदस्य |

पोलीस ठाणे स्तरावरील तंटामुक्त गांव मोहीम समितीमध्ये घ्यावयाचे पोलीस पाटील, सरपंच, तलाठी, ग्रामसेवक यांच्या प्रतिनिधींची निवड साधारणपणे संबंधित महसूल मंडळामधून एक प्रतिनिधी याप्रमाणे मंडळ अधिकारी/मंडळ निरीक्षक/बीट अंमलदार यांच्या सल्ल्याने करण्यात यावी. शक्यतोवर एकाच गावाचे दोन प्रतिनिधी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. समितीचे उर्वरित सदस्य पोलीस प्रमुख यांनी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील त्या त्या प्रवर्गातील प्रभावी व्यक्तींच्यामधून निवड करावी.

या समितीने पोलीस ठाण्याच्या क्षेत्रातील सर्व गावांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मोहिमेची व्यापक प्रचार, प्रसिध्दी करावी. दर महिन्यामध्ये बैठक घेऊन प्रगतीचा आढावा घ्यावा. गावांना तंटामुक्तीसाठी सहकार्य होईल असे प्रबोधनात्मक कार्यक्रम पोलीस ठाणे स्तरावरुन आयोजित करावेत. पोलीस ठाणे कार्यक्षेत्रासाठी लोक न्यायालये, महसूल न्यायालये आयोजित करुन अवघड दावे मिटविण्यास गावांना मदत करावी. पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त गावे तंटामुक्त होतील, असे प्रयत्न करावेत. तंटामुक्त पोलीस ठाणे असा गौरव प्राप्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न या समितीमार्फत करण्यात यावेत.

## परिशिष्ट-३
## मूल्यमापनाचे निकष व देण्यात येणारे गुण

अ) **प्रतिबंधात्मक उपाययोजना** ८० गुण

खालीलप्रमाणे उपशिर्षानिहाय विविध उपक्रम राबविले असल्यास मूल्यमापन समिती त्या त्या समोर नमूद केल्याप्रमाणे त्या उपक्रमांना गुण देईल.

**(१) सार्वजनिक सण/उत्सव रचनात्मक पध्दतीने व शांततेने साजरे करणे;** १० गुण

- जयंती, उत्सव, गणेशोत्सव, इत्यादी समारंभ.
- गावातील सार्वजनिक उत्सव साजरे करणा-या मंडळांचे कार्यक्रम.
- उत्सवांमधून समाजोपयोगी उपक्रम राबविणे.
- व्याख्यानमाला, प्रशिक्षण शिबीर, इत्यादी आयोजित करणे.
- `एक गाव एक गणपती` यासारखे उपक्रम राबविणे.
- गावातील उत्सव/सण/यात्रा पोलीस बंदोबस्ताशिवाय शांततेत पार पाडणे.

**(२) जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणे;** १० गुण

- जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणारे उत्सव/सण एकत्रित येऊन साजरे करणे.
- आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहासाठी ग्रामस्थांना प्रोत्साहन देणे.
- मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांच्या तक्रारी मिटविणे.
- जातीय व धार्मिक सलोख्याचे कार्यक्रम घेणे.
- गावातील पुतळे व प्रार्थना स्थळे यांच्या देखभाल व संरक्षणासाठी उपाययोजना करणे.

**(३) सार्वजनिक व खाजगी मालमत्तांचे संरक्षण करणे व विद्रुपीकरण रोखणे;** १० गुण

- निवडणूक, वाढदिवस व इतर कार्यक्रम यांच्या जाहिरातीचे फलक लावण्यासाठी नियमावली करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.
- जाहिरातीचे फलक न लावण्याबाबत सामंजस्याने अंमलबजावणी करणे.
- शासकीय व सार्वजनिक मिळकतीवर अतिक्रमणे होऊ न देणे.
- विद्रुप झालेल्या मालमत्ता पूर्ववत करणे.

**(४) ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यरत करणे;** १० गुण

- ग्राम सुरक्षा दल स्थापन करणे.
- सदस्यांना गणवेश व प्रशिक्षण देणे.
- ग्राम सुरक्षा दलाची रात्रगस्त चालू करणे.

**(५) अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मूलन करणे;** **१५ गुण**

- गावातील अवैध धंदे रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- अवैध धंदे करणा-या लोकांना पर्यायी रोजगाराकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे.
- व्यसनमुक्तीसाठी कार्यक्रम राबविणे, व्यसनी लोकांचे समुपदेशन करणे.
- आवश्यकतेनुसार अवैध धंदे निर्मूलन व प्रतिबंध यासाठी पोलीसांची मदत घेणे वा या कामी पोलीसांना सहकार्य करणे.

**(६) सामाजिक सुरक्षिततेसाठी कार्यक्रम राबविणे;** **५ गुण**

- हुंडाबळी रोखणे.
- महिलांचे सामाजिक प्रश्न व कौटुंबिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.
- जेष्ठ नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करणे.
- महिला बचत गट निर्मिती व सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे.
- सामूहिक विवाह सोहळे आयोजित करणे.
- गावामध्ये बालविवाह होणार नाहीत यासाठी प्रयत्न करणे.

**(७) गावांमध्ये राजकीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी उपक्रम घेणे;** **५ गुण**

- गावातील विविध कार्यकारी सोसायटी, ग्रामपंचायत व पतपेढ्या यांच्या निवडणुका बिनविरोधी करण्यासाठी प्रयत्न करणे.
- पोलीस बंदोबस्ताशिवाय निवडणुका शांततेत पार पाडणे.

**(८) गावातील अनिष्ट प्रथा रोखणे;** **५ गुण**

- अनिष्ट प्रथा, चालीरीती रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे.

**(९) वैयक्तिक समारंभ/कार्यक्रम/उत्सव;** **५ गुण**

- ध्वनीक्षेपकाचा नियमानुसार व मर्यादित वापर
- वरातीमधील गैरप्रकारांना प्रतिबंध करणे.
- वैयक्तिक समारंभातील अनिष्ट प्रथा नष्ट करणे.

**(१०) नाविण्यपूर्ण उपक्रम;** **५ गुण**

- गावातील स्त्री-पुरुष प्रमाण (जन्मदर) सुधारणे.
- बाल कामगार व बाल गुन्हेगारी रोखून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करणे.
- विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे.
- रस्ता सुरक्षेबद्दल उपाययोजना व प्रबोधन करणे.

- वन संवर्धन व वन संरक्षण याबाबत उपाययोजना करणे.
  गावाला व समितीला राबवावेत असे वाटणारे इतर उपक्रम.

**ब) तंटे मिटविणे**

दिनांक ३० सप्टेंबरपर्यंतचे दाखल तंटे आणि त्यानंतर दिनांक ३० एप्रिल पर्यंत नव्याने निर्माण झालेले तंटे असे सर्व तंटे मिटविण्यासाठी समितीने काम करावयाचे असून त्यानुसार तंटा मिटविण्याच्या केलेल्या कामांबद्दल खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील:-

**(१) दाखल असलेले तंटे मिटविणे** **एकुण गुण १००**

| अ.क्र. | तंट्याचा प्रकार | मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी | देण्यात येणारे गुण |
|---|---|---|---|
| १ | दिवाणी | ९१ ते १०० | २५ |
| | | ७६ ते ९० | २० |
| | | ७० ते ७५ | १५ |
| | | ७० पेक्षा कमी | ० |
| २ | महसुली | ९१ ते १०० | ३५ |
| | | ८६ ते ९० | ३० |
| | | ८० ते ८५ | २५ |
| | | ८० पेक्षा कमी | ० |
| ३ | फौजदारी | ९१ ते १०० | ३५ |
| | | ८५ ते ९० | ३० |
| | | ८५ पेक्षा कमी | ० |
| ४ | इतर तंटे | ९१ ते १०० | ५ |
| | | ९० पेक्षा कमी | ० |

**(२) नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे** **एकुण गुण २०**

| अ.क्र. | तंट्याचा प्रकार | मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी | देण्यात येणारे गुण |
|---|---|---|---|
| १ | दिवाणी | ७० व त्यापेक्षा जास्त | ५ |
| २ | महसुली | ८० व त्यापेक्षा जास्त | ५ |
| ३ | फौजदारी | ९० व त्यापेक्षा जास्त | ८ |
| ४ | इतर तंटे | १०० | २ |

फौजदारी तंट्याच्या बाबतीत तक्रार अर्ज, अदखलपात्र, दखलपात्र (compoundable) तंटे एकत्रित करुन त्याची टक्केवारी काढून गुण देण्यात यावेत.

--------

## उदाहरण

गुणांच्या निकषांप्रमाणे **(अ) प्रतिबंधात्मक उपाययोजना** (कमाल ८० गुण) **(ब) ३० सप्टेंबरपर्यन्त दाखल तंटे सोडवणूक** (कमाल १०० गुण) व **(क) ३० सप्टेंबरनंतरचे नवे तंटे मिटविणे** (२० गुण) या तिन्ही बाबींमध्ये स्वतंत्ररित्या **किमान ७०% गुण** (अनुक्रमे **अ-५६, ब-७०, क-१४**) प्राप्त झाल्याशिवाय आणि **एकत्रित एकूणपैकी किमान ७५% गुण** (२०० पैकी किमान **१५० गुण**) प्राप्त झाल्यावाय ग्रामपंचायत तंटामुक्त अभियानासाठी बक्षिसपात्र होत नाही. या बाबींचे सोदाहरण स्पष्टीकरण करण्यासाठी काही उदाहरणे नमूद करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | ग्रामपंचायत नाव | प्राप्त गुण | | | | बक्षिसाकरिता पात्र/ अपात्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कमाल | **अ** ८० पैकी | **ब** १०० पैकी | **क** २० पैकी | एकूण २०० पैकी | | |
| | किमान | **५६** | **७०** | **१४** | **१५०** | | |
| १ | **ह** | ७५ | ८० | १८ | १७३ | पात्र | **अ,ब,क** मध्ये स्वतंत्ररित्या किमानपेक्षा जादा गुण व एकूणपैकी सुध्दा किमानपेक्षा जादा गुण बक्षिसास **पात्र.** |
| २ | **ख** | ५५ | **६५** | **१०** | **१३०** | अपात्र | **अ,ब,क** मध्ये स्वतंत्ररित्या किमानपेक्षा कमी. शिवाय एकूण मध्ये ही किमान आवश्यकतेपेक्षा कमी गुण प्राप्त बक्षिसास **अपात्र.** |
| ३ | **ग** | ७६ | **६८** | १५ | १५९ | अपात्र | **अ ब क** मध्ये किमान पात्रतेपेक्षा जादा व एकूण पैकीही किमान पात्रतेपेक्षा जादा गुण असले तरी "**ब**" मध्ये किमान पात्रतेपेक्षा कमी गुण असल्याने बक्षिसास **अपात्र.** |
| ४ | **घ** | ७८ | ९० | **१०** | १७८ | अपात्र | **अ ब ब** मध्ये किमान पात्रतेपेक्षा जादा गुण, एकूण पैकी सुध्दा किमान पात्रतेपेक्षा जादा गुण. परंतु "**क**" मध्ये किमान पात्रतेपेक्षा कमी गुण मिळाल्याने बक्षिसास **अपात्र.** |
| ५ | **च** | **५०** | ९५ | १७ | १६२ | अपात्र | **ब ब क** एकूणमध्ये किमान पात्रतेपेक्षा जादा गुण. परंतु "**अ**" मध्ये किमानपेक्षा कमी **अपात्र.** |
| ६ | **छ** | ५८ | ७२ | १६ | **१४६** | अपात्र | **अ,ब,क** मध्ये किमान पात्रते पेक्षा जादा गुण. परंतु एकूणमध्ये किमान पात्रतेपेक्षा कमी. सबब बक्षिसास **अपात्र.** |
| ७ | **त** | ७९ | ९६ | १९ | १९४ | पात्र | एकत्रित कमाल पैकी ९०% पेक्षा जास्त गुण (१९० पेक्षा पात्र) मिळाल्याने **२०%** जादा **बक्षिस रकमेसही पात्र.** |

**राज्याचे व्यसनमुक्तीचे धोरण व अनुषंगीक कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक- युटीए - २०११/समिती /प्र.क्र. ३२६/सुधार-१**
**मंत्रालय, मुंबई- ४०००३२,**
**दिनांक - १ ऑक्टोबर , २०११**

**वाचा :-** १) गृह विभागाचा शासन निर्णय, क्रमांक- सीएलसी -११०१/सीआर-१/भाग-२ /ईएक्ससी-२, दिनांक ६ डिसेंबर, २००२

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय, विभाग क्रमांक- डीडीपी-२००९ /प्र.क्र.१४९ /सुधार-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०११.

**प्रस्तावना :-** भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मधील सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी ( औषधीय प्रयोजनाव्यतिरिक्त ) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार राज्याचे व्यसनमुक्तीविषयी धोरण निश्चित करण्यात आले असून सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १७ ऑगस्ट, २०११ च्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहीर करण्यात आले आहे.

सदरहू शासन निर्णयात व्यसनमुक्ती बाबतची सद्य:स्थिती, उत्पादन विषयक धोरण, मद्यसेवन परवाना, दारुसेवन विषयक धोरण, वैध मद्य विक्री परवाना धोरण, वैध दारुबाबत जनतेचा अधिकार, प्रशासकिय जबाबदाऱ्या, ग्राम सभेची कर्तव्ये, व्यसनमुक्ती समित्यांची रचना व कर्तव्ये, व्यसन मुक्तीचा प्रचार व प्रसार, व्यसन मुक्तीसाठी प्रशिक्षण, व्यसन मुक्तीसाठी उपचार इत्यादीबाबत ऊहापोह करण्यात आला आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये व्यसनमुक्ती धोरण जाहीर करताना त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व्यसनमुक्ती समित्या गठीत करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. यात समित्यांची रचना व कर्तव्ये विशद करण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत अवैध दारु धंदयावर बंदी आणण्यासाठी तालुकास्तरीय समितीची स्थापना करणेबाबत गृह विभागाचा शासन निर्णय, क्रमांक- सीएलसी -११०१/सीआर-१/भाग-२ /ईएक्ससी-२,

दिनांक ६ डिसेंबर, २००२ अस्तित्वात आहे. व्यसनमुक्ती धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विविध स्तरावरील समित्या गठीत करणेबाबत शासन निर्णय निर्गमित केल्यानंतर दिनांक ६ डिसेंबर, २००२ ची आवश्यकता असणार नाही.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये गृह विभागाचा शासन निर्णय क्रमांक- सीएलसी -११०१/सीआर-१/भाग-२ /ईएक्ससी-२, दिनांक ६ डिसेंबर, २००९ हा अधिक्रमित करण्यात येत आहे.

दिनांक १७ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयात जाहीर केलेल्या व्यसनमुक्ती धोरणाची परिणामकारक व योग्य अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय समित्या गठीत करण्यात येत असून त्याची रचना व कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील -

**अ) राज्य स्तरीय व्यसनमुक्ती समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री , सामाजिक न्याय | अध्यक्ष |
| २ | मा. मंत्री, राज्य उत्पादन शुल्क | सदस्य |
| ३ | मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय | सदस्य |
| ४ | मा. राज्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क | सदस्य |
| ५ | विधान सभा / परिषद सदस्य | सदस्य ८ (४ महिला ) |
| ६ | स्वातंत्र्य सैनिक | प्रतिनिधी (२) |
| ७ | व्यसन मुक्तीशी निगडीत सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले प्रतिनिधी | प्रतिनिधी २ |
| ८ | भ्रष्टाचार विरुध्द जन आंदोलनाचे सदस्य अथवा कार्यकर्ता | प्रतिनिधी २ |
| ९ | नशाबंदी मंडळातील महिला प्रतिनिधी | प्रतिनिधी (४) |
| १० | स्वयंसेवी संस्थांचे सदस्य | प्रतिनिधी ४ (२ महिला) |
| ११ | अनुसूचित जाती /जमाती च्या महिला प्रतिनिधी - | सदस्य (४) |

| | | |
|---|---|---|
| १२ | प्रधान सचिव, गृह विभाग (विशेष ) | पदसिध्द सचिव |
| १३ | सचिव, महिला व बाल कल्याण विभाग | पद सिध्द सदस्य |
| १४ | सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभाग | पदसिध्द सचिव |
| १५ | सचिव, सार्वजनिक आरोग्य विभागं | पदसिध्द सचिव |
| १६ | सचिव, सामजिक न्याय विभाग | पदसिध्द सचिव |
| १७ | संचालक, समाज कल्याण,संचालनालय | सदस्य सचिव |

**ब ) जिल्हास्तरीय व्यसनकार्य समितची रचना**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | कार्यकारी अध्यक्ष |
| ३ | विधानसभा सदस्य | प्रतिनिधी -४ ( २ महिला ) |
| ४ | स्वातंत्र्य सैनिक | प्रतिनिधी (२) |
| ५ | समाज कार्य महाविद्यालयाचे प्राचार्य | प्रतिनिधी (२) |
| ६ | शिक्षण क्षेत्रातील नामांकित व्यक्ती | प्रतिनिधी |
| ७ | जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख | प्रतिनिधी २ |
| ८ | वारकरी सांप्रदाय | प्रतिनिधी -२ |
| ९ | जिल्हा शिक्षणाधिकारी | सदस्य |
| १० | जिल्हा परिषदेच्या महिला सदस्य | प्रतिनिधी (३) |
| ११ | महिला बचत गटाचा प्रतिनिधी | प्रतिनिधी (४) |
| १२ | महिला वकील | प्रतिनिधी -२ |
| १३ | स्वयंसेवी संस्थाचा प्रतिनिधी | प्रतिनिधी -२ |
| १४ | जिल्हयातील दैनिकांचा संपादक /पत्रकार | प्रतिनिधी -२ |
| १५ | अनुसूचित जाती /जमाती च्या महिला सदस्य | प्रतिनिधी (४) |
| १६ | जिल्हा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क | प्रतिनिधी |
| १७ | जिल्हा पोलीस अधिक्षक | प्रतिनिधी |

प्रधान सचिव ( नियोजन विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव ( वित्त विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, गृह विभाग / राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक ,मंत्रालय, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त, मुंबई

सर्व पोलीस आयुक्त, मुंबई

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई

सर्व जिल्हाधिकारी

सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य

संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी

निवड नस्ती कार्यासन सुधार-१.

| | | |
|---|---|---|
| १८ | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य सचिव |

**क ) तालुकास्तरीय व्यसनमुक्ती कार्यसमिती**

| | | |
|---|---|---|
| १ | तहसिलदार | अध्यक्ष |
| २ | गट विकास अधिकारी | कार्यकारी अध्यक्ष |
| ३ | स्वातंत्र्य सैनिक | सदस्य-२ |
| ४ | गट शिक्षणाधिकारी | सदस्य |
| ५ | महाविद्यालयातील प्राचार्य | प्रतिनिधी -२ |
| ६ | शिक्षण क्षेत्रातील नामांकित व्यक्ती | प्रतिनिधी -२ |
| ७ | वारकरी सांप्रदाय | प्रतिनिधी -२ |
| ८ | महिला सरपंच | प्रतिनिधी (४) |
| ९ | पंचायत समिती महिला सदस्य | प्रतिनिधी (२) |
| १० | स्वयंसेवी संस्थाचा प्रतिनिधी | प्रतिनिधी (४) |
| ११ | स्थानिक किर्तनकार | प्रतिनिधी (२) |
| १२ | जिल्हयातील दैनिकांचा संपादक /पत्रकार | प्रतिनिधी-२ |
| १३ | स्थानिक लोक कलावंत | प्रतिनिधी-२ |
| १४ | महिला मंडळाचे प्रतिनिधी | प्रतिनिधी (२) |
| १५ | अनुसूचित जाती / जमातीचा प्रतिनिधी | प्रतिनिधी (४) (२ महिला) |
| १६ | सामाजिक कार्यकर्ता | प्रतिनिधी |
| १७ | महिला बचत गट | प्रतिनिधी ४ |
| १८ | तालुक्यातील सर्व पोलीस ठाणे अंमलदार | सदस्य |
| १९ | निवासी नायब तहसिलदार | सदस्य सचिव |

( Counselling) देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या जातील.

५) वैद्यकीय उपचार केंद्राने व्यसनमुक्तीसाठी दिर्घकाळ व अल्पकालीन योजना आखावी व त्याप्रमाणे व्यसनमुक्त होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला दवाखान्यात दाखल करुन उपचार करणे,

६)महाराष्ट्रातील चारही प्रादेशिक मनोरुग्णालयात व्यसनमुक्तीचे उपचार केले जातील.

सदर शासन निर्णय हा सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय, क्रमांक-शासन निर्णय, क्रमांक- डीडीपी-२००९/प्र.क्र.१४९/सुधार-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०११ मध्ये करण्यात आलेल्या तरतूदीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१११००११५२९५१००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने ,**

**( दिनेश वाघमारे )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा. मुख्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

मा. उपमुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा.मंत्री ( सा.न्या.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा.मंत्री, गृह विभाग / राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री ( सा. न्या.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री, गृह विभाग/ राज्य उत्पादन शुल्क स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय समितीचा कार्यकाळ ५ वर्षाचा असेल.

वरीलप्रमाणे विहित करण्यात आलेल्या व्यसनमुक्ती समितीची रचना लक्षांत घेऊन जिल्हाधिकारी तसेच तहसिलदार यांनी जिल्हा पालकमंत्र्यांच्या सल्ल्याने दिनांक २ ऑक्टोंबर, २०११ पूर्वी जिल्हास्तरीय, तालुका स्तरीय व्यसनंमुक्ती समिती गठित करावी व ती स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्द करावी. त्याची प्रत संचालक, समाज कल्याण, संचालनालय, पुणे यांना माहितीसाठी पाठवावी.

वरील प्रमाणे गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय व्यसनमुक्ती नियामक मंडळाची बैठक किमान ६ महिन्यात एकदा तर, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय व्यसनमुक्ती नियामक मंडळाची किमान २ महिन्यातून एक बैठक आयोजित करावी. कालबध्द बैठका आयोजित करणे ही संबंधित व्यसनमुक्ती मंडळाच्या सदस्य सचिवाची जबाबदारी असेल.

व्यसनमुक्तीच्या कार्यात उत्कृष्ट काम करणा-या ३ जिल्हास्तरीय व्यसनमुक्ती समित्या, ३ तालुकास्तरीय व्यसनमुक्ती समित्या, व्यसनमुक्तीबाबत काम करणा-या ३ सेवाभावी संस्था व व्यसनमुक्तीबाबत लक्षवेधी काम करणा-या ३ अधिकारी / कर्मचा-यांचा प्रत्येक वर्षी २ ऑक्टोंबर रोजी गौरव करण्यात येईल.

वरील प्रमाणे गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्यांचे कर्तव्य खालीलप्रमाणे असेल.

**अ) प्रचार व प्रसार -**

१) सर्व शैक्षणिक संस्था, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात दारुसह सर्व व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती समाविष्ट करतील.

२) व्यसनांचे दुष्परिणाम, त्याचे महिला विरोधी व गरीबी विरोधी स्वरुप समाजासमोर आणण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्थामध्ये पथनाटय, एकांकिका, पोस्टर्स, स्लोगन्स व इतर स्पर्धांचे आयोजन करणे.

३) मद्यपानासह सर्व व्यसनांच्या दुष्परिणामांची चित्रफित / चलचित्र तयार करुन शाळा महाविद्यालये, यात्रा, गणेशोत्सव, महिला मंडळे अशा सार्वजनिक उत्सवांच्या ठिकाणी दाखविणे.

४) अंमली पदार्थ विरोधी दिन, तंबाखू विरोधी दिन, धुम्रपान विरोधी दिन, नशाबंदी दिवस तसेच सप्ताह पाळण्यात यावेत व अशा दिवशी शैक्षणिक संस्थामधून प्रचार फेरी काढणे

५) व्यसनांचे दुष्परिणाम दर्शविणाऱ्या दूरदर्शन मालिका, लघुपट, हिंदी-मराठी भाषेत जाहिराती, दूरवाणी तथा दूरदर्शन माध्यमामार्फत प्रसारित करणे

६) विद्यार्थ्यांना दवाखान्यात नेऊन व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती देणे.

७) व्यसनमुक्ती गाव अभियान राबवून दूरवाणी व दूरदर्शनवर त्याची व्यापक प्रसिध्दी करणे. व्यसनमुक्त गावास देण्यात येणाऱ्या पुरस्काराची रक्कम बचत प्रमाणपत्र स्वरुपात तीन वर्षाच्या ठेवीसाठी देणे, जेणेकरुन ते गाव किमान तीन वर्षे तरी व्यसनमुक्त राहील.

८) किर्तने तथा लोककला माध्यमातून दारुबंदी व व्यसनमुक्तीचा प्रचार करणे.

**ब) व्यसनमुक्तीसाठी प्रशिक्षण**

१) समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती प्रचारकार्य या विषयाचा कार्यानुभव अनिवार्य करुन त्यांना प्रचार कार्यात सहभागी करणे, तसेच ऑक्झीलरी नर्स, मिडवाईफ व बहुउद्देशीय आरोग्य सेवक यांच्या अभ्यासक्रमात व्यसनमुक्तीचे प्रशिक्षण देणे.

२) अल्कोहोलीक ॲनॉनिमसच्या व असे कार्य करणाऱ्या इतर कार्यकर्त्यांचा व्यसनमुक्ती व दारुबंदी प्रचारात सहभाग करणे.

**क) व्यसनमुक्तीसाठी उपचार**

१) व्यसनाधीन शासकीय कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्तीसाठी कौन्सिलिंगची सुविधा

२) राज्यस्तरीय व्यसनमुक्ती नियामक मंडळाच्यावतीने जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या, ग्राम रक्षक दल, ग्रामपंचायत व्यसनमुक्ती कार्य समित्यांचे सदस्य, कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना व व्यसनमुक्तीचे कार्य करणाऱ्या इच्छुक लोकांना व्याख्याने, पथनाटय, पोस्टर्स चित्रफित व इतर माध्यमांतून प्रशिक्षण देणे.

३) मानसोपचार तज्ज्ञ व समाजकार्यात प्रशिक्षित असलेल्यांना दारुबंदी व व्यसनमुक्तीसाठी सल्लागार म्हणून नेमणे.

४) प्रत्येक जिल्हा रुग्णालयातील १० खाटांच्या मनोविकार कक्षात व्यसनमुक्तीसाठी रुग्णांना भरती करण्यात येईल व व्यसनाधीन व्यक्तीवर उपचाराची सोय तसेच त्याला सल्ला

शासकीय/निम शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळाच्या समस्यांची तपासणी करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि त्या अनुषंगाने सर्व कार्यालयात/संस्थेत समित्या स्थापन करावयाच्या महिला समितीच्या संदर्भातील सर्वसमावेशक आदेश..

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : मकचौ-२००६/प्र.क्र.१५/मकक,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२,
दिनांक : १९ सप्टेंबर, २००६

वाचा :-

१. शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही १०८२/सीआर ३४/१६ अ. दि.३०.८.१९८९
२. शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही १०९९/७३/मकअ, दिनांक १९ मे, १९९९
३. शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०००/प्र.क्र.३३६/का-०२,दिनांक ६ फेब्रुवारी, २००१
४. शासन परिपत्रक क्रमांक : सीडीआर १००२/१०९८/प्र.क्र.२/९८, दिनांक १८.९.२००२
५. शासन निर्णय क्रमांक : एसआव्ही १०.०३/३६/प्र.क्र.६/२००३/मकअ,
 दिनांक ५ जानेवारी, २००४
६. शासन परिपत्रक क्रमांक : मकचौ २००४/प्र.क्र.०१/२००४, दिनांक ३ ऑगस्ट, २००४
७. शासन निर्णय क्रमांक : मकचौ २००५/प्र.क्र.१६/०५, दिनांक २० जानेवारी २००६
८. शासन परिपत्रक क्रमांक : मकचौ २००६/प्र.क्र.१०/मकअ, दिनांक १७ मे, २००६
९. शासन निर्णय क्रमांक : मकअ २००६/प्र.क्र.०१/मकक, दिनांक २४ जुलै, २००६
१०. अध्यक्ष, राज्य महिला तक्रार निवारण समिती यांचे अ.शा.प.
 क्रमांक: मकचौ २००६/प्र.क्र.१५/मकक, दिनांक ४.९.२००६

**प्रस्तावना :-**

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र. ६६६-७० मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे भारत सरकारकडून प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्यातील मार्गदर्शक तत्वांची प्रत व त्या अनुषंगाने राज्य शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

सदरहू मार्गदर्शक तत्वे व त्या अनुषंगाने करण्यात येत असलेली कार्यवाही या संदर्भात वेळोवेळी शासनाने परिपत्रके व शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. सदरहू परिपत्रके व शासन निर्णय वाचा येथे उधृत केलेली आहेत. वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले निर्णय व परिपत्रके यांचा साकल्याने अभ्यास करुन शासकीय/निम शासकीय कार्यालयात ज्या तक्रार निवारण समित्या स्थापन झालेल्या आहेत व त्या स्थापन करण्याच्या दृष्टीने आणि त्या समित्यांना उपयोग होईल या दृष्टीने सदरहू मार्गदर्शक तत्वे आणि वरील शासन निर्णय यांचा एकत्रित सर्वसमावेशक आदेश पुढीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे :-

लैंगिक छळवादामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो आणि त्याबाबतची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे :-

अ. शारिरीक संपर्क आणि कामोद्दीपिक प्रणयचेष्टा
ब. लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती
क. लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे
ड. कोणत्याही स्वरुपातील संभोगवर्णन/संभोगदर्शन/अश्लीलसाहित्याचे प्रदर्शन
इ. कोणतेही अन्य अशोभनीय शारिरीक तोंडी अथवा सांकेतिक आचरण

मा. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन विशाखा जजमेंटनुसार विभाग प्रमुख (HOD) यांनी करावयाची कार्यवाही :-

१) लैंगिक छळामध्ये ज्या वरील गोष्टींचा समावेश होतो त्या संदर्भात नियुक्ती प्राधिकाऱ्याने खालील प्रकारचे गैरवर्तन करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी विरुध्द वर्तणूक नियमांचा भंग केल्याच्या कारणास्तव शिस्तभंगविषयक कारवाई म.ना.से.( शि.व अ.) नुसार करणे. जे नियमांचे पालन करणार नाहीत त्यांचे विरुध्द योग्य पेनल्टी लागू करणे.

२) कामाच्या ठिकाणी विश्रांती आरोग्य स्वच्छताविषयक सुविधा पुरविणे/तिच्या सेवेचा गैरफायदा घेतला जात नाही, अशी तिची समजूत होऊ नये यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे.

३)जर अशी एखादी कृती आयपीसी खाली किंवा एखाद्या अन्य कायद्याखाली घडली असेल तर त्या कायद्यानुसार संबंधीतांविरुध्द गुन्हा दाखल करणे.

१) तक्रार निवारण समितीची स्थापना करणे. यामध्ये ५० % महिलांचा सहभाग असणे आवश्यक व अध्यक्षपदी महिला असणे आवश्यक. या समितीत थर्ड पार्टी म्हणून एन.जी.ओ. किंवा लैंगिक छळाच्या संदर्भात जी व्यक्ती परिचित आहे, याचे त्याला ज्ञान आहे अशा व्यक्तीचा समावेश असणे आवश्यक. तक्रार निवारण समितीने वार्षिक प्रशासन अहवाल शासनाला सादर करणे आवश्यक. तक्रारींवर कोणती कार्यवाही केली आहे याबाबतचा अहवाल वरील दिलेल्या

मार्गदर्शक तत्वानुसार पालन करुन राज्य शासनाच्या तक्रार निवारण समितीस अहवाल सादर करणे आवश्यक. कंप्लेंट मॅकेनिझम तयार करणे, त्यासाठी विहित कालावधी आखून त्या कालावधीतच तक्रारींचा निपटारा करणे.

२) महिलांना त्यांच्या हक्कासंबंधात जागृती निर्माण करणे (अवेरनेस) संविधानातील कलम १४,१९,२१ मधील मुलभूत हक्कांचे रक्षण करणे, जेंडर इक्वॅलिटीसंदर्भात जागृतता निर्माण करणे. त्यासाठी वरील मार्गदर्शक सूचना तसेच खालील बाबी अधिसूचित (नोटीफाईड) करुन व्यवस्थितरित्या फलकावर लावणे.

अ. समितीच्या अध्यक्षांचे/सदस्यांचे नांव, दूरध्वनी क्रमांक आणि पत्ते

ब. जागृती निर्माण करण्यासाठी समितीच्या कार्यकक्षे संदर्भातील माहिती

६) थर्डपार्टी हॅरासमेंटच्या संदर्भात विभाग प्रमुखांची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहे. शासकीय सेवेत असलेल्या स्त्रिला अन्य पुरुष व्यक्तीकडून त्रास होत असेल तर तिला सर्व प्रकारची मदत देण्यासंदर्भात पावले उचलावीत. तिला पाठींबा द्यावा आणि प्रतिबंधात्मक उपाय योजावेत. गरज भासल्यास संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणे. (एखाद्या शासकीय सेवेत असलेल्या स्त्रिला बाहेरील गुंड त्रास देत असतील व अशा प्रकारची तक्रार आली असेल तर तिला आवश्यक ती पोलीस यंत्रणेची मदत मिळवून देण्यास मदत करणे, हे विभाग प्रमुखाचे काम आहे.

विशाखा जजमेंटच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये पुढील बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे :-

१) राज्य शासनाने सर्व खाजगी/सार्वजनिक/शासकीय संस्थेच्या सेवा नियमांमध्ये सुधारणा करणे

२) शिक्षेची तरतूद करणे

३) शासकीय संस्थेमधील कर्मचाऱ्यांविरुध्द अपील नियमाखाली शिस्तभंगाची कार्यवाही करणे

४) आवश्यक वाटल्यास त्या कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची बदली करणे,

५) पिडीत महिलांच्या तक्रारी नोंदवून घेऊन त्यावर कार्यवाही करण्यासाठी तक्रार निवारण समितीची स्थापना करणे,

६) शासकीय /निमशासकीय कार्यालयात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाचा प्रतिबंध करण्याची जबाबदारी मालकाची किंवा संस्था प्रमुखाची असणे,

७) कामाच्या ठिकाणी पोषक वातावरण तयार करणे,

८) कर्मचारी संघटनानाही अशाप्रसंगी प्रश्न उपस्थित करण्याची मुभा देणे,

९) महिला कर्मचाऱ्यांमध्ये त्यांच्या हक्काबाबत जाणीव/जागृती (अवेरनेस) निर्माण करणे.

**जोपर्यंत मा. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही केली जात नाही तोपर्यंत कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणूकीस प्रभावीपणे प्रतिबंध होणार नाही व महिलांना संरक्षण मिळणार नाही.** विशाखा जजमेंटचे पालन होत नसल्यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात

दाखल केलेल्या १७३-१७७/९९ डॉ. मेधा कोतवाल व इतर प्रकरणी दिनांक १७.१.२००६ रो सुप्रीम कोर्टाला आवश्यक वाटल्यामुळे पुढीलप्रमाणे आणखीन मार्गदर्शनपर आदेश दिलेले आहे :-

We find that in order to coordinate the steps taken in this regardther should be a State level oficer,i.e, either the Secretary of Women and Chilc Welfare department or any other suitable officer who is incharge and concernec with the Welfare of women and children in each State,The Chief Secrearies of each State shall see that an officer is appointed as a nodal agent to collect the details and to give suitable directions whenever necessary.

यासाठी वरील मार्गदर्शक तत्वानुसार लैंगिक सतावणूकीसंदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य स्तरावर पुढील तक्रार यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे :-

संपूर्ण राज्यामध्ये पुढीलप्रमाणे राज्य महिला तक्रार निवारण समिती नियुक्त केलेली आहे. आतापर्यंत वेळोवेळी नेमण्यात आलेले अध्यक्ष व सदस्य संख्येमध्ये दिनांक २०.१.२००६ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवेतील महिला अधिकाऱ्यांचा पदाधिकारी म्हणून नांवाने (By Name) समावेश करण्यात आला आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे जास्तीतजास्त सदस्य समितीच्या बैठकीला उपस्थित राहून त्यांचे बहुमोल मार्गदर्शन राज्य महिला तक्रार निवारण समितीला मिळू शकेल. सद्यस्थितीत समितीची रचना पुढीलप्रमाणे झालेली आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष - | श्रीम. लीना मेहेंदळे, प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग |
| २. | सदस्य - | सचिव, महिला व बाल कल्याण विभाग |
| ३. | सदस्य - | श्रीम. नीला सत्यनारायण, सचिव (पर्यटन), गृह विभाग |
| ४. | सदस्य - | श्रीमती शर्वरी गोखले, आयुक्त, कोकण विभाग |
| ५. | सदस्य - | प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग |
| ६. | सदस्य - | श्रीमती शैला हिरेकर, अध्यक्ष, वायडब्ल्यूसीए |
| ७. | सदस्य - | डीआयजी, सामाजिक सुरक्षा शाखा |
| ८. | सदस्य - | श्रीमती कविता गुप्ता, सचिव, लेखा व कोषागारे, वित्त विभाग |
| ९. | सदस्य - | श्रीमती सीमा व्यास, उपसचिव, सा.प्र विभाग |
| १०. | सदस्य - | श्रीमती राधिका रस्तोगी, उपसचिव, ग्रा. वि. विभाग |
| ११. | सदस्य - | श्रीमती मेघा गाडगीळ, एम. डी., हाफकिन |
| १२. | सदस्य - | श्रीमती अश्विनी भिडे, उपसचिव, राजभवन |

१३. सदस्य सचिव तथा महिला कल्याण अधिकारी -
श्रीम.प्र.प्र.चिटणीस, अवर सचिव, महिला व बाल विकास विभाग.

शासन निर्णय १९ मे ९९ नुसार या समितीच्या कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहेत :-

अ) केंद्र शासनाने प्रसिध्द केलेली मार्गदर्शक तत्वे तसेच शासनाचे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमात सुधारणा केलेल्या सूचनांना म्हणजेच लैंगिक सतावणुकीस प्रसिध्दी देणे.

ब) लैंगिक सतावणुकीच्या तक्रारीची दखल घेणे.

क) तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेऊन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरीता शिफारस करणे.

ड) शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

इ) शासनाला यासंबंधी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल सादर करणे.

शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या तक्रारीवरील समितीच्या अध्यक्षांकडे किंवा सदस्य सचिवांकडे पाठविता येईल. त्या तक्रारी या समितीकडून विचारात घेण्यात येतील आवश्यक असेल तर सदस्य सचिव ज्या कार्यालयाकडून तक्रार आलेली असेल त्या कार्यालयाच्या प्रमुखाचे अभिप्राय मागवू शकतील या तक्रार समितीस तक्रारदाराचे म्हणणे ऐकविण्यासाठी आणि तक्रारीची चौकशी करण्यासाठी पुढीलप्रमाणे चौकशी समितीची रचना करण्यासाठी सुध्दा प्राधिकृत करण्यात येईल:-

अ) मंत्रालयामध्ये उद्‌भवलेल्या तक्रारीसाठी एक सदस्य म्हणून एका महिला अधिकाऱ्यासह एखाद्या सचिवाच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात येईल.

ब) ज्या अधिकाऱ्याविरुध्द तक्रार करण्यात आलेली असेल तो अधिकारी त्या क्षेत्रातील गट अ किंवा गट ब सेवामधील अधिकारी असेल तर चौकशी समिती, सदस्य सचिव म्हणून महिला कल्याण अधिकाऱ्यासह संबंधित विभाग आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमता येईल.

क) ज्या कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रार करण्यात आलेली असेल तो कर्मचारी गट क किंवा गट ड सेवेतील असेल तर चौकशी समिती, एक सदस्य म्हणून त्या जिल्हयातील एका महिला अधिकाऱ्यास जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली नेमला येईल.

सदरहू शासन निर्णयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (दुसरी सुधारणा) नियम १९९८ नुसार करण्यात आली आहे आणि याबाबतचा नियम २२ अ समाविष्ट करण्यात आला आहे. तो खालीलप्रमाणे आहे :-

२२-अ (१) कोणताही शासकीय कर्मचारी कोणत्याही महिलेच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवादाचे कोणतेही कृत्य करणार नाही.

(२) कामाच्या ठिकाणी प्रभारी असलेला प्रत्येक शासकीय कर्मचारी त्या कामाच्या ठिकाणी कोणत्याही महिलेच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करील.

टीप --- या नियमाच्या उद्देशासाठी लैंगिक छळवादामध्ये अशोभनीय अशा हेतूपूर्वक लैंगिक वर्तनाचा, प्रत्यक्ष वा अन्यथा याचा समावेश होतो, जसे ---

१) शारीरिक संपर्क आणि कामोद्दिपक प्रणयचेष्टा,

२) लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती,

३) लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे,

४) कोणत्याही स्वरुपातील संभोग वर्णन/संभोग दर्शन/अश्लील साहित्याचे प्रदर्शन,

५) कोणतेही अन्य अशोभनीय शारीरिक, तोंडी अथवा सांकेतिक आचरण.

दिनांक ६.२.२००१ च्या परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली असलेली नीमशासकीय कार्यालये, महामंडळे या सर्वांना त्यांनी त्यांच्या आस्थापनांवर काम करणाऱ्या महिला अधिकारी व कर्मचारी यांना लैंगिक सतावणूकीपासून संरक्षण देण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे त्यांच्या सेवा नियमात सुधारणा करुन प्रत पाठविण्याबाबत योग्य ते आदेश निर्गमित केले आहेत.

दिनांक ५ जानेवारी २००४ नुसार सर्व जिल्हा तालुका पातळीवर तक्रार निवारण करण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत.

सर्व राज्य शासकीय व निमशासकीय कार्यालयांना लैंगिक छळाबाबत महिला कर्मचाऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

अ) सर्व जिल्हा / तालुका पातळीवर निम्न स्तर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात येईल व प्रत्येक समितीवर वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल. तसेच समितीवरील एकूण सदस्य संख्येच्या ५० % महिला सदस्या असतील.

ब) विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी समितीची कार्यकक्षा तसेच कार्यपध्दती ठरवून त्याबाबत कालबध्द कार्यक्रमाची आखणी करावी.

क) राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीच्या सदस्यांची अधिकार कक्षा वाढविण्यात यावी.

ड) लैंगिक छळवादासारखे अनुचित प्रकार टाळण्यासाठी कालबध्द कार्यक्रम विहीत कालमर्यादेत राबवावेत. त्यासाठी समितीच्या नियतकालिक बैठका घेऊन बैठकीचा दिनांक व वेळ संबंधित कार्यालयांस पुरेशा वेळेअगोदर कळवावी व अहवाल सादर करण्यास विहीत मुदत देण्यात यावी.

इ) महिलांच्या लैंगिक शोषणासंदर्भात समितीकडून करण्यात येणारी चौकशी गुप्त स्वरुपाची (इन-कॅमेरा) करण्यात यावी.

जिल्हा व तालुका पातळीवरील तक्रार निवारण समितीस प्राप्त होणाऱ्या तक्रारीनुषंगाने कार्यवाही केल्यानंतर चौकशी अहवाल राज्य महिला तक्रार निवारण समितीकडे सादर करुन आवश्यक वाटल्यास त्यावर अधिक कार्यवाहीची शिफास करण्याचे अधिकार राज्य तक्रार निवारण समितीस रहातील व त्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार करण्यात येणारी कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल समितीस पुन्हा सादर करण्यात यावा.

शासन निर्णय दिनांक ३ ऑगस्ट २००४ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-

तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेऊन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरीता शिफारस करणे, याबाबी अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :-

अ) राज्य महिला तक्रार निवारण समितीने एखाद्या प्रकरणी चौकशी करुन दिलेला चौकशी अहवाल हा **चौकशी अहवाल** मानण्यात यावा व सदर चौकशी अहवाल विचारात घेऊन संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी त्या प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहिल.

दिनांक १७ मे २००६ च्या परिपत्रकानुसार वरील बाबी लक्षात घेऊन महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याच्या संदर्भात पुढील आदेश देण्यात आलेले आहेत :-

अद्यापही बऱ्याच कार्यालयात महिला तक्रार निवारण समित्या गठीत करण्यात आल्या नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. मेधा कोतवाल लेले विरुध्द केंद्र शासन या प्रकरणी दिलेल्या आदेशात सर्व शासकीय व निम-शासकीय कार्यालयात व इतर संस्थेत अशा समित्या गठीत करणे बंधनकारक केले आहे. अन्यथा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाल्याने अवमान याचिका (Contempt of Court) दाखल होण्याची शक्यता आहे.

यास्तव अशा स्पष्ट सुचना देण्यात येत आहेत की, खालील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात व संस्थेत तातडीने महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात याव्यात.

१) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, सर्व जिल्हा परिषदा,
२) सर्व विभागीय आयुक्त कार्यालये, इतर विभागातील सर्व आयुक्तालये, संचालनालये
३) सर्व महानगरपालिका/नगरपालिका, महाविद्यालये, विद्यापीठे, सर्व शासकीय रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, महानगरपालिका अंतर्गत येणारी रुग्णालये
४) सर्व गटविकास अधिकारी कार्यालये
५) सर्व तहसिलदार कार्यालये
६) सर्व सार्वजनिक उपक्रम (उदा. म्हाडा, सिडको, एमएमआरडीए)

अशा समित्या गठीत करण्यापूर्वी संबंधित कार्यालयाने त्या कार्यालयात काम करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुष अधिकारी/कर्मचारी यांची एक बैठक घ्यावी.

सदर बैठकीत वरील विषयावर चर्चा करण्यात यावी, जेणेकरुन सर्व कर्मचारी व अधिकारी यांना सदर कायद्याची जाणीव होईल. या बैठकीत किती सदस्यांची समिती गठीत करावयाची याबाबत निर्णय घेऊन समितीतील सदस्यांची नांवे निश्चित करावी.

समितीवर शक्यतो सर्व महिला सदस्या असतील. त्या कार्यालयात वरिष्ठ महिला अधिकारी किंवा महिला अधिकारी उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही शासकीय कार्यालयातील/संस्थेतील वरिष्ठ महिलेची नेमणूक करण्यात यावी. संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी समितीची कार्यकक्षा, समितीची बैठक किती कालावधीमध्ये घेण्यात येईल याबाबत सर्वसंमतीने निर्णय घ्यावा.

समिती गठीत झाल्याबाबत कार्यालयातील सर्वांना माहिती मिळण्यासाठी कार्यालयातील दर्शनी भागातील फळ्यावर याबाबतच्या शासन आदेशाची प्रत लावावी.

वरीलप्रमाणे आदेश अद्यापि काही ठिकाणी पालन झाल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत न्यायालयीन आदेशाचे पालन करण्यात यावे. या संदर्भात अध्यक्ष, राज्य महिला तक्रार निवारण समिती यांच्या क्रमांकः मकचौ २००६/प्र.क्र.३५/मकक नुसार दिलेल्या आदेशांचे तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. जेणेकरुन महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच त्यांच्यावर लैंगिकदृष्ट्या अन्याय होणार नाही याची दक्षता सर्वांनी घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( वन्दना कृष्णा )
सचिव

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
५. विरोधी पक्ष नेता कार्यालय, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. महिलांचे हक्क व कल्याण समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. सचिव, महाराष्ट्र, विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती)
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद, नागपूर,
१३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
१४. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय